म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : नाटक
दा. क्र. : २०८५५

# ग्रँड रिडक्शन सेल

IRBK-0120855
IRBK-0120855

वाचनालय नाटक

२०८५५
४।५।८५

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. क्र. २०८५५ नों. दि. ४।५।८५
वि. नाटक क्र. ..............

ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ... नों. दि ........
वि. .................. क्र. ............

तीन अंकी सहा दुकानी स्वतंत्र नाटक

# ग्रॅण्ड रिडक्शन सेल

शं. ना. नवरे

IRBK-0120855
IRBK-0120855

श्रीविशाखा प्रकाशन, पुणे ३०.

प्रकाशक
राजा फडणीस
श्रीविशाखा प्रकाशन
५८, शनवार पेठ, पुणे ३०

मुद्रक
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०

प्रथमावृती : २६ जानेवारी १९८५

© सौ. अंजली नवरे, डोंबिवली

मुखपृष्ठ : अनिल उपळेकर, पुणे

मूल्य : वीस रुपये

नाट्य परीक्षण मंडळ यांनी प्रमाणपत्र क्रमांक डी. आर. एम. १६९०/६९, दि. १२-१२-६९ खाली या नाटकास मंजुरी दिली आहे.

---

**महत्त्वाची जाणीव :**

या नाटकाचे पुनर्मुद्रण, प्रयोग, रूपांतर इ. सर्व अधिकार सौ. अंजली नवरे, 'पूर्णायन', डोंबिवली (प.) ४२१२०२ यांचेकडे आहेत. प्रयोग करण्यापूर्वी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास नैर्बंधिक इलाज केला जाईल.

या नाटकातील कोणतेही 'दुकान' एकांकिका म्हणून सादर करायचे असल्यास मानधन म्हणून रुपये साठ मात्र वरील पत्त्यावर पाठवून लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

नाटचक्षेत्रात ज्यांच्यामुळे
मी पदार्पण केले
ते माझे मित्र आणि
दिग्दर्शक
श्री. रमेश चौधरी
यांना.

— शन्ना

नव्या महाराष्ट्र राज्य नाट्यमहोत्सवाच्या अंतिम फेरीत ‘ उदय कला केंद्र, मुंबई ’ या संस्थेने ‘ ग्रॅण्ड रिडक्शन सेल ’ या नाटकाचा प्रयोग शुक्रवार, दि. ९ जानेवारी १९७० रोजी रात्री ८.३० वाजता रंगभवन, धोबीतलाव, मुंबई येथे सादर केला.

## कलाकार

काळपुरुष--**रवींद्र विवेकर**

**दुकान पहिले :**

तो–**बाबा खानविलकर** ती–**तारका ठेंगडी** बाबा–**आत्माराम जाधव**

**दुकान दुसरे :**

**ममी**– **सौ. मनोरमा वागळे.** मुलगा– **लीलाधर मयेकर.** पपा– **रमेश खानविलकर.**

**दुकान तिसरे :**

पहिला–**रमाकांत पोवळे** दुसरा–**चंद्रकांत शिंदे.** तिसरा–**अरविंद वाक्कर.** चौथा–**विसु कामेरकर** पहिली–**सुरेखा पटवर्धन** दुसरी–**सुशीला उमरोटकर** महाराज–**रामदास नायक** अँग्री–**लीलाधर मयेकर** सावळा–**लवेश पितळे** हिरॉईन–**नीरा आडिवरेकर** हीरो–**विनायक सोमण** माळी–**सुधीर वेदपाठक**

**दुकान चौथे :**

बॉस–**राजा शिंदे.** पहिला लिहिणारा–**विजय साळुंखे.** दु. लिहिणारा– **नरेंद्र भुर्के.** लिहिणारी मुलगी– **सौ. शोभा परुळेकर** दुसरी मुलगी–**सुरेखा पटवर्धन** वच्चू–**सुरेश पोवळे** असिस्टंट–**सुधीर वेदपाठक** स्कॉलर–**लवेश पितळे** एच्–**आत्माराम जाधव**

**दुकान पाचवे :**

साथी–**विनायक सोमण** दादा–**बाबा खानविलकर** पोलीस–**नंदू पोवळे** बाई–**नीरा आडिवरेकर** लंगडा–**अरविंद वाक्कर** प्रवासी–**रमेश चौधरी** सोबती–**विजय साळुंखे** म्हातारा–**प्रभाकर मोने** इसम–**सुरेश पोवळे**

पंजाबी ड्रेसमधील मुलगी—**शोभना पोवळे**

**दुकान सहावे :**

पुढारी— **बाबा परुळेकर** नाटककाराची पत्नी—**सुहास म्हात्रे** साहेब—**रामदास नायक** नटवर्य—**राजा नरवणकर** होरारत्न—**रवींद्र रेळे** नाटककार—**शशिकांत कारेकर**

* दिग्दर्शक : रमेश चौधरी * सहदिग्दर्शन : शशिकांत कारेकर, रवींद्र दिवेकर * नेपथ्य : रमेश खानविलकर * प्रकाश योजना : रमेश चौधरी * संगीत : चंद्रचूडवासुदेव * साहाय्यक : गजानन वळवणकर * ध्वनि-संकलन : रामदास नायक * रंगभूषा : बाबा वर्दम * रंगमंच व्यवस्था : अरविंद दिवेकर, नंदकुमार दिवेकर, बापू टिळक, गजानन आंबेतकर, अरविंद आडारकर.

# पडदा उघडण्यापूर्वी

'ग्रॅण्ड रिडक्शन सेल' हे आपल्या ओळखीचे झालेले शब्द आहेत. हे शब्द बाजारात आहेत. मूल्यवान वस्तू कमी मोलात देण्याचे आश्वासन हे शब्द देतात. ह्या सवंग सौद्याचा मोह अनेकदा आपणास पडतो. पण पुष्कळदा अनुभव असा येतो की हा सौदा अंती स्वस्तात पडलेला नाही. स्वस्तात म्हणून घेतलेली वस्तू नासकीकुसकी आहे व हा सौदा आपणास फार महाग पडला आहे असा शोध आपणास लागतो.

कल्पना करा. नक्कल करून एक विद्यार्थी परीक्षामागून परीक्षा उत्तीर्ण झाला. हा सौदा त्याला फार स्वस्त वाटला. पात्रतेचे ढोंग करून तोच विद्यार्थी वैमानिक झाला. परंतु त्याची विद्या त्याला चांगलीशी अवगत नाही. परिणाम काय होईल ? तो, त्याचे विमान व त्याच्या चातुर्यावर अव-लंबून असणारे प्रवासी एक दिवस खाली कोसळतील. प्रथम स्वस्त वाटलेला सौदा आता फार फार महाग पडेल !

असेच तर आपले आज काही होत नाही ना ? करू नये त्या वस्तूंचा तर आपण बाजार करत नाही ना ? मांडू नये ते तर आपण विक्रीस मांडत नाही ना ? सवलतीच्या फार महाग पडणाऱ्या बाजारी मोलाने ! बाजारात माणसाला काय काय मिळते ? आईची माया, बायकोची निष्ठा, मित्राचे प्रेम, हुतात्म्यांचा त्याग, देशभक्ताची देशप्रीती ह्या वस्तू बाजारात मिळतात का ? बाजारात मांडता येतात का ? ह्या वस्तू कुठे विकत मिळतात का ? ह्या वस्तू विक्रीसाठी मांडल्या तर काय होईल ? स्त्रीचे पावित्र्य, पुरुषाचा पराक्रम, देशाचे व माणसाचे स्वातंत्र्य, सत्पुरुषाची साधुता ह्या गोष्टी कुठे अल्प मोलाने मिळतात का ? त्या तशा विक्रीसाठी ठेवल्या तर काय होईल ? मूल्यांची जाणीव गेली, आत्म्याऐवजी शरीरावर व चैतन्या-ऐवजी जडावर माणसे प्रेम करू लागतात म्हणजे ती सर्वस्वाचा बाजार मांडून बसतात. त्या सवंग बाजारात शेवटी आपल्या पदरात काय पडते हे पहायचे आहे का ? डोळ्यावरचे पडदे उघडा आणि पहा तर—

पु. भा. भावे

डोंबिवली

७ जानेवारी ७०

# ग्रॅण्ड रिडक्शन सेल / शं. ना. नवरे

तीन अंकी

सहा दुकानी

स्वतंत्र नाटक

काळपुरुष : वर्षामागून वर्ष, ऋतूमागून ऋतू मी भटकतोय.
सूर्य उगवायचा थांबत नाही.
पृथ्वी फिरायची थांबत नाही.
मी भटकायचा थांबत नाही.
(ऐकतो) काय विचारलंत ? किती वाजले ? कसला क्षुद्र प्रश्न विचारलात. प्रश्न असा फेकावा की प्रश्नचिन्हाच्या गळाला लागण्यापूर्वी उत्तरानं आपला मेंदू शिणवून घ्यावा. ह्या काळपुरुषाला सवाल काय, तर किती वाजले. उद्या विचाराल, तुझं वय काय ? आयुष्याच्या परीक्षेला शंभर वर्षं ठेवलेली तुम्ही माणसं...तासामिनिटाचे हिसाब तुमचे. माझे जबाब शतकाचे. सवय नाही मला वय मोजण्याची. कारण पृथ्वीचा आणि माझा एकाच क्षणी जन्म झाला. तेव्हा देऊन टाकला शब्द पृथ्वीला, हा काळपुरुष तुझ्या संगतीनं, बांधलेल्या गतीनं, फिरत राहील. मी फिरस्ता, मी विक्रेता...भरवतो मी बाजार, हजार वस्तू विकायला ठेवून. इतकी शतकं भटकतोय, रांगणारी पृथ्वी मी पाहिली आहे. हलणारी पृथ्वी मी बघितली आहे. आता धावणारी, पळणारी पृथ्वी मला बघावी लागतेय. असाही होता एक काळ, जेव्हा माणूस माणूस होता. दिसायचा तसा असायचा आणि असायचा तसा दिसायचा. रहायचा घरात, चार भिंतींच्या आत...काय विचारलंत ?

घरात काय होतं त्याच्या ? (हसतो) घरात प्रेम होतं, आपुलकी होती, कायदा होता तशी माणसकी होती; आदर, श्रद्धा, त्याग यांची श्रीमंती होती; गरजा फार नव्हत्या म्हणून कशाची क्षिती नव्हती. काय म्हणालात ? येत होतं का कोण बाजारात ? अर्थात. ती माणसं कधीतरी यायची, गरजेची वस्तू घ्यायची, माझी गाडी भरलेली असायची, भरलेलीच रहायची...पण मग अचानक बाजारात सुटला झंझावात. एकजण बोलला दुसऱ्याला, दुसरा तिसऱ्याला...हजारावा एकहजाराव्या एकाला. म्हणे, जगाला वेग आला...घरं सोडून माणसं बाजारात घुसली. दिसली गोष्ट उचलू लागली, सकाळपासून रात्रीपर्यंत...रात्रीपासून सकाळपर्यंत. उन्हाळ्यापासून पावसाळ्यापर्यंत, पावसाळ्यापासून हिवाळ्यापर्यंत, आणि पुन्हा हिवाळ्यापासून उन्हाळ्यापर्यंत. एकच वेड लागलं, एकच ध्यास जडला. क्षणापूर्वीचा माणूस गिऱ्हाईक झाला, गिऱ्हाईक झाला आणि विक्रेतासुद्धा. घ्यायच्या नाहीत त्या वस्तू घेऊ लागला. विकायच्या नाहीत त्या वस्तू विकू लागला. अमोल वस्तू मातीमोल झाली. माझ्या गाडीत...मोडीत निघालेली वाटेल ती गोष्ट पडू लागली, पडता पडता प्रत्येक गोष्ट खरेदली गेली. कुणी श्रद्धा विकली तर कुणी माया, कुणी प्रेम घेतलं तर कुणी काया...(सुस्कारा सोडतो) पृथ्वीला शब्द दिलाय म्हणून हे भटकणं, उघड्या डोळ्यांनी बघणं. थोडंसं सुख आणि बरंचसं दु:ख. बघता बघता घरं नाहीशी होतात, तिथं उभी राहातात दुकानं...जगणारी लाचारीनं. बघा, बघा एकदा डोळे फाडून, मनाची दारं सताड उघडून.

(याच क्षणी मागला पडदा उघडला जातो. पहिले दुकान मांडलेले दिसते. दुकानात दिसणारा 'तो' पुतळ्यासारखा बसलाय.)

दिसतील केवळ दुकानं— मोहाच्या, स्वार्थाच्या झगझगीत प्रकाशानं उघडे डोळे आंधळे करणारी. दुकानापुढे वळवळणारी

रांग आहे– दंभाची, खोट्या ऐश्वर्याची... अपमानाची, मत्स-राची... अहंकाराची, विषयाची; आणि शेवटी उभा आहे पश्चात्ताप– हातात माप धरून पापाचं...बाजारात माणसांचा सागर उसळलाय...त्यात हरवलाय माणूस असलेला माणूस. थेंबासारखा हरवला. देत नसाल किंमत माझ्या शब्दांना, तर. नुसते बघा दाही दिशांना केवढा पसरलाय बाजार, अजगरा-सारखा...सारं सारं विकायला आलंय...बायकांचं सौंदर्य; घराचं पावित्र्य...आदराचं, श्रद्धेचं स्थान आणि प्रचंड ज्ञान... हो...हो...कलावंताची कला आहे आणि विचारवंतांची विद्वत्ता देखील...म्हणाल ते इथं आहे...अगदी माणूससुद्धा कागदी पैशात विकला जातोय मी फिरस्ता, मी विक्रेता, भरवतो मी बाजार सस्ता, हजार वस्तू विकायला ठेवून...

(काळपुरुष गाडी घेऊन दुसऱ्या बाजूने जातो. आता रंग-मंचावर दिसणाऱ्या दुकानावर प्रकाशझोत पडतो. दुकानातला 'तो' हालचाल करू लागतो.)

म. से. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
क्रा. क्र. २०८५५ नों. दि. ७।५।८९
वि. ....ना।.२८. क्र. ....................

# अंक पहिला : दुकान पहिले

अति मध्यम स्थितीतला संसार. भिंतीवर काही चित्रे लावली आहेत. थोडेसे फर्निचर, पण त्यात रसिकता नाही. काहीसा भडकपणाच. 'तो' मधल्या टेबलाशी बसून पत्त्यांचे बंगले बांधतोय. बराच वेळ झाला असावा. तो मध्येच जाऊन दार उघडतो, कुणाची तरी वाट पाहतो. परत येऊन बंगले बांधू लागतो, जागा बदलतो. तो पत्ते मांडत असतानाच दार लोटून ती आत येते. बावीस-तेवीस वर्षांची, आकर्षक, कपडे बरेचसे भडक, चेहऱ्यावर संताप.

ती : दार उघडंच होतं.

तो : (एकदम पुढे जातो. तिच्या खांद्यावर हात ठेवतो. तिचं रूप न्याहाळतो.) सो...सक्सेसफूल ?

ती : (त्रयस्थपणे) आताच कसं सांगू ? (त्याचे हात हळूच दूर करते. आता येऊन पलंगावर बसते.) हुश्श...

तो : (तिच्याकडे एकटक पाहतो) वंडरफूल. ए, इंटरव्ह्यूच्या वेळी तुला अशी पलंगावर पाहिली असती ना तर ताबडतोब तुला सिलेक्ट केलं असतं (ती थंडच, तो हसतो.) ए, सांग ना,

कसा झाला इंटरव्ह्यू ?

ती : ठीक.

तो : किती मुली आल्या होत्या एकंदर ?

ती : असतील आठ-नऊ

तो : (जरा काळजीत) आठ-नऊ ? जागा किती– दोनच होत्या ना?

ती : मला माहीत नाही. तुम्हालाच माहीत पाहिजे.

तो : (जरा रागाने) हो, मलाच माहीत पाहिजे.

ती : कारण; त्या स्टोअरमध्ये नोकऱ्या आहेत, तिथं पगार चांगला आहे, जाहिरात न देता तिथं मुली घेणार आहेत...तुम्हीच तर तास न तास वर्णन करत होता.

तो : तर दोन जागा आणि आठ-नऊ मुली, तुला कितपत चान्स वाटतो ? (लाडात येत) बाकी तुझ्याइतकी दुसरी कुणीच सुंदर नसेल, होय ना ?

ती : त्यांच्या सुदैवानं आणि माझ्या दुर्दैवानं ते खरं म्हटलं पाहिजे. माझ्याइतकी नटवलेली दुसरी कुणीच नव्हती. तिघी तर अगदी साध्या होत्या, दोघींच्या बरोबर त्यांचे यजमान आलेले, बाकीच्या...

तो : (हसतो) थोडक्यात, तुझ्याखेरीज बाकीच्या सगळ्या काकूबाईच होत्या म्हण की...

ती : अं ? हो...त्यांच्या यजमानांनी त्यांना असं नटायला लावलं नव्हतं, वेश्येसारखं. त्यांची अशी झिरझिरीत साडी नव्हती. असा बिनबाह्यांचा, मुद्दाम मोठ्या गळ्याचा शिवून घेतलेला ब्लाऊज नव्हता...थोडक्यात, बाजारात मांडण्यासाठी कुणीच आपल्या बायकोला अशी सजवली नव्हती– बाहुलीसारखी... हं, असतील बिचाऱ्यांना नोकऱ्या...

तो : माझ्या बेकारीबद्दल टोमणे देण्याचं काही कारण नाही. बेकार असलो तरी मी स्वत:चं खातोय. गेल्या चार महिन्यांत एकदा तरी तुझ्याकडून पैसे मागितले ? तुझ्याकडून नाही आणि तुझ्या बा...

ती : त्यांना आम्ही अण्णा म्हणतो.

तो : तुम्ही त्यांना काय म्हणता त्याच्याशी मला कर्तव्य नाही. त्या माणसाचा आणि माझा संबंध नाही.

ती : बरोबरच आहे, कारण ते भल्या मार्गाचा सल्ला देणार. जमिनीवरून चालणाऱ्या अण्णांना तुमच्या लाखो रुपयांच्या उलाढालीची स्वप्नं कशी कळावीत ? बायकांच्या रूपाचं, देहाचं प्रदर्शन मांडणाऱ्या तुम्हाला मदत कशी करावी ?

तो : शट् अप आय से ! आय हेट युअर फादर, आय हेट युअर ब्रदर, आय हेट...

ती : असली वाक्यं आम्हा बायकांना सुद्धा हजारो वेळा उच्चारावीशी वाटतात. पण वाटतं ते सगळंच बोलून टाकायला आम्हांला बंदी असते...अशा वेळी तुम्हा पुरुषांचा इतका हेवा वाटतो... स्वप्नातल्या लाखो रुपयांबद्दल तुम्ही कसं मनमोकळेपणी बोलत असता...स्वतःचा बंगला, स्वतःची मोटार...नोकर चाकर...(हसते.)

तो : (चिडतो.) माझी स्वप्नं ?

ती : हो, सगळी खरी खरी स्वप्नं...कशाला हवे आहेत हो आपल्याला लाखो रुपये ?

तो : सुखानं जगण्यासाठी.

ती : लाखो रुपयांनी सुख मिळत असतं तर कोट्याधीश असे दुःखी दिसले नसते. तुम्हाला चांगली नोकरी होती...

तो : चांगली म्हणजे महिन्याला तीनशे रुपये देणारी ना ?

ती : हो, तीच. मी सुखी नव्हते तेव्हा ?

तो : पण मी नव्हतो. मला लाखो रुपये हवे आहेत.

ती : कशावर मिळवणार आहात हे लाखो रुपये ?

तो : मी कशावरही मिळवीन. तेवढी हिंमत आहे माझ्या अंगात.

ती : (हसते) हिंमत ? आज दिसली की तुमची हिंमत. इंटरव्ह्यूच्या वेळी माझ्याबरोबर का नाही आलात ?

तो : इंटरव्ह्यू तुझा होता, माझा नव्हता.

ती : पण मला तुमची सोबत हवी होती.

तो : सोबत ? (हसतो) भर दिवसा एवढ्या मोठ्या गर्दीच्या स्टोअर-मध्ये तुला सोबत हवी होती ?

ती : नटलेल्या आणि नटवलेल्या स्त्रीला खरी म्हणजे दोनदाच सोबत हवी असते– भर दिवसा आणि मोठ्या गर्दीत. अशा बाहुलीचा मालक सोबतीला नसला की प्रत्येक नजर ही बाहुली आपलीच म्हणून लगट करते. इंटरव्ह्यूच्या वेळीसुद्धा तो मॅनेजर...

तो : (उत्सुकतेने) काय...काय विचारलं तुला ?

ती : माझं नाव विचारलं आधी, मी मिसेस अमुक अमुक म्हटलं, तशी तो हसला, म्हणाला, ते मिसेस बिसेस नको, फक्त नाव सांगा.

तो : हं...

ती : मग विचारलं, पूर्वीचा काही अनुभव ? अनुभव म्हणताना त्याचा रोख निराळाच होता. मी म्हटलं, मी कधी नोकरी केलेली नाही. ही असली नोकरीदेखील माझ्या यजमानांच्या इच्छेसाठी...

तो : काही अडलं होतं हे सांगण्याचं ?

ती : चुकलंच माझं. कारण त्याला हे उत्तर आवडलं. तो म्हणाला, तुम्ही सेल्सगर्लची नोकरी करावी अशी त्यांची इच्छा आहे, म्हणजे ते भलतेच उदार दिसतात.

तो : मग तू काय म्हणालीस ?

ती : मी ? मी म्हटलं, तुमच्या बोलण्याचा अर्थ कळला नाही मला. तर... (थांबते.)

तो : तर काय ?

ती : ऐकायचंय ?

तो : हो.

ती : (एका दमात) तर तो म्हणाला, आमची ही पुरुषांची भाषा तुमच्यासारख्या सुंदर स्त्रीला समजत नाही म्हणजे आश्चर्य आहे...असा संताप आला होता. वाटलं, तिथल्या पेपरवेटनं त्याचं थोबाड फोडून काढावं...मी कष्ट विकायला गेले होते.

आणि तो माझं रूप विकत घ्यायला पाहत होता...सारखा ओरबडत होता मला आपल्या नजरेनं...तुम्हाला घाबरूनच मी संताप आवरला हो...शेवटी तो म्हणाला, आमच्या दोन्ही जागा भरलेल्या आहेत. मनात म्हटलं, देव पावला. तर म्हणाला, तुमची स्पेशल केस म्हणून स्टेनोग्राफरची नवी जागा...

तो : स्टेनोग्राफर ? पण तुला कुठं येते स्टेनोग्राफी ?

ती : मी म्हटलं तसं, तर तो तेच म्हणाला, आमची पुरुषांची भाषा वेगळी आहे म्हणून. ही कोणती भाषा आहे हो तुमची ? मला कळेनासंच झालंय...मी सारखी विचार करतेय इथं येईपर्यंत. नको असताना तुम्ही मला हे कपडे घालायला लावलेत तेव्हा-सुद्धा तुम्ही मला जे सांगत होता; मला काही पटवून देत होता ना ती भाषा मला कळली नव्हती. (तो गप्पच) सांगा ना, काय अर्थ असतो तुमच्या बोलण्यात ? तुमच्या ह्या भाषेतल्या शब्दांना सुगंध असतो. पण सारखी भीती वाटत राहाते, त्या मागे विषारी काटे असतील. सांगा...सांगा ना...

तो : (कोरडा) काय सांगू ? तसं काही नसतं ग...

ती : तसं काही नसतं तेव्हा भीतीही नसते. मला खूप भीती वाटतेय.. मी ही नोकरी केलीच पाहिजे का ?

तो : हो.

ती : कशासाठी ?

तो : सध्या आपल्याला पैसे हवे आहेत म्हणून...हातात पैसे आले की मीच सांगेन तुला ही नोकरी सोड म्हणून.

ती : त्यापेक्षा तुम्ही दिलेला राजीनामा परत घ्या ना.

तो : ते शक्य नाही.

ती : का ?

तो : सांगू ? मी...मी राजीनामा दिला वगैरे सगळं खोटं. त्यांनीच मला कामावरून कमी केलंय. का ? तर म्हणे मी उद्धट आहे, कामात माझं लक्ष नाही. तीनशे रुपयांसाठी कुणी आणि किती लक्ष घालावं ?...अं हं...मी रमतच नव्हतो तिथं. तिथं

गुदमरल्यासारखं व्हायचं, दुपारी लंचला म्हणून बाहेर जावं तर रस्त्यावर माझ्यापेक्षा कमी लायकीचे लोक मोटारी उडवताना दिसायचे. भारी भारी वस्तू खरेदी करताना; उंची, थंडगार हॉटेलात चमचमीत पदार्थ खायला जाताना दिसायचे. आपल्या आलिशान जागेत सकाळी उशिरा उठावं, पेपर वाचत संथपणे नास्ता घ्यावा. मग मोटारीतून भटकायला निघावं, दुपारी सिनेमा पाहावा. संध्याकाळी एखाद्या महागड्या क्लबवर मद्य घेत पत्ते खेळावेत, रात्री केव्हाही झोपी जावं...अगं, एखाद्या राजाचं ऐश्वर्य मला का मिळू नये ?...डोकं पेटून जायचं. वाटायचं, घरातून एकदम ऑफिसात आणि ऑफिसातून एकदम घरी यावं, दारंखिडक्या घट्ट लावून बसावं. त्या सुखासीन आयुष्याचा झरोकादेखील दृष्टीला पडू नये...त्या दिवशी दुपारी आमच्या वर्गातला बाबू दिसला. चकचकीत मोटारीत बसला होता. त्यानं ओळख दाखवू नये म्हणून मी पुढं सरकणार इतक्यात त्यानं हाक मारली...मोटारीचं दार उघडलं. माझे कपडे इतके दरिद्री होते की त्या मोटारीला लाज वाटावी. घेऊन गेला मला तो एका हॉटेलात, जेवायला घातलं तर साठ रुपये बिल. माझा जवळजवळ आठवड्याचा पगार...

ती : तुमचा हा बाबू काय करतो ?

तो : (हसतो) आपल्या गावचा म्हणे मोठा कार्यकर्ता झालाय. फक्त ग्रामसेवा करतो...हा हरामखोर बाब्या माझे पेपर्स बघून पास होत होता...दमडीची बुद्धी नव्हती...त्यानं मला ऑफिसात आणून सोडलं...थोडा उशीर झाला होता. फक्त दीड हजार रुपये मिळवणाऱ्या फडतूस साहेबानं विचारलं, इतका उशीर का झाला ? माझं डोकंच तडकलं. म्हटलं, मी ह्या तुमच्या नोकरीवर लाथ मारतो...झालं, मी उद्धट ठरलो...मलाच त्यांनी लाथ मारली. पण...पण हे पहा, मी सूड घेतल्याशिवाय राहणार नाही.

ती : (दचकून) कुणाचा सूड घेणार तुम्ही ?

तो : माझा. माझ्या आयुष्याचा... माझ्या दारिद्र्याचा... त्या बाब्याच्या श्रीमंतीचा...मला आता बिझनेस करायचाय...

ती : कसला ?

तो : तोच विचार चाललाय. हातात हजारो रुपये खेळणारा बिझनेस शोधायचाय मला.

ती : पण त्याला भांडवल लागतं.

तो : म्हणून तर म्हटलं, काही दिवस तू नोकरी करून पैसे साठव.

ती : तुम्हांला दुसरं काही करून...

तो : खूप सोपं असतं हे बोलायला, पण मी दुसरं काय करू शकणार ? मी कुणी कलावंत नाही, शेतात काम करणं मला ठाऊक नाही. किंवा... खरं तर मला काहीच येत नाही... फक्त नाइलाज म्हणून मी जगून दाखवतोय...(बहुतेक माणसं अशीच माझ्यासारखी(शून्य किमतीची असतात. भेटलं नशीब, तर त्याचा हात धरून जगत राहातात.)मी काय करू शकतो ? मी...मी कष्ट करू शकतो तेही मानसिक. हमाली करणं, बूट पॉलिश करणं मला जमणार नाही. कारण माझ्या शिक्षणानं शारीरिक कष्टांची राख झालीय. (तिच्याजवळ जातो. तिच्या खांद्यावर हात ठेवतो.) वाटलं, खूपदा वाटलं मला, तुला कसली नोकरी करायला लावू नये...पण.

ती : पण काय ?

तो : पण तू शिकलेली नाहीस. आपल्या घरात एकच वस्तू आहे आता– तुझं रूप...

ती : तेच विकायचं ?

तो : स्वच्छ साधा अर्थ तोच आहे, पण तो बोलता येत नाही.

ती : का ?

तो : का ? सारखे प्रश्न, प्रश्न, आणि प्रश्न... उत्तर नसलेले प्रश्न. उत्तर हरवलेले प्रश्न...उत्तर नको म्हणणारे प्रश्न... आजची दुनिया फक्त प्रश्नांचीच आहे का ?... हा सुद्धा पुन्हा प्रश्न... (एकदम) आता माझ्याकडे एकच उत्तर आहे, त्यानं हवं तर

प्रश्न सुटावा नाहीतर राहावा तसाच...मला सुख हवंय, मला ऐषआराम हवाय, मला आजचा परमेश्वर– पैसा हवाय; कुठूनही कसाही... पण कितीही नाही. तो भरपूर हवाय, आणि तो लौकर हवाय... दुनियेच्या आजच्या वेगानं हवाय... मी नोकरी करून पैसा मिळवणं हा जुगार आहे... खात्रीची गोष्ट एकच आहे, तुझं रूप...

ती : अशानं मिळणार आहे का हे सारं ?

तो : जग तरी तेच बोलतंय. तीन पानांच्या डावातच बघ... हातात चांगली पानं असूनही पैसे नाहीत म्हणून पॅक म्हणावं लागतं, आणि फत्री पानं हाती असलेला पैसेवाला पैसे कमावून जातो. का ? आहे उत्तर ? पैसा नाही तर काही नाही, सुख नाही.

ती : पण मी आज देखील सुखी आहे. वाटतं, तुम्ही नोकरी करावी, मी घर सांभाळावं, संध्याकाळी तुमची वाट बघत बसावं...

तो : आणि एक दिवस असंच दारिद्र्यात मरावं... हे, हे काय घर आहे ? आपल्याला चांगला फ्लॅट हवा, फर्निचर हवं, फ्रीज, रेडिओग्राम, टेलिफोन, मोटार...बस्स ! हे लाईफ बदलून टाकायचं...मोठ्ठा बिझनेस, सुंदर बायको, सुखाचा संसार...

ती : (रडकुंडीला येत) तुम्हाला मी हवी असेन, हा संसार हवा असेल तर मला त्या मॅनेजरकडे नोकरीला लावू नका हो... मला...मला खूप भीती वाटतेय त्याच्या नजरेची... त्याचे ते भयंकर डोळे सारखा पाठलाग करताहेत माझा.

तो : अच्छा...तर तू नोकरी करणार नाहीस. मला असंच दारिद्र्यात...

ती : हे दारिद्र्य आहे ? हीच श्रीमंती आहे. आपलं इवलंसं घरकूल, आपलं एकमेकांवरचं प्रेम... पुढंमागं घरात येणारी गोजिरवाणी पावलं...

तो : (संतापून) ती पावलं नको आहेत मला. आय जस्ट हेट धिस व्हेरी आयडिया. तुम्ही बायका कितीही शिकलात तरी तुमच्या सुखाची उडी ह्या पोरांच्या कुंपणापर्यंतच...

ती : हेच, एवढंच खरं बोललात. आम्हाला पूर्णपणा शिक्षणानं येत नाही, पैशानं येत नाही, तो येतो फक्त नव्या जीवाला जन्म देऊन.

तो : तू स्वतःला कोण गडकऱ्यांची सिंधू समजतेस ?

ती : आम्ही सगळ्या स्त्रिया आतून सिंधूच असतो. काहींना तसं सांगायची लाज वाटते, काहींना वाटत नाही. त्यांतली माझ्यासारखी एखादी लाज सोडून बोलतेदेखील...आणि तुम्ही पुरुष सुधाकर आहात-- पटकन व्यसनाचा मोह पडणारे...

तो : मी...मी...मला कसलं व्यसन आहे ? मी दारू पीत नाही, रेसला जात नाही...जुगार...

ती : मित्राकडे पत्ते ?

तो : आज येतेस माझ्याबरोबर त्याच्याकडे ? विचार त्याला मी पत्ते कसे खेळतो ते. (विषण्णपणे) ते सगळेजण पैसे लावून खेळत असतात आणि मी फक्त दुरून बघत असतो. कंटाळा आला की एकटाच बंगले बांधत राहातो... समोर शंभराची नोट ठेवल्याशिवाय कुणाला खेळायलाच घेत नाहीत ते. इतरांना कष्टानं मिळणारा पैसा पत्त्यांच्या डावात कसा उधळला जातो ते मी पाहात बसतो...तास न तास...आणि तू माझ्यावर आरोप करतेस...मी जुगार खेळतो, पत्ते खेळतो...

ती : (अनुकंपित होते) मग मी म्हणते, इथं घरात बसून राहावं...

तो : आणि काय करावं ? हे दारिद्र्य पाहून डोळे शिणवून घ्यावेत ? डोकं फोडून घ्यावं ? त्यापेक्षा तिथं मी जास्त सुखात असतो.

ती : पण कधीतरी मोह होणारच तुम्हाला खेळण्याचा... तुम्हाला पैशाचं व्यसन लागतंय...पैसा परमेश्वर झालाय तुमचा. त्याचं भजन करायचं, पूजा करायची आणि तो भेटत नाही म्हणून रडायचं... पैसा एकदा हातात आला ना की साथीला ही सगळी मंडळी जमतात, दारू, रेस, जुगार...

तो : शट अप आय से, शट अप...ह्या कपड्यात असा उपदेश कर-

ताना तुला पाहिलं की हसूच येतं.

ती : खरंच आहे, ह्या भडक कपड्यात कटू शब्द बोलायचे नसतात, मनातलं सांगायचं नसतं... दुसऱ्याला आवडेल ते बोलायचं, माल खपवायचा. सगळा बाजार... गोड बोलायचं, माल खपवायचा, पैसा मिळवायचा... तुम्हाला... तुम्हाला माझी विक्री करायची आहे ना ?

तो : विक्री ?

ती : विक्री नाहीतर काय ? ही सहाशे रुपयांची नोकरी माझ्या फक्त रूपावर मिळणार आहे. किती शिकलेय मी ? काय येतं मला ? काही नाही. शून्य. आज शेकडो सुशिक्षित पुरुष बेकार आहेत, त्यांना कुटुंब पोसण्यासाठी नोकऱ्या हव्या आहेत.

तो : त्या पुरुषांना ही नोकरी जमणार आहे ? स्टोअरमध्ये गिऱ्हाइकं येणार, किंमत न विचारता शंभर शंभर रुपयांच्या नोटा फेकणार ती काय ह्या पुरुषांच्या खडबडीत थोबाडांना पाहून ?

ती : तेच म्हणतेय मी. माझ्या रूपाकडे पाहून ती गिऱ्हाइकं पैसे फेकणार, नको असलेल्या वस्तू घ्यायला स्टोअरमध्ये पुन्हा पुन्हा येणार...मांडलाय बाजार. मी गोड हसायचं, गोड बोलायचं... आणि त्यांनी पैसे द्यायचे, जरासा शृंगार केला तर आणखी पैसे...

तो : (चिडून) हो, हो, तसंच. आजची दुनिया अशीच आहे. इथं असं वागलं नाही, असा बाजार मांडला नाही तर टाचा घासून मरावं लागेल...तू सुंदर दिसतेस, सुंदर हसतेस...

ती : ते केवळ तुमच्यासाठीच हवं. आणि तुम्ही तेच विकणार ? संध्याकाळी मी परत आले की तुमच्याकडे पाहून तसंच हसायचं, तसंच बोलायचं... ह्या गिऱ्हाइकाला पैसे न घेता सगळं सगळं द्यायचं, इतकाच फरक...चालेल तुम्हाला हे ?

तो : चालेल, चाललंच पाहिजे. आज सुखानं जगायचं असेल तर हे चालवून घेतलंच पाहिजे. (ती रोजचे कपडे घेते. अंगावरचे कपडे बदलण्यासाठी वळते.) कुठं चाललीस ?

ती : कपडे बदलायला.

तो : बदलायचे नाहीत हे कपडे.

ती : पण मला कंटाळा आलाय या कपड्यांचा. (वळते.)

तो : (तिच्या खांद्यावर हात ठेवतो) किती सुंदर दिसतेस तू ह्या कपड्यात. अशीच बसून रहा.

तो : (विरघळते) रागावलात ?

तो : हूं..

ती : माझ्यावर ?

तो : अंहं...माझ्यावर. ए, इथं अशी बस ना.

ती : इश्श. मला लाज वाटते.

तो : माझी ?

ती : अंहं...माझी. (तो हसतो.) मी इथंच बसून राहिले तर कामं कुणी करायची ?

तो : तुला एकदा नोकरी मिळाली ना की आपण नोकर ठेवू.

ती : काही नको, मी करीन सगळी कामं... (क्षणभरानं) आता बदलू कपडे ?

तो : आय से, नो.

ती : समाधान नाही झालं ?

तो : नाही. (तरीही ती उठते. तो एकदम चिडतो.) कपडे बदलू नकोस.

ती : म्हणजे ?

तो : त्याला मी चहाला बोलावलंय, तो एवढ्यात येईल.

ती : तो कोण ?

तो : (एकदम तिच्याकडे न बघता) तुझा बॉस. तुझ्या स्टोअरचा मॅनेजर.

ती : तो ?...पण...तुम्ही...

तो : माझ्या फ्रेंडच्या ओळखीचा आहे तो, त्यानं हे सगळं अॅरेंज केलंय. (दार वाजतं) आणि हे पहा, (दार वाजतं) त्याच्याशी म्हणजे बॉसशी नीट वागायचं. तुला ही नोकरी मिळालीच

पाहिजे. माझे सगळे प्लॅन्स त्याच्यावर अवलंबून आहेत...बोलू नकोस...तुझा सगळा लाडिकपणा (दार वाजतं) आलं लक्षात? (तिच्या कपाळावर आठी) थोबाडावरल्या त्या आठ्या काढ. आजची ही मीटिंग फुकट गेली तर (हसतो.) बघशीलच मी कसा आहे तो? (दार उघडायला जातो) या... या, तुमचीच वाट पाहातोय...(दारात बाबा. तो दचकतो) को... कोण? बाबा?

बाबा : अं? हो...

ती : बाबा? (ती पुढं जाते) असे मध्येच कसे आलात?

बाबा : यावं लागलं...कशी आहेस सूनबाई?

ती : ठीक... छान आहे की. भावजींचा अभ्यास कसा चाललाय? त्यांचं काही पत्र?

बाबा : परवाच आलं होतं. चांगला चाललाय अभ्यास. यंदाही स्कॉलरशिप मिळेल असं म्हणतोय... पोरगा स्वतःच्या हिमतीवर शिकतोय...यंदा चांगले मार्क मिळाले तर इंजिनिअरिंगला जाईल...

ती : तुमची प्रकृती...

बाबा : हं...ठीक आहे...

ती : पण वाटत नाही तशी...... (ती त्याच्याकडे बघते. त्याला बाबांचं येणं आवडलेलं नाही.) ब...बसा नं...चहा घेणार?

बाबा : घेईन थोडासा.

ती : (त्याला) तुम्ही घेणार? (तो गप्पच) तुम्ही घेणार चहा?

तो : (घुमेपणानं) नको.

बाबा : टाक त्यालाही. घेईल अर्धा कप माझ्याबरोबर.

तो : (रागानं) मला नकोय.

ती : (बाबांना) तुम्ही नका आग्रह करू. हल्ली ते चहा कमीच घेतात.

बाबा : का?

ती : (हसत हसत) चहा घेतला की त्रास होतो त्यांना. (त्याला)

हो की नाही ?

तो : ना—ही. मला चहा आवडतो. चहा घेऊन मला त्रास होत नाही. पण आता मला चहा नकोय.

ती : हे उगाच हं...

तो : मी उगाच कधी काही करत नाही.

बाबा : (विषय बदलण्यासाठी) हं...काय विशेष ? (तो गप्पच.)

ती : तसं काही नाही...अं ? हो... (त्याला) बाबांना आजची गोष्ट सांगू का ?

तो : तुला वाटेल ते कर, पण सगळं लौकर आटप. तो यायची वेळ झालीय.

बाबा : कुणी येणार आहेत ?

तो . (तिला) त्यांना म्हणावं, माझे— म्हणजे तुझे— बॉस येणार आहेत.

बाबा : म्हणजे तू काय नोकरी बिकरी ?

ती : अजून नक्की नाही. पण आज इंटरव्ह्यू झाला.

बाबा : कसली नोकरी आहे ?

ती : सेल्सगर्लची. एका मोठ्या स्टोअरमध्ये...तिथं श्रीमंत गिऱ्हाइकं येतात. त्यांना वस्तू दाखवायच्या, विकायच्या... पगार चारशे रुपये.

तो : महिन्याला.

बाबा : चारशे ? अगं पोरी, पण तिथं चांगली बी.ए., एम. ए झालेली माणसं लागत असतील.

तो : त्यांना सांग, तिथं फक्त मुलींना घेतात आणि त्याही सुंदर फॅशनेबल...

बाबा : आलं लक्षात. म्हणजे ती तसल्यापैकीच नोकरी. आणि ही नोकरी तू करणार ?

ती : म्हणून तर विचार चाललाय आमचा.

तो : आमचा नाही. माझं नक्की ठरलंय. आणि तुम्हांही तेच मत

हवंय मला...सांग त्यांना.

बाबा : पण.. म्हणजे...तिथली मालकमंडळी वगैरे वागायला...

ती : मी फक्त मॅनेजरला पाहिलंय...तो माणूस म्हणजे...(त्याच्याकडे बघते.)

तो : त्यांना चहा देतेस ना आधी ?

ती : हो...तुम्ही घेणार ना थोडा ?

तो : मी तुझ्या बॉसबरोबर घेईन, कळलं ? (ती आत जाते. त्याची चुळबूळ.)

बाबा : (अस्वस्थच) हं...काय म्हणतोएस ?

तो : (नाइलाजानं बाहेर पाहात) काही नाही.

बाबा : काम काय म्हणतंय ऑफिसचं ?

तो : नेहमीसारखं.

बाबा : सकाळी केव्हा बाहेर पडतोस ?

तो : मनात येईल तेव्हा...

बाबा : (त्याचा त्रयस्थपणा समजून) काय...आता काही वरचा चान्स बिन्स ?

तो : हं...

बाबा : वरची जागा म्हणजे काय ग्रेड ?

तो : अं ? दोन हजार...पाचशे...आठ हजार...इ.बी... पन्नास हजार...दोन–अडीच लाख...लॉटरीचं बक्षीस. माझी नोकरी गेलीय हे माहीत असताना विचारण्याचं काही अडलं नव्हतं !

बाबा : (चमकतात) आँ ? काय म्हणतोएस काय ? रामाशपथ, मला काही माहीत नाही...काहीतरी बोलायचं म्हणून आपलं सहज विचारलं. तुला राग आला असेल तर–

तो : तुमची सगळी नाटकं कळतात मला. हिनंच तुम्हाला पत्रानं कळवलं असेल...

बाबा : रामाशपथ नाही.

तो : राहिलं...(अस्वस्थपणे खिडकीशी जातो.)

बाबा : केव्हासे येणार आहेत ते ? (तो गप्पच)आजचं जरा वर्तमान-

पत्र...(तो गप्पच) इथं हल्ली हवा बाकी पूर्वीसारखी नाही राहिली... (तो गप्पच. काही क्षण तसेच निघून जातात, दोघेही अस्वस्थ...दार वाजतं, बाबा उठतात.)

तो : (बाबांना बसून रहायची खूण करत) आलो हं...

बाबा : मी जाऊ की–

तो : आता आलाच आहात, त्यांच्याबरोबर चहा घ्या आणि मग पाच एक मिनिटांनी...म्हणजे काय आहे की आम्हाला तिघांना जरा खाजगी– (दार वाजतं. तो दाराशी जाऊन दार उघडतो, बाहेर जातो.)

तो : (बाहेर) कोण पाहिजे ?

कुणीतरी : (बाहेर) रिसबूड इथंच राहातात ना ?

तो : (बाहेर रागानं) कुणी सांगितलं ?

कुणीतरी : रिसबुडांनीच. कमाल आहे...म्हणजे ते इथं राहात...

तो : नाहीत.

कुणीतरी : मग कुठं राहतात ?

तो : मला माहीत नाही. सॉरी (रागानं आत येतो. दाणकन दरवाजा लावतो.) भलत्या वेळी अशी एकेक रत्नं येतात .. (ती चहा आणते, कपडे बदललेले आहेत.)

बाबा : (तिच्या हातातला कप घेतात) तू नाही घेतलास चहा ?

ती : नकोय मला.

बाबा : फक्कड झालाय चहा...

तो : (तिला) माझी नोकरी गेल्याची आनंददायक बातमी तूच यांना कळवलीस ना ?

बाबा : रामाशपथ...

तो : (तिला) त्यांना म्हणावं, शपथा घेऊ नका, खोटया.

ती : मी...मी कुठं कळवलं ? त्यांना कुठून तरी कळलं असेल.

बाबा : रामा...(थांबतात) अग, मला ठाऊक देखील नव्हतं इथं येईपर्यंत...मला काय करायचंय विचारून ? मी आहे माझ्या काळजीत...सूनबाई, कपडे बदललेस, आता कसं बरं वाटलं.

(ती मोकळेपणी हसते.)

तो : (चिडून) कपडे का बदललेस ?

ती : मला नाही ते कपडे आवडत.

तो : बाबा आल्यावर तुला कंठ फुटलाय, मला ठाऊक आहे.

बाबा : अरे, पण...

तो : (तिला) त्यांना म्हणावं, हा आपल्या दोघातला खाजगी प्रश्न आहे. मध्ये बोलू नका. (ती गप्पच) सांग त्यांना आधी.

ती : त्यांनी ऐकलंय...

तो : तू सां...ग.

ती : (बाबांना) तुम्ही काही बोलू नका बाबा. हल्ली किनई, एवढ्या तेवढ्या कारणावरून हे...

तो : शट अप आय से...तो गाढव अजून येत का नाही ? तू काही म्हणालीस त्याला ?

ती : येणार हे देखील ठाऊक नव्हतं मला.

तो : मी जाऊन फोन करून येतो त्याला, आजच्या आज सगळं ठरलं पाहिजे...मी येईपर्यंत तू पुन्हा कपडे घालून तयार राहा मघाचेच. (रागानं बाहेर जातो.)

बाबा : हे सगळं काय पाहातोय मी पोरी ?

ती : आजच्या जगातला हा बाजार आहे ! माझं रूप विक्रीला निघालंय...काय होणार आहे–

बाबा : रामावर भिस्त ठेवायची .

ती : एका रावणाला राम पुरून उरला, आता बघावेत तिथं रावणच झालेत. दहा तोंडांनी ते दहा गोष्टी बोलतात. वीस डोळ्यांनी वीस स्त्रियांची विटंबना करतात...एकटा राम काय करणार आहे ?

बाबा : तू नोकरी करणार नाही म्हणून सांग. मन खंबीर कर. त्यापेक्षा कुठं मास्तरीण हो... कुणाच्या घरी पोळ्या लाट... स्वाभिमानाने जग...पापाशी युद्ध करायला तयार हो.

ती : त्यांना ते चालणार नाही. त्यांना श्रीमंताकडचे वारशे रुपये

हवे आहेत.

बाबा : स्वत: तो काय करणार आहे ?

ती : बिझनेस. कसला बिझनेस आणि काय ? ह्या सोन्यासारख्या घराची राख होईलसं वाटतं...

बाबा : तो कोण येणार आहे आता ?

ती : त्या स्टोअरचा मॅनेजर. बाबा, त्याच्या डोळ्यांची मला इतकी भीती वाटतेय हो ..

बाबा : आणि त्याच्यासमोर मघाचेच कपडे घालून तू उभी राहाणार?

ती : मग काय करू ?

बाबा : कशाला येणार आहे तो ?

ती : ह्यांचं आणि त्याचं काय ठरलंय कुणास ठाऊक ? तुमच्या-जवळ बोलायची लाज वाटते...पण नाइलाज झालाय माझा... हे म्हणाले आहेत त्याच्याशी मी नीट वागायचं, लाडीकपणे बोलायचं...

बाबा : तुला काय 'ही' करायचा विचार आहे त्याचा ?

ती : ते म्हणतात, आजची दुनिया अशीच झालीय...

बाबा : झालीय खरीच...बघावं तिथं बाजार मांडलाय...कुणाजवळ श्रद्धा नाही, प्रेम नाही, आदर नाही...उठतो माणूस तो जवळची वस्तू विकायला बघतो...नाहीतर दुसऱ्याची वस्तू विकत घ्यायला बघतो...मी देखील हे भोगायला लागलोय... शाळा सोडून इथं मध्येच का आलोय ठाऊक आहे ?

ती : (घाबरून) का ? काय झालंय ?

बाबा : मला सस्पेंड केलंय...इतक्या वर्षांच्या सचोटीच्या नोकरीवर पाणी पडलंय...कुठं तोंड काढायला जागा नाही...नाहीतर तुझ्या नवऱ्यानं केलेला अपमान असा गिळला असता ? सवय करतोय सगळ्याची...नाही पोरी, ज्याला बाजार मांडायचा नाही, त्याला या जगात जागा नाही राहिली...घरं ? घरं कुठं आहेत हल्ली ? सगळी दुकानं.

ती : तुम्हाला सस्पेंड का केलं ?

बाबा : का केलं ? मी दुकान मांडलं नाही म्हणून. मी शिक्षकाच्या पेशाशी प्रामाणिक राहिलो म्हणून. मी लाच नाकारली म्हणून. एका मोठ्या माणसाच्या मुलाला कॉपी करताना मी पकडलं, हाच गुन्हा...त्या मोठ्या माणसानं मला घरी बोलावलं, मी नाही गेलो. मुलाच्या चुकीबद्दल त्याला कान धरून माझ्याकडे आणायचा तर मला घरी बोलावलं. नाही... सरळ नाही येत म्हणून सांगितलं. मग स्वतः घरी आला, पैसे घेऊन. म्हणाला, सगळे हेच करतात, तुम्हीसुद्धा हे करा... म्हणजे पाप. मी म्हटलं, पैसे मोजून त्याला एकदम सगळं शिक्षणच का विकत घेऊन देत नाही ? शाळा नको आणि कॉलेज नको. मग मला दम भरला त्यानं म्हणाला, वरपर्यंत माझ्या ओळखी आहेत. तुम्हाला नाही भीक मागायला लावलं तर नाव बदलीन...

ती : मग ?

बाबा : जिंकला तो. तू म्हणालीस ते खरं आहे पोरी. (पापांचे खूप रावण निपजले की पुण्याचा एकटा राम पार हरतो..)

ती : तुम्ही धीर धरा बाबा...

बाबा : मी तुला म्हटलं, तू मला म्हणालीस, धीर धरा...आता गळ्याशी आलंय... धाकट्याला स्कॉलरशिप मिळतेय तीसुद्धा बंद करण्याचा त्या मोठ्या माणसानं चंग बांधलाय... जिवाशी बेतलं तेव्हा माकडीणीनं आपलं पोर पाण्यात बुडवलं... मी माझी तत्त्वं पाण्यात बुडवायला निघालोय...कारण मला जगायचंय...मला कुणाचा पाठिंबा नाही...मी व्यवहारशून्य म्हणून प्रत्येकजण कोकलून सांगतोय...आज तत्त्वशून्य माणसं जगतात पण व्यवहारशून्य माणसं नाही जगत...इथं मी का आलोय सांगू ?

ती : हं–

बाबा : माझ्यासाठी कुणाचा तरी वशिला लावायला.

ती : बाबा–

बाबा : हो. नाइलाज झालाय...म्हटलं, तुझ्या नवऱ्याला विचारू;

त्याच्या ओळखीचा कुणी भेटेल–

तीः (दीर्घ सुस्कारा सोडते) आणि मी मन खंबीर करायचं... पापाशी युद्ध करायला तयार व्हायचं...

बाबा : पोरी, आपल्याला जे जमत नाही ना ते कुणीतरी अट्टाहासानं करावं असं वाटतं आपल्याला. मला हे जमणार नाही. तू तरी करून दाखवावं म्हणून बोललो...फक्त समाधानासाठी,खोट्या आशेने... (ती आत जायला वळते) कुठं निघालीस ?

तीः कपडे बदलायची आठवण करून दिलीत ना !

बाबा : पोरी– (गहिवरतात)मी दुबळा आहे...मी एवढंच सांगतो... हे घर सोडू नकोस...नवऱ्याच्या कलानं वाग...स्वतःला, स्वाभिमानाला जप–

ती : (आत जाता जाता) म्हणजे जपण्याचा जरासा प्रयत्न करून बघ, असंच ना ?

बाबा : प्रभु राम देईल बुद्धी तसं कर...मी कोण उपदेश करणार ?

स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे
रघुपतीविण आता चित्त कोठे न राहे
जिवलग जिव घेती प्रेत सोडूनी जाती
विषय सकळ नेती मागुता जन्म घेती

(दार वाजतं. बाबा 'रघुपती मति माझी आपुलीशी करावी' म्हणत दाराशी जातात. दार उघडतात.)

कुणीतरी : (बाहेरून) माफ करा.

बाबा : अं (विषण्णपणे हसतात) हो. आजची पद्धतच आहे आधी माफी मागण्याची– माफी मिळाली की चूक करायला मोकळी होतात माणसं– बोला.

कुणीतरी : रिसबूड खरंच इथं राहात नाहीत का ?

बाबा : नाही. मघाशी आपण येऊन गेला होता.

कुणीतरी : हो, पण मग बाहेर चौकशी केली– पत्ता हाच आहे म्हणे– हा पहा...

बाबा : (पत्ता घेतात) बरोबर आहे...फक्त वरचं नाव चुकलं एवढंच

आता म्हणायच.

कुणीतरी : रिसबुडांनीच हा पत्ता दिला मला.

बाबा : असेल, असेल...आजकाल माणसाला आपलं घर माहीत नसतं. घर थाटायचं आणि दिवसरात्र घरापासून दूर राहायचं म्हणजे असंच होणार.

कुणीतरी : सॉरी, त्रास दिला तुम्हाला. (बाबा 'कुणीतरी' जवळ पत्ता देतात.) नको, ह्या पत्त्याचा काहीच उपयोग नाही. राहू दे तुमच्या जवळच.

(बाबा दार बंद करतात.)

बाबा : (स्वत:शीच अचंबा करीत) इथं रिसबूड राहात नाहीत अशीच पाटी आता लावून घेतली पाहिजे दारावर. पाटी दिसली की...

(ती परत येते...नव्या कपड्यांत)

ती : कशी दिसते मी ?

बाबा : नटीसारखी. माझ्या सुनेसारखी नाही...

ती : एवढ्यात येतील ते. उगाच नाहीतर रागवायचे...त्यांची मर्जी राखली पाहिजे ना ?

बाबा : हो...(नाइलाजानं) त्याची कुठं ओळख निघेल ?

ती : पाहू विचारून. आधी प्रश्न आहे तो माझा.

बाबा : तू चक्क नाही म्हण...तुझ्या बाजूनं मी उभा राहीन.

ती : बाबा–

बाबा : रामाशपथ. एक लक्षात ठेव. (दार वाजतं.)

ती : आले वाटतं–

बाबा : तो मॅनेजर आला तर मी परस्पर त्याला (दार वाजतं.)

ती : (दार उघडत) लागला फोन ?

तो : हो. घरून निघालाय म्हणे तो.

बाबा : (हसत हसत) बरं झालं, राम पावला.

तो : (तिला) झालं बोलणं? (ती गप्प) बाबांना सांगितलंस सगळं?

ती : न...नाही. नुसतं इंटरव्ह्यूबद्दल.

तो : काय म्हणाले ते ?

बाबा : मला वाटतं, हिनं ही नोकरी...

तो : हं, ऐकू दे आपला फुकट सल्ला.

बाबा : मी कोण सल्ला देणार ? मी आहे माझ्या विवंचनेत.

ती : बाबा किनई, संकटात आहेत.

तो : अच्छा ?

ती : त्यांच्या नोकरीबाबत जरा...

बाबा : म्हणजे काय आहे बघ, माझ्या हातून तशी चूक झालेली नाहीए.

तो : (तिला) त्यांना म्हणावं, सगळेजण हेच म्हणतात. चूक नेहमी दुसऱ्याची असते आणि आपण पुण्यवान म्हणून त्या चुकीचं खापर आपल्या डोक्यावर फुटतं...

बाबा : तर तुझी कुठं जर ओळख असेल—

तो : माझी म्हणावं, कुठंही ओळख नाही.

बाबा : तुझी नसली, तर तुझ्या माहितीपैकी कुणाची तरी...(तो विचारात राहातो.)

ती : म्हणजे आता भावजींची स्कॉलरशिप देखील बंद होण्याची भीती आहे हो. बघा ना कुणी ओळखीचा...

बाबा : हो, तुझ्या इतक्या ओळखी आहेत...आता हा बॉस...आहे तुझ्या ओळखीचा...

तो : (कल्पना सुचून) हं, त्याच्या हजारो ठिकाणी ओळखी. नुसता त्यानं फोन करायचा अवकाश—

बाबा : पहा, प्रभुरामच पावला.

तो : पण सगळं हिच्यावर अवलंबून आहे. ही म्हणतेय, मला नोकरी नकोय.

ती : नोकरी करायला मी तयार आहे हो, पण त्याच्या डोळ्यांची.. बाबा, तुम्हीच सांगा. अशा ठिकाणी, अशा माणसाच्या हाताखाली...

तो : तेव्हा सगळं अवलंबून आहे ते हिच्यावर. आता तो आला की हिनं नीट बोललं पाहिजे...नीट...म्हणजे समजा, आपलं

अडलंय ना, त्यानं जरी म्हटलं, माझ्या बरोबर बाहेर चहाला चला...मलासुद्धा पटत नाही, पण आजचं जग...

ती : (संतापून) बाबा, तुम्हाला मी सांगितलंय सगळं. तुम्ही सांगाल ते करायला मी तयार आहे.

तो : त्यांना म्हणावं, तुझ्या बॉसची शंभर ठिकाणी ओळख आहे—

ती : तुम्ही खबरदार, बोलाल तर. बाबा, तुम्ही सांगा, मी काय करू ? त्या कुंटणखान्यात—

बाबा : (तिकडे न बघता) पोरी, स्वतःला जपलं की सगळं काही—

ती : बाबा. (बाहेर दार वाजतं) बाबा, एका शब्दात उत्तर हवंय.. (दार वाजतं.)

तो : तो आलाय—

ती : बाबा, ते भयंकर डोळे पलीकडे दाराशी उभे राहिलेले दिसताहेत मला. तोच आलाय...रावण. लौकर सांगा.

बाबा : पोरी— माझा नाइलाज...

तो : (पुढं जाऊन दार उघडतो.) या. आताच फोन केला होता. पत्ता मिळाला लगेच ? (ती दचकते)

(बॉस दिसत नाही, कारण इतक्यात पडदा पडतो.)

# अंक पहिला : दुकान दुसरे

(दुपारचा सुमार. ममी कुणाची तरी वाट बघतेय. हातात 'फेमिना'चा ताजा अंक, पण वाचनात लक्ष नाही. पोषाख आकर्षक, कुठंतरी बाहेर जायची तयारी झाली आहे.
दार वाजतं. ममी पुढं जाऊन दार उघडते. दारात मुलगा. बावीस वर्षांचा.)

मुलगा : (आश्चर्याने) धम्माल. ममी, तू ? आणि साक्षात स्वतःच्या घरी ?

ममी : (नाटकी लाडाने) हे बरंय. तू आता दुपारी घरी परत आलास म्हणजे आश्चर्यंच आहे. सगळी थिएटर्स आणि हॉटेल्स झाली धुंडून ?

मुलगा : हूं–

ममी : कुठं तिकिट मिळालेलं दिसत नाही.

मुलगा : तिकिटकी ऐसी की वैसी. साला पैसा आहे तिथं मार्ग आहे. व्हेअर देअर इज मनी, देअर इज वे.. आजकाल साली सगळी पिक्चर्स बंडल. नवीन पिक्चर लागेपर्यंत वैताग आहे.

ममी : तुझं नेहमी आश्चर्य वाटतं मला. ना उद्योग, ना धंदा. दिवस-

भर तुझा वेळ जातो तरी कसा ?

मुलगा : (खुर्चीवर आरामात बसतो.) वेळ काय जातच असतो. आपली साली इच्छा असो, नसो.

ममी : पण मनाला तरी काही–

मुलगा : कुछ नही. आता आदतच पडली ना चार वर्षांची. चार वर्षांचा हा कोर्स पुरा झाला माझा. आय वुइल सून बी गेटिंग डिप्लोमा इन डुइंग नथिंग दोन सब्जेक्टस. प्रिंसिपल भटकणं, सब्सीडिअरी झोप. हा कोर्स मात्र कॉस्टली आहे. साला पैसा फार लागतो.

ममी : हे देतात, चोरून मारून मी देते. गेल्या महिन्यात मी एकटी-नंच तुला एकंदर–

मुलगा : ममी, ही भंकस बस्स झाली. आपला कुक् कुठं गेलाय ? एखादा कप चहा–

ममी . तो रजेवर गेला...मी देऊ का चहा करून ?

मुलगा : तू तरी ग्रेटच आहेस ! चक्क तू किचनमध्ये जाऊन चहा करणार ? (नमस्कार करतो) ममीसाहेब, आज झालंय काय तुम्हाला ? दुपारी भंकस करायला महिला मंडळात न जाता तुम्ही घरी ? वर स्वत: चहा करून द्यायची भाषा...सालं अशानं घर सुधारलं तर काय होईल याचा थोडा विचार करा. (ममी हसते) ममी, प्लीज, हसू नकोस. मी चक्रावलोय. आज तू घरी भेटलीस. उद्या पपा भेटायचे. हँ, स्मोकिंगची पण चोरी...हं, काय म्हणतंय तुझं महिला मंडळ. तुमचं काहीतरी गॅदरिंग झालं ना ?

ममी : झालं नाही काही, व्हायचंय. त्याच गडबडीत आहे मी. अरे, तुझी ममी ट्रेझरर आहे म्हटलं.

मुलगा : नाही, तुझा हात हल्ली सैल झालाय तेव्हा मला डाऊट आला.

ममी : इतकी धावपळ करावी लागते रे.

मुलगा : वा: पाहतोच आहे ना मी. हं, तुझा रिकामा वेळ साला बरा जातो महिला मंडळात. पपांचा रिकामा वेळ क्लबात. घरी

लौकर यायला तुम्हाला वेळच नाही मिळत. रमी आहे, ब्रीज आहे. आम्ही साले– ए ममी, तुझं लाईफ बाकी चिकनं आहे हं. साला राडा झालाय तो आमच्याच लाईफचा. डोक्यात एकएकदा अशी सणक येते.

**ममी :** ही कोणती रे भाषा तुझी ?

**मुलगा :** मराठीच आहे. फक्त ही फूटपाथवरची. नाक्यावरची. दॅट रिमाइंडस मी, ममी, तुझं 'वासुनाका' झालं वाचून ?

**ममी :** वासुनाका ?

**मुलगा :** तुझ्या कपाटात नाही का लपवून ठेवलं आहेस तू ?

**ममी :** मी वाचत नाही असली पुस्तकं.

**मुलगा :** कमाल आहे, पण मी तर साली असली ही पुस्तकं तुझ्याच कपाटातून मिळवतो, 'मेन', 'वुइमेन', 'मिस्ट्रेसिस' कोण साला आणून ठेवतो तुझ्या कपाटात– (ममी रागानं बघते) सॉरी हं, पपांचा इन्सल्ट नव्हता करायचा मला.

**ममी :** तुझ्या जिभेला काही हाड ?

**मुलगा :** ममी, आपण काही हाडामांसाची माणसं राहिलो नाही पूर्वीसारखी. तू काय– मी काय...फक्त मांस आहे. हाडं नाहीशीच झाली आहेत– बोलण्यातली– (ममीकडे पाहत) वागण्यातली. (ममी आत जायला निघते) मला साला चहा नकोय.

**ममी :** मग खायला काही–

**मुलगा :** ममी, तुला बाहेर जायचंय ना ?

**ममी :** मी म्हणतेय, तुला खायला आणते; आणि तू म्हणतोएस–

**मुलगा :** ममी, तू बाहेर जा.

**ममी :** म्हणजे ?

**मुलगा :** मला घरी मोकळेपणा हवाय. काही खास काम आहे माझं इथं. (घड्याळाकडे बघतो.)

**ममी :** खास काम ?

**मुलगा :** हो. माझा रिकामा वेळ मला साला मजेत घालवायचाय.

**ममी :** मजेत म्हणजे ?

मुलगा : तू कसं महिला मंडळाच्या नावानं–

मम्मी : काय म्हणायचंय तुला ?

मुलगा : अजून कळलं नाही म्हणजे आश्चर्य आहे. बरं, तू फुटतेस ना ?

मम्मी : मला जायला अजून अवकाश आहे. मी वाट पाहतेय जराशी.

मुलगा : मला देखील वाट पहायची आहे.

मम्मी : कुणाची ?

मुलगा : खरं सांगू ?

मम्मी : आता वाटेल ते ऐकायची तयारी झालीय माझी.

मुलगा : मग ऐक...माझी एक साली मैत्रीण येणार आहे.

मम्मी : माझी देखील एक मैत्रीण...

मुलगा : मैत्रीणच ना ?

मम्मी : म्हणजे ?

मुलगा : नाही, हल्ली बहुधा पुरुषांना मैत्रिणी आणि स्त्रियांना मित्र असतात म्हणून विचारलं. मम्मी, माझी मैत्रीण आणि तुझी मत्रीण एकच नसली म्हणजे सालं मिळवलं. नाहीतर दोघांचा कचरा व्हायचा.

मम्मी : नाव काय तुझ्या मैत्रिणीचं ?

मुलगा : ओळख होऊन आठच दिवस झालेत. आज विचारीन म्हणतो नाव– ती जाताना. (हसतो) एवढ्यात येणार आहे ती.

मम्मी : छान ! तुला आम्ही पैसे देतो, त्याचं काय करतोस रे तू ?

मुलगा : (हसतो) म्हणजे लुक...मी इंटरला गचकलो. तीन वर्षं चार महिन्यांपूर्वीची गोष्ट आहे ही. त्यानंतर मी कॉलेज सोडलं. तुम्ही पैसे देत होता, मी खर्च करत होतो. आज एक्झॅक्टली तीन वर्षं आणि चार महिन्यांनी तू हा प्रश्न विचारलास– पैशाचं तू काय करतोस ? (चिडून) काय झोपून राहिला होता तुम्ही महिला मंडळात आणि क्लबात इतके दिवस ?

मम्मी : विषय बदलू नकोस. तू पैशाचं काय–

मुलगा : मग ऐका, ह्या तुमच्या पैशानं मी साला वेळ विकत घेत असतो. हॉटेलातल्या टेबलाजवळ वेळ विकत घ्यायला चहा

लागतो–

**ममी :** सिगारेटस लागतात.

**मुलगा :** ऑफ कोर्स, यू नो इट, शिवाय पिक्चर्स आहेत, नाटकं आहेत, पत्ते आहेत, भटकणं आहे, अशा मैत्रिणी आहेत... फक्त टाईमपास–

**ममी :** अरे, पण तुझं सगळं लाइफ जायचंय–

**मुलगा :** असंच जाणार ते. तुम्ही पैसे देणार, तीन-चार वर्षांनी उगाच फालतू कर्तव्य म्हणून प्रश्न विचारणार– बस्स.

**ममी :** तुझ्याबद्दल आम्ही किती अपेक्षा बाळगल्या होत्या.

**मुलगा :** अपेक्षा बाळगल्या की तुमची साली कर्तव्यं नाही संपत. आपलं म्हातारपण असंच ऐषआरामात घालवावं म्हणून ह्या अपेक्षा– सगळे साले हिसाब सुखाकडे पाहून...

**ममी :** मग काय करायला हवं होतं आम्ही ?...

**मुलगा :** वाहवा. याही प्रश्नाची किती लौकर याद आली तुला ? काय करायला हवं होतं ? काय करायला नको होतं, नको आहे, विचार. तुमचे हे फडतूस क्लब, भंकस महिलामंडळ जरा कमी करून घरात राहायला हवं होतं तुम्ही. तुम्ही माझ्याबद्दल अपेक्षा बाळगल्यात ना, तेव्हा मी सुद्धा तुमच्याबद्दल अपेक्षा बाळगण्याइतका मोठा आणि शहाणा झालो होतो...महिला-मंडळाचं भंकस गॅदरिंग करताय...त्यापेक्षा तुम्ही सगळ्याजणी आपल्या घरातल्या माणसांचंच गॅदरिंग का भरवत नाही ? तू, मी, पपा, बच्चू, बेबी...कधीतरी एकत्र असतो ? बच्चूचं कॉलेज, स्पोर्टस्...बेबीच्या फॅशन्स, ट्रिप्स, डान्स क्लास... तुझी महिलामंडळं, पपांचे क्लब्ज्...आख्खा दिवस बाहेर काढायचा आणि ह्या वेटिंगरूममध्ये यायचं. तुमचं सामान आहे ना इथं ? केवढं घर सजवलंय, पण यावं तेव्हा सालं प्रत्येकाचं पाऊल बाहेर पडायला बघतंय.

**ममी :** आज बराच कंठ फुटलेला दिसतोय तुला.

**मुलगा :** खरा तर परवाच फुटला होता, पण बोललो नाही. कारण...

कारण तेव्हा मी फूटपाथवर होतो आणि तू त्या हॉटेलात शिरली होतीस. एअरकंडिशन हॉटेल होतं, थंडगार वातावरणात पापाची ऊब. मनात आलं, सालं सिधं हॉटेलात शिरावं आणि...आणि

मम्मी : आणि काय ?

मुलगा : आणि तुझ्या कमरेवर ठेवलेला त्या परक्या माणसाचा हात साला मुळापासून तोडून ठेवावा...मम्मी, पोरांना असा ठेवलेला बापाचा हातदेखील पाहवत नाही, माहीत आहे ना ?

मम्मी : शट् अप्, तू काय ड्रिंकबिंक झोकलं आहेस ?

मुलगा : आता तरी नाही. माझ्याजवळ काय पपांसारखं आणि तुझ्यासारखं परमिट आहे ?

मम्मी : तू जीभ आवरतोस, की–

मुलगा : फरगेट इट मम्मी, तू जा आता बाहेर, मला एकांत हवाय. तुलासुद्धा हवा असेल बाहेर.

मम्मी : कोण येणार आहे तुझ्याकडे ?

मुलगा : अशीच एक विवाहित स्त्री. स्टेनोग्राफर आहे म्हणे.

मम्मी : (दचकून) स्टेनोग्राफर ?

मुलगा : का ? तुझी मैत्रीण पण स्टेनोग्राफरच आहे ? (मम्मी मान डोलावते) ग्रेट, व्हॉट ए सिच्युएशन, इज शी मॅरीड ?

मम्मी : हं–

मुलगा : वागायला जराशी ही–

मम्मी : असेल, कुठं भेटली तुला ती ?

मुलगा : पिक्चरला आली होती. बॉसची वाट पाहत होती. पिक्चर स्टार्ट झालं तरी साला आला नाही, म्हणून ती जायला निघाली मी घेतली फिरकी. म्हटलं, माझ्याबरोबर येणार ? आणि ती आली. तिला फक्त परका पुरुष हवा होता. आज तिला मी इथं बोलावलंय. म्हटलं, घरात कुणी नसेल, मम्मी भंकस महिलामंडळाच्या निमित्तानं कुठं हॉटेलात–

मम्मी : खोटं आहे हे.

मुलगा : खोटं असतं तर मला खरंच आनंद झाला असता. पण ममी, तुझ्या बोलण्यापेक्षा माझ्या डोळ्यांवर माझा जास्त विश्वास आहे...आम्ही कानांपेक्षा डोळ्यांनीच जास्त शिकलो या घरात. (हसतो) ममी, ही स्टेनोग्राफर तुझ्याकडे कशाला येणार आहे ?

ममी : तुला काय करायचंय ?

मुलगा : तिला ते ठाऊक आहे, ममी ?

ममी : शट अप्. माझी ही मैत्रीण वेगळी असेल एखादे वेळी...ती आली की तिला आणि मला बाहेर जायचं आहे अॅडव्हर्टाईज-मेन्टस् मिळवायला.

मुलगा : अॅडव्हर्टाईजमेन्टस् मिळवायला की करायला ?

ममी : माझ्याशी एक अक्षरसुद्धा बोलू नकोस. तुला ह्यापुढं मी दिडकी-देखील देणार नाही.

मुलगा : चलेगा, निदान आणखी दोन आठवडे तरी काळजी नाहीए मला. (खिशातलं पाकीट काढून दाखवतो) हे बघ—

ममी : कुठून आणले हे पैसे ?

मुलगा : (हसतो) म— म— मटक्यातला.

ममी : यू स्काऊंड्रल.

मुलगा : (हसतो) म— म— (ममीकडे बघतो, बदलतो) ममीतला.

ममी : (चिडते) त्यापेक्षा मला एकदा मारून टाक तू म्हणजे सुट-शील. तुझं लक्षण काही धड दिसत नाहीए मला.

मुलगा : माझंच कशाला ? तुझं, बच्चूचं, बेबीचं आणि पपांचं देखील लक्षण धड दिसत नाहीए...पण ममी, चिडून किंवा कुणाला मारून टाकून हे संपणार आहे का ?

ममी : बघ करून. (मुलगा हसतो) हसू नकोस, तुझ्या साऱ्या भानगडी मी ह्यांच्या कानावर घालणार आहे.

मुलगा : प्लीज डू ममी, म्हणजे एकदा सुरुंग लागेल. मलादेखील तुझ्या-बद्दल पपांना काही सांगायचं आहे.

मम्मी : बघ ना सांगून, थोबाडच फोडतील ते.

मुलगा : (हसत) कुणाचं...मम्मी, पपांना काही कल्पना नसेल नाही तुझ्या महिलामंडळाच्या कार्याची ?

मम्मी : (वरमते) तू...तू सांगणार आहेस त्यांना ?

मुलगा : विचार तरी चाललाय असा.

मम्मी : खोटं आहे हे सगळं. माझा सूड घेण्यासाठी तू हे नाटक रचलेयस.

मुलगा : मग आता घाबरून का विचारलेस– तू सांगणार आहेस का म्हणून ?

मम्मी : तुझा बेशरमपणा कुठपर्यंत गेलाय ते पाहायचं होतं मला. (स्वर बदलते) नऊ महिने तुला पोटात वाढवलं–

मुलगा : शक्य असतं तर त्यासाठी तू आयासुद्धा ठेवली असतीत, आय ॲम शुअर.

मम्मी : बोल तू वाटेल ते. तुला जन्म दिला. तुझी दुखणी-खुपणी काढली, तुझ्यावर मायेचा वर्षाव केला–

मुलगा : तुमच्या गॅदरिंगमधल्या नाटकातली वाक्यं दिसताहेत ही. मम्मी, परवा तुझं ते दर्शन होईपर्यंत मला असंच वाटत होतं... पण आता मला तुझा तिरस्कार वाटतोय. तुझा वाटतोय, पपांचा वाटतोय...या घराचाच वाटतोय. (टेबलावरचा फ्लॉवरपॉट फेकतो. आवाज होतो.) पपांना मी हे सगळं सांगणार आहे.

(आवाज ऐकून पपा येतात.)

पपा : व्हॉटस द मॅटर ? काय वाजलं ?

मम्मी : काही नाही, काही नाही, हा इथला फ्लॉवरपॉट–

मुलगा : मी खाली टाकला.

पपा : (आता मुलाकडं लक्ष जातं.)सरप्राईज, दो नॉट प्लेझंट, चिरंजीव, तुम्ही घरी ? (मम्मीकडे पाहून) आणि तुम्हीसुद्धा ?

मम्मी : तुम्ही केव्हा आलात ऑफिसातून ?

पपा : बराच वेळ झाला.

मम्मी : कळलंच नाही तुम्ही आल्याचं, मला वाटलं–

मुलगा : आम्हाला वाटलं, तुम्ही घरात नसाल. (मुद्दाम) हो की नाही

मम्मी ?

मम्मी : आज लौकर कसे ?

पपा : (अडखळतात. मग)... हो, म्हणजे, आय वॉज नॉट फिलिंग वेल...जरासं अनईझी वाटत होतं, म्हटलं, घरी कुणी नसेल, घरी जाऊन रेस्ट घ्यावी. (घड्याळाकडे पाहतात) आँ ?

मम्मी : काय झालं ?

पपा : नथिंग, वेल, तुला मिटिंग असेल ना आज ?

मम्मी : हो...पण...

पपा : डोण्ट वरी. जा तू. (मुलाकडे पाहून) चिरंजीव, आज तुम्ही दिवसा घरी कसे ?

मुलगा : मी...म्हणजे...मला जरा...

पपा : डोंट बी अफ्रेड माय बॉय. मी सहज विचारलं. बेटा, ते नवीन लागलेलं पिक्चर पाहिलंस का ? मार्लेन ब्रॅंडोचं ? (हसतात) कसली लेको हिंदी पिक्चर्स बघता. डोंट वेस्ट युवर टाईम हिअर. गो अ‍ॅण्ड सी मार्लेन ब्रॅंडो, अजून पिक्चर स्टार्ट झालं नसेल, डोंट मीस इट. (मम्मीला आणि मुलाला संशय येतो.) आं ? व्हॉटस् रॉंग ?

मम्मी : पण तुम्ही—आज क्लबमध्ये जायचं नाही ?

पपा : जरा लेट जाईन म्हणतोय.

मम्मी : का ?

पपा . का ?...मला थोडंसं काम आहे इथं.

मम्मी : कसलं ?

पपा : व्हाय द हेल यू डाऊट ?

मम्मी : डाऊट कशाचा ? मी सहज विचारलं.

पपा : आय नो इट व्हेरी वेल... लूक... ऑफिसचं काम करायचंय मला. परवाच्या मिटिंगसाठी नोट्स काढायच्या आहेत. (घड्याळाकडे बघतात) (मम्मी आणि मुलगा एकमेकांकडे पाहातात. भीतीनं, संशयानं देखील) थांबलात का ? जा नं...

मुलगा : पपा, पण मला...

पपा : (खिशातून दहाची नोट काढून देतात.) अच्छा... हे घे आणि जा. मला शांतता हवी आहे.

ममी : घरात कुक देखील नाही, चहा वगैरे लागला तर–

पपा : मी घेईन करून. जा तुम्ही.

ममी : (जरा आत्मविश्वासानं) कुणी येणार आहे ?

पपा : व्हॉट डू यू मीन ? मला सारखे प्रश्न विचारलेले आवडत नाहीत. बेअक्कल कुठली !

मुलगा : (रागानं) पपा, ममीला माझ्यादेखत भलतं सलतं बोलू नका. मला सहन होणार नाही. तिच्या प्रश्नाला फक्त उत्तर द्या. कुणी येणार आहे इथं ?

पपा : (वचकून) हो.

मुलगा : ममी, कोण येणार आहे विचार...विचार ना.

ममी : कोण येणार...

पपा : आमची नवी स्टेनोग्राफर येणार आहे.

ममी : स्टेनोग्राफर ?

मुलगा : वाट लागली. स्टेनोग्राफर.

पपा : हो. डिक्टेशन घ्यायला बोलावलंय मी तिला इथं.

मुलगा : घरात कोणी नसताना ?

पपा : यू फूल, ती रिस्पेक्टेबल लेडी आहे. मॅरीड आहे.

मुलगा : ममी–स्टेनोग्राफर, मॅरीड...

पपा : गेट आऊट बोथ ऑफ यू.

मुलगा : सॉरी, मला आणि ममीला इथं थांबायचं आहे.

पपा : कशाला ?

मुलगा : आमच्याकडे कुणी येणार आहे.

पपा : कोण येणार आहे ?

मुलगा : मला देखील प्रश्न विचारलेले आवडत नाहीत. (पपा त्याची कॉलर पकडतात.) सोडा मला.

पपा : कुणाला बोलावलं आहेस तू इथं ? बोल आधी.

मुलगा : एका स्टेनोग्राफरला. (पपा त्याला धक्का मारतात.) ती सुद्धा

रिस्पेक्टेबल लेडी आहे. मॅरीड आहे. (हसतो.) नो किडिंग पपा.

पपा : (ममीला) आणि तू कुणाला आमंत्रण दिलं आहेस ?

ममी : माझी एक मैत्रीण–

मुलगा : स्टेनोग्राफर, रिस्पेक्टेबल लेडी आणि मॅरीड– (पपा मुलाला दूर फेकतात. तो पडतो.)

पपा : काय–विचार काय आहे तुमचा ?

मुलगा : माझा–तुमच्यासारखाच (उठतो.) आपल्या तिघांची एकच मैत्रीण असेल तर वाट लागली.

पपा : बेवकूफ, कुणाशी बोलतो आहेस असं ?

मुलगा : तुमच्याशी.

पपा : हे धंदे करण्यापेक्षा काही उद्योग कर–

मुलगा : पण तो तुमच्या प्रतिष्ठेला शोभेलसा हवा ना, तुम्ही बिग बॉस. ...मी त्या गराजमध्ये मेकॅनिकचं काम करायला लागलो तेव्हा तुम्ही मला एक लेक्चर दिलं होतं, आठवतंय ?

पपा : माझ्याशी बोलू नकोस, आधी चालता हो.

ममी : अहो पण...

पपा : (ममीला) तू बोलू नकोस मध्ये–तू बिघडवला आहेस त्याला.

मुलगा : नो नो पपा, ते क्रेडिट, तुमचं दोघांचं आहे.

पपा : तुला चाबकानच फोडलं पाहिजे... मैत्रीण आणतोय घरी... (त्याच्या अंगावर पुस्तक भिरकवतात.)

मुलगा : (पुस्तक लागतं. ते उचलून उघडतो.) आमच्या पुस्तकात एक धडा होता. जावयाची कसूर झाली म्हणून एकदा अकबर बादशहा चिडला. बिरबलला म्हणाला, सगळ्या जावयांना सुळी द्यायचं. बिरबलनं एक सोन्याचा सूळ–

पपा : काहीतरी बडबडू नकोस.

मुलगा : इन शॉर्ट पपा, आपल्या घरात सोन्याचे दोन चाबूक आणायला हवेत.

पपा : (ममीला) ह्या गाढवाला घरातून लाथ मारून घालवल्या-शिवाय हे घर सुधारणार नाही... निर्लज्ज, बेशरम– अभ्या-सात लक्ष नाही... फुकटचं खायचं आणि माझ्या जीवावर चैन करायची.

मुलगा : मी एकटाच हे पाप करतो या घरात ? पपा, रिकाम्या वेळात तुमच्या सगळ्यांची पापं मी पाहून ठेवली आहेत. पाढा वाचायचा म्हटलं तर साला महिना लागेल. हे घर नाही, बाजार आहे. कर्तव्यं लुटायची आणि चैन विकत घ्यायची इथं...सालं पाप लुटलं जातंय...पैशानं विकत घेतलं जातंय...आपण ही पापं केली नाहीत तर आपली प्रतिष्ठा लोकांना दिसणार नाही. इथली ही श्रीमंती सोसायटी...साले प्रत्येक घरात हेच वांधे आहेत...सगळ्या पपांना आणि सगळ्या ममींना वाटतंय, पोरांशी कॉंपिटिशन करून आपण चैन करावी. पापाच्या बाजारात धमाल उडवून द्यावी...पोरांनी मात्र नीट वागावं.. वा रे बाजार...वा रे कॉंपिटिशन...सगळे तरुण दिसतात. सगळ्यांची वयं एकूणपन्नासच्या पुढं सरकतच नाहीत. आजोबांना वयं विचारली तरी एकूणसाठ, एकूणसत्तर...साली बाटाच्या किमतीसारखी– एकवीस रुपये पंचाण्णव पैसे... बत्तीस रुपये पंचाण्णव पैसे...

पपा : बकवास बंद कर...स्टॉप इट आय से...

मुलगा : ओ. के. डायरेक्ट फिरकी घेतो...पपा, तुमच्या क्लबमधले, ऑफिसमधले तुमचे उद्योग, ममीच्या भंकस मंडळातले तिचे उद्योग...तारीखवार सांगू ? आमने-सामने ? सुंदर मुलगी, बेटर इफ मॅरीड, तिला स्टेनोग्राफी येत असो, नसो...तिची अपॉइंटमेंट स्टेनोग्राफर म्हणून.

(बेल वाजते, तिघेही घड्याळाकडे बघतात.)

स्टेनोग्राफर.

पपा : नॉन्सेन्स.

ममी : सगळा घोटाळा–

मुलगा : वाट लागली.

(पुन्हा बेल वाजते)

मुलगा : (हसतो) रिस्पेक्टेबल लेडी...मॅरीड...साला एकांत...

(बेल वाजते...तिघेही तसेच उभे.)

ग्र. प्र. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
२०८५१ नों. दि ४।५।८५
...

# अंक दुसरा : दुकान तिसरे

(उपनगरातला एक बंगला. कॉलेजमधली चार मुलं फ्लश खेळत बसली आहेत. दोन मुली त्यांच्याजवळ बसल्या आहेत. साऱ्यांचे वेष अत्याधुनिक. ट्रान्झिस्टर चालू आहे. वेळ दुपारची असावी.)

पहिला : (मध्ये पैसे टाकतो) माझा वन रुपी.

दुसरा : हा माझा.

तिसरा : ब्लाइंड आठ आणे.

चौथा : घ्या साला रुपया. (खेळ चालू)

पहिला : (मुलीला) तू लक् दे बघू आता. हं ..कार्डस् हातात घे.

पहिली : काय बाई, तुमचा गेम कळतच नाही. शी,ब्लाइंड काय आणि..

दुसरा : पॅक...

तिसरा : (पहिलीला) ए, तू माझ्या कार्डस्‌ना हात लाव...

पहिला : नो. माय क्लेम फर्स्ट... (पहिलीला चापट मारून) खरं की नाही ?

पहिली : इश्श.

चौथा : (खेळ चालतोय) प्युअर सीक्वेन्स.

पहिला : हा घ्या आमचा...एस. किंग अॅण्ड क्वीन...

चौथा : सालं– दर वख्ताला नशीब गोता खातं... (वैतागून पैसे टाकतो)
(मुली हसतात)

दुसरा : एक जोक आठवला; सांगू ?

तिसरा : सॉरी.

दुसरा : ए, सांग रे...जोक ऐकला का पिकनिकला आल्यासारखं वाटतं, नाय ? ए सांग...सांग.

पहिली : सांग रे, सांग.

दुसरा : तर काय झालं ? कर्तारसिंगला मूल होत नव्हतं. तो पन्नास डॉक्टरांकडे गेला. प्रत्येकजण त्याला सांगायचा, 'आय ॲम सॉरी कर्तारसिंग, तुम्हाला मूल होणं शक्य नाही.'

चौथा : व्हेरी इंटरेस्टिंग– पुढे.

दुसरा : शेवटी तो एकावन्नाव्या डॉक्टरांकडे गेला. म्हणाला, 'डॉक्टर, काही करून मला मूल हवंय. घरात मूल नसलं म्हणजे मजा नाही.' तो डॉक्टरांचं काही ऐकेचना. शेवटी डॉक्टर म्हणाले, 'असंच म्हणताय तर एक उपाय आहे.'

सगळे : पुढे– पुढे काय झालं ?

दुसरा : डॉक्टर म्हणाला, 'तुम्ही घरी पेइंग गेस्ट ठेवा.'

दुसरी : शी, चावट आहे हा जोक.

पहिली : नाही, नाही. पिकनिकला जोक म्हणजे असाच पाहिजे. ए, सांग रे.

दुसरा : शेवटी तो घरी गेला. म्हणता म्हणता एक वर्ष उलटलं. एका वर्षानं तो पेढे घेऊन डॉक्टरकडे गेला.

तिसरा : एकावन्नाव्या-

दुसरा : मधे मधे बोलू नको रे...हं, तर काय झालं, कर्तारसिंग डॉक्टरला म्हणाला, 'डॉक्टर, माझं अभिनंदन करा, मी बाप झालो एका पोराचा.' डॉक्टर साला चक्रावला. म्हणाला, 'पोराची काय हकीगत ?' कर्तारसिंग म्हणाला, 'फर्स्टक्लास. चांगलं आठ पौंड वजन आहे.' डॉक्टरनं मग पुन्हा विचारलं, 'आणि पोराची आई?' 'ती देखील फर्स्टक्लास.' डॉक्टरने मग

हळूच विचारलं, 'मग पेइंगगेस्टची काय हकीगत?' कर्तारसिंग म्हणाला, 'ती ना ? ती देखील छान आहे.' (सगळे हसतात.)

दुसरी : किती मस्त आहे जोक नाय ? आपले सर सुद्धा क्लासमध्ये–

तिसरा : (हसत) खरंच, सरांना कसं कटवलं रे ?

पहिला : (हसतो) त्यांना वेळ नव्हता तेव्हाच हे पिकनिक अॅरेंज केलं.

दुसरा : बरं झालं रे.

पहिली : हो ना.

तिसरा : नाहीतर सगळा वांधा आला असता.

चौथा : इथं काहीतरी शिकवत बसले असते, नाहीतर ते लेक्चर आहेच.

दुसरा : क्रांतिकारकांबद्दलचं ?

पहिला : हंबग. कसले क्रांतिकारक आणि काय ?आता आपलं नेशन... अवर्स इज अॅन इन्डिपेन्डन्ट नेशन, त्या क्रांत्या बस्स झाल्या.

चौथा : अरे, त्या दिवशी त्यांना पिकनिकबद्दल विचारायला गेलो ना तेव्हा ते सालं कसलं पुस्तक वाचत होते, ठाऊक आहे ?

तिसरा : सेक्सचं ? नाइटस् विथ द डेम्स ?

पहिली : (दुसरीला) ए, तू ते पुस्तक वाचलंस ? फिल्दी, मी ते कसंबसं कंप्लीट केलं आणि लगेच दोन दिवसांत रिटर्न केलं.

दुसरी : (हसत) फिल्दी होतं तर अर्धवट टाकून का नाय दिलंस ?

दुसरा : तिनं पुरं केलं त्यात सगळं आलं ! (हसतो)

चौथा : साली माझी स्टोरी ऐका नं. आपल्या सरांची...सर पुस्तक वाचत होते भारतीय क्रांतिवीर. मला पुस्तक दाखवून म्हणाले, तुम्हाला अशा बुक्समध्ये इंटरेस्ट ? मी म्हटलं, मुळीच नाही.

पहिला : दॅट्स वंडरफूल.

चौथा : सालं खोटं कशाला बोला ? साफ नर्व्हस झाले. मला म्हणाले, 'तुम्हाला निदान नावं तरी माहीत असावीत क्रांतिवीरांची.' म्हटलं, मला एकही नाव माहीत नाही. लगावला टोला.

दुसरा . वा रे पठ्ठे.

चौथा : ऐकून रे...साले गंभीर झाले वासुदेव बळवंत की बळवंत

वासुदेवचं नाव ऐकलंय का विचारलं मला.

तिसरा : (हिंदी सिनेमाप्रमाणे) तुम्हारी इतनी हिंमत? (मुली हसतात.)

चौथा : मी म्हटलं, आताच प्रथम तुमच्या तोंडून ऐकलं हे नाव...साफ वडा केला त्याचा.

दुसरी : नाय तर काय ? कधी त्याच्याकडे गेलं का अस्संच विचारतो. म्याडच आहे.

पहिली : आज ते आले असते तर सगळं पिकनिक स्पॉइल केलं असतं.

पहिला : असं स्टेक्स लावून खेळता आलं नसतं.

तिसरा : अॅटमॉसफिअर फ्री राहिलं नसतं. (मुलीच्या पाठीवर थाप देतो.)

पहिली : हो नं. असं प्रायव्हेट पिकनिकच बरं वाटतं.

दुसरी : किती फ्री वाटतं, नाय ?

चौथा : आणि तो प्रोग्रॅम–

पहिली : चालू झालाय आऊट हाऊसमध्ये–

चौथा : सालं, मग इथं काय बसताय ? कोण कोण आहे तिथं ?

दुसरी : सगळे आहेत.

दुसरा : आपला सोवळा पण ? आताच गेला तिकडे.

पहिला : मग ? लेकाचा पिकनिकला येत नव्हता आधी. सेड आय कान्ट अॅफार्ड.

तिसरा : नेहमी हे परवडत नाही, ते परवडत नाही. दरिद्री. आता पी म्हणावं.

चौथा : बाटली कुणी आणली ?

दुसरा : महाराज आहेत ना ? बापाच्या आणि ममीच्या स्टॉकमधून त्यानं बाटल्या आणल्या आहेत. इन अॅडिशन– इथल्या माळ्या-कडून फुगे आणले आहेत. ग्रेट आहेत. आता ह्या पिण्याचा खर्च कुणाचा ? महाराज का ?

तिसरा : चल रे. ह्यात खर्च प्रत्येकाच्या बापाचा– सोल्जर्स कॉन्ट्रिब्यूशन ...त्या सोवळ्याला जाम पाजून वसूल केला पाहिजे...मग भीक मागा म्हणावं महिनाभर–

पहिला : या प्रोग्रॅमला हीरोच पाहिजे, व्हेअर्स हो ?

पहिली : तो गाडीवाला आहे; केव्हाही येईल. हिरॉइन इथं आहे ना ? तिचा दोस्त बिचारा–

पहिला : लेकाचा गरीब आहे, पण स्कॉलर आहे. सालं, इलेक्शनमध्ये त्यानं आपल्या हीरोला घातला की नाही मातीत ?

दुसरा : घालू दे रे मातीत. पण आपल्या हीरोनं धमाल केवढी केली ? एकेका प्रोफेसरला असा दम भरलाय, सरळ 'मुडदा पाडीन' म्हणून धमकी दिलीय.

पहिला : हाताशी पोरं आहेत ना नाक्यावरची, ती एकेकाला पिसून काढतील.

तिसरा : (दुसऱ्याला) ए, इलेक्शनच्या दिवशी हीरोनं कॉलेजच्या कॅन्टिनमध्ये म्हणतात–

दुसरा : (हसतो) आठ बाटल्या–

पहिला : च्यायला, सालं कळवलंदेखील नाही कुणाला...

तिसरा : ते नाही रे,...त्या फर्स्ट इअरच्या मुलीबद्दल...

दुसरा : मग...सालं हीरोनं काही विचारलं तर उत्तर नको द्यायला ? ह्यानं जाम घेतली होती. सिध्या उठला आणि तिला धरून... तिथंच सगळ्या पोरांच्या देखत– द्रौपदीवस्त्रहरण...जिगर आहे साल्याची–

दुसरी : पेपरमध्ये छापून नाय आलं का ?

तिसरा : पेपरसकट तो पेपरवाल्यांना खिशात ठेवील...उद्याचा पुढारी आहे तो.

पहिला : साल्याला डाऊट आहे तिच्या दोस्ताचा.

दुसरा : तिचं खरं प्रेम दोस्तावरच आहे.

दुसरी : (पहिलीला) बघ, तुला मी सांगितलं होतं का नाय ?

दुसरा : हा हीरोच लेकाचा चमचेगिरी करतो. तरी बरं, प्रत्येक ठिकाणी ह्या हीरोला तो आऊट करतोय.

चौथा : पिक्चरला साली मस्त स्टोरी होईल. वहीदा रेहमान, शशिकपूर आणि प्राण– म्हणजे हा हीरो.

पहिली : ए, आता पत्ते ठेवून द्या नं...आणि त्या पोरांना इकडे बोलवा.

दुसरी : नाय तर. पिकनिकला यायचं आणि सालं सेप्रेट–

दुसरा : ग्रेट. पोरीच्या तोंडून शिवी अशी गोड लागते. नाहीतर बाकीच्या काकूबाई, पिकनिकला येणार का तर शंभर प्रश्न.

पहिला : (नक्कल करत) पिकनिक ओव्हरनाईट नाही ना ?

पहिली : सर येणार आहेत ना बरोबर, बावळट मेल्या.

दुसरी : त्यांना इथं आणून चांगली पाजली असती का कळलं असतं.

चौथा : आपल्या सोवळ्यासारखं (हसतो) आता येतील बघा एकेक.

दुसरी : ए, तोपर्यंत तू एक गाणं बोल ना.

पहिली : अं हं.

पहिला : अंहं काय, कमॉन...वुइ बोथ सिंग...

दुसरा : एक जोक सांगू ?

तिसरा : प्लीज नको.

दुसरी : सांग ना. (त्याचा हात धरते.)

पहिली : सांग...सांग...

दुसरा : तर काय झालं ? कर्तारसिंग क्लबमध्ये बसला होता. एक मुलगी त्याच्याजवळ आली. म्हणाली, आर यू रिलॅक्सिंग ? तर कर्तारसिंग म्हणाला, नो, आय ॲम कर्तारसिंग. (दुसरी हसते)

पहिली : हा जोक माहीत होता आम्हाला.

दुसरा : च्...पुढं ऐक ना...जरा वेळानं दुसरी एक मुलगी आली त्याच्याजवळ. तिला डान्सला पार्टनर नव्हता, तिनं कर्तारसिंगला विचारलं, यू नो डान्सिंग. कर्तारसिंग म्हणाला, येस ही इज माय अंकल.

(पहिली आणि दुसरी हसतात.)

पहिला : वेल...इनफ ऑफ जोक्स. (पहिलीला) चल, आपण गाऊ... (तिचा हात धरतो. तिला उभी करतो, गाऊ लागतो.) आजकल तेरेमेरे प्यार...सबको खबर है (अंगविक्षेप करतो. पहिली

गप्पच) कमॉन सिंग...लाजू नकोस ! लाड लाडके, लाजू नकोस...मला मद्य गे पाजू नकोस...प्रीतचांदणी भिजू नकोस.

दुसरा : बहोत खूब...बहोत खूब. (दुसरीचे हात धरतो. रिंगण घेतो) लाडलाडके, लाजू नकोस...मला सोडून जाऊ नकोस...(एकदम गंभीरपणे) मी हे मनापासून बोलतोय. कितीतरी दिवस तुझ्याजवळ हे सांगायचं होतं...

पहिली : हे तू असं बोलतोस आणि अभ्यास करायला बसले का काय सुचत नाय, परीक्षा जवळ आली–

चौथा : परीक्षेला मार गोळी.

पहिली : पण धरून–

दुसरा : लाडलाडके, भिऊ नकोस. तुला मी पास करून देतो, झालं ? प्रॉमिस. दोन-चार हजार रुपये फेकले की तुझ्या जागी कुणीही पेपर लिहील. तुझ्यासाठी दोन-चार हजारच काय लाखो रुपये कचऱ्यासारखे वाटतील मला. (सगळे टाळ्या पिटतात)

पहिली : (हात पुढं करून दुसऱ्याला) काँग्रॅच्युलेशन्स.

दुसरा : थँक्यू. (तिचा हात धरून ठेवतो) थँक्यू...

दुसरी . (दुसऱ्यापुढं हात धरते) हं...काँग्रॅच्युलेशन्स...

दुसरा : थँक्यू डिअर...आजचा हा दिवस मी जन्मभर–

तिसरा : (पहिल्याला) तुम्ही दोघांनी गाणी म्हणून हा साजरा करा. (गाऊ लागतो) आजकल तेरेमेरे–

पहिला : प्लीज, मी म्हणतो... (गाऊ लागतो) आजकल तेरेमेरे– (आऊट हाऊसमधून मद्यपान केलेले विद्यार्थी, महाराज, हिरॉइन आणि तीन मुली येतात.)

महाराज : (बरळल्यागत) आजकल...तेरेमेरे...बस्स...वाटतं, हे कॉलेजबिलेज सोडावं आणि...आणि पिक्चरमध्ये जावं...लाखो रुपये मिळतील.

दुसरा : लाखो रुपये आणि चैन...राहायला राजवाडा, रोज नवीन राणी, नवीन दारू...हरुन अल रशीद...शहेनशहा ऑफ बगदाद पैसाच पैसा...

अँग्री : बस्स, एवढीच स्वप्नं...ह्या स्वप्नांसाठी मरेपर्यंत कष्ट करायचे. घर, बायको, पोरंबाळं, पैसा, सब झूट...घर झूट, बायको–

तिसरा : झूट

अँग्री : पोरं-बाळं.

चौथा : झूट– झूट.

अँग्री : पैसा ?

हिरॉईन : तो सुद्धा झूट ?

अँग्री : झूट ? बिलकूल झूट. आम्हाला हे सगळं तोडूनमोडून– तोडून-मोडून– तोडून मोडून...(अडखळतो)

पहिला : टाकायचंय ? काय ? टाकायचंय ?

अँग्री : करेक्ट. टाकायचंय, तोडून टाकायचं आणि मोडून टाकायचं.... कसली घरं आणि काय ? बोला सोवळे.

सोवळा : (त्याला दारू खूप चढलीय) पण...घर म्हणजे सं...सं... संस्कार...

अँग्री : तुला साली चढलेली दिसत नाहीए, आणखी घेणार ? त्या माळ्याला सांगतो, तुला हातभट्टीची आंघोळ घालायला. आम्हाला हे काही नकोय...घर म्हणजे कोंडवाडा...बांधली आहेत गुरं, कर्तव्याच्या जबाबदारीच्या दावणीला, आम्ही म्हणतो...

पहिला : तुम्ही कोण ?

अँग्री : अँग्री यंग मॅन...हा सोवळा– गाढव आहे, घरावर विश्वास ठेवतो. माझ्या खोलीवर ये म्हणावं. माझा बाप बघ, बहीण बघ, आई केव्हाच पळून गेलीय...

सोवळा : आँ–

अँग्री : येस...डोन्ट गेट अपसेट माय बॉय...

हिरॉइन : पळून गेली म्हणजे ?

अँग्री : रॅन अवे– लाइक अ व्होअर

दुसरी : कुणाबरोबर ?

अँग्री : चार बायका ठेवलेल्या एका श्रीमंत हरामखोराबरोबर...तिच

प्रेम होतं म्हणायचं आमच्यावर ? पैशावर प्रेम केलं आणि शरीरावर प्रेम केलं, प्रेम ? झूट...आपल्या पिढीनं जनावरासारखं रहायला हवं. बिनभिंतीच्या घरात मोकाट सुटलं पाहिजे...मिळेल ते खावं, मिळेल ते भोगावं...संस्कार, प्रेम, त्याग, प्रामाणिकपणा, श्रद्धा, निष्ठा, ध्येय...या गोष्टी मोडीत निघाल्या आहेत, डोळे उघडे ठेवून बघा, विकायला काढल्या आहेत ह्या गोष्टी...कोई भी चीज उठाव– दो दो पैसा...

महाराज : कंपनीका मालिकका दिवाला.

दुसरा : ए, मी एक जोक सांगतो.

दुसरी : ए, सांग ना...जोक म्हटला का मला हसूच येतं. (हसते)

पहिली : नाहीतर आपण गाणी म्हणू. ए अँग्री यंग मॅन, पिकनिकला आलो आहोत आपण...

पहिला : लेटस् एंजॉय...

ऍंग्री : ओ के. लेटस् एं...ऍं...ऍंझॉय, ए चल, आपण गाणी म्हणू या. (गाणं म्हणण्याचा प्रयत्न करतो) उठा दो घुंगट, दिखादो मुखडा...चाँदसे भी उजला (हिरॉइनचा हात धरतो) लेटस.. एंजॉय...माय स्वीट.

हिरॉइन : (रागाने) फाजिलपणा करू नकोस हं...

पहिला : आपण पिकनिकला त्यासाठीच तर आलो आहोत. (हसतो) ए घुंगटवाल्या...

पहिली : (हिरॉइनला) काय ग, तू तरी इतकी–

दुसरी : पण तिचं लव दुसऱ्यावर नाय का ?

पहिली : ओह...फर्गेट इट...

हिरॉइन : आपल्याला निघायचं आहे आता

महाराज : (हसतो) शक्य नाही ते...इथं ओव्हरनाईट रहायचा डिसिजन झालाय आमचा.

दुसरी : (आनंदानं) अय्या खर्रर...

पहिली : (घाबरून) पण मी...घरी सांगितलं...

दुसरी : का हो, काकूबाई, आता का ?

दुसरा : आज रात्रभर आपण ह्या बंगल्यात राहायचं...

तिसरा : धमाल करायची...

अँग्री : मी स्टार्टसुद्धा केलीय. (हिरॉइनला) चल डार्लिंग, आपण बाहेरच्या गार्डनमध्ये जाऊ...आपल्याला निर्माण करणाऱ्या निसर्गाचं रहस्य शोधून काढू.. छे छे...सब झूट. तुमचं प्रेमबीम. बोगस...झूट.

हिरॉइन : असं कसं होईल ?

पहिला : असंच होईल...असंच होतं.

सोवळा : तू दोघांनाही धरून ठेवलं आहेस...हीरो पण आणि तुझा दोस्त पण...

तिसरा : हीरोजवळ पैसा आहे आणि दोस्ताला पुढं चांगले प्रॉस्पेक्टस आहेत.

पहिला : शी कान्ट टेक अ डिसीजन...उद्या दोस्ताला क्लास मिळाला, चांगली नोकरी...

अँग्री : फूलीश. पैसा हुषारीवर मिळतो ? माझ्या वर्गात एक गुंड पोरगा होता. आठवीत तीनदा नापास झाला. शाळा सोडली. हातभट्टीच्या आणि स्मगलिंगच्या बिझनेसमध्ये लाखो रुपये कमावतोय तो. दोन गाड्या आहेत त्याच्या...मी शिकलो, चांगली नोकरी मिळाली तरी एवढा पैसा मिळणार नाही.

दुसरा : मग शिकायचं कशाला ? शिक्षणाला किंमत नाहीए आज...

दुसरी : ए वादविद नको ना...आपण काहीतरी गेम खेळू...

अँग्री : येस...मी हिला घेऊन गेम खेळायला बाहेर जातो. सकाळी येऊ आम्ही. (हिरॉइनला) कशी आहे ही कल्पना ?

पहिला : (पहिलीचा हात धरतो) वंडरफूल.

दुसरा : (दुसरीला जवळ घेऊन) चलो...

महाराज : आणि आम्ही ?

चौथा : तरी सांगत होतो आपण इक्वल नंबर घेऊ...

पहिला : डोन्ट वरी, वुइ विल मॅनेज...

दुसरी : सरना कळलं तर ?

तिसरा : त्यांचा काय संबंध ?

चौथा : आणि ते काय मोठे आदर्श पुरुष आहेत! ह्या पोरीच सांगतील. हो की नाही...त्या जुन्या समजुती फेका आता...

पहिला : नव्या पिढीची कविता छंदोबद्ध राहिली नाहीए...तो मुक्तछंद आहे. इटस् अ फ्री व्हर्स, लेटस हॅव एव्हरीथिंग...वाइन, वुमन, वेल्थ...

महाराज : वेल्थ (आठवण होते) चलो बेटे...काँट्रिब्युशन निकालो... पोरींनो, तुम्हाला सूट...तुमच्या ड्रिंकचे पैसे मी भरणार...

तिसरा : म्हणजे ? ह्यांनीसुद्धा–

महाराज : ऑफकोर्स. त्या मॉडर्न पोरी आहेत.

हिरॉइन : आम्ही नकोच म्हणत होतो– पण कंपनी दिली पाहिजे म्हणून उगाच जराशी (अँग्रीकडे पाहून) ह्यानं बळजबरीनं धरून माझ्या तोंडात ओतली.

अँग्री : आय हॅड टु– खूप दिवसांपासून ठरवलं होतं मी...तू माझ्यासाठी एक बंधन झुगारलंस. आता इतर...

हिरॉइन : स्टॉप इट. यू फूल.

अँग्री : तोंडाचा वास जाऊ दे, मग ही भाषा शोभेल. .(सगळे हसतात.)

महाराज . ए...पैसे काढा.

सोवळा : म्हणजे ?

महाराज : ड्रिंकचे पैसे...प्रत्येकानं पंधरा रुपये.

सोवळा : पण...पण तसं आधी सांगितलं नव्हतं.

महाराज : विचारायचं होतं ड्रिंक घ्यायच्या आधी.

तिसरा : ए भिकारड्या, फुकटची चैन हवीय काय ? पैसे काढ.

सोवळा : (खिशात हात घालतो) पण माझ्याकडे–

महाराज : पैसे काढ लेको, नाहीतर, सच्ची बोलतो, तुझा गळा दाबीन. . (ओरडतो) पैसे काढ. फुकट येते काय दारू. भिकारी तो भिकारी आणि साला आमच्या बरोबर पिकनिकला येतो... ह्या ब्यूटीफुल पोरी, ड्रिंक...तुला काय फुकट हवं ? (सगळे

हसतात.)

सोवळा : माझ्याकडे एवढे पैसे नाहीत.

अँग्री : झूट. (हसतो) तुझं पाकीट काढ.

सोवळा : पाकीट ? आँ ? माझे पाकीट—

अँग्री : हे बघ...हां...ह्यात मी एक्स्पर्ट आहे हं...आता एवढ्यात मारलं मी...(पाकीट महाराजकडे फेकतो) बघ, किती पैसे आहेत ?

सोवळा : ते...ते फॉर्मचे पैसे—

महाराज : ह्या पैशावर लिहिलंय का फॉर्मचे पैसे म्हणून ? (पैसे काढतो, सोवळा रडवेला होतो.) रडू नकोस पोरीसारखा...फॉर्म नाही भरलास तर परीक्षा व्हायची थांबणार नाही...राहा आणखी एक वर्ष कॉलेजात...आम्ही नाही सहा-सहा आठ-आठ वर्षं काढली.

सोवळा : तुमची गोष्ट निराळी आहे, तुमचे वडील श्रीमंत आहेत. माझे वडील—

चौथा : (हसतो) साला बापाला वडील म्हणतोय बघ.

अँग्री : आपल्याला जन्म देणारा माणूस तो म्हणे वडील, झूट.

महाराज : हे सगळे पैसे मी काढून घेणार. तू सगळ्यात जास्त ड्रिंक घेतलंस...

सोवळा : पण...(पाकीट परत घेऊ लागतो)

महाराज : (त्याच्या मुस्कटात मारतो) चूप... (सगळे हसतात.) पैसे नाहीत काय ? पैसे नाहीत तर विकून टाक बापाला...(सगळे हसतात.)

तिसरा : ए, हे बरोबर नाही हं. त्याचा बाप पाहिला आहेस तू ? विकला तर दीड रुपयादेखील येणार नाही.

पहिला : ही लुक्स लाइक अ वफून. (सगळे हसतात.)

सोवळा : (रडू लागतो) नको रे...हवं तर मला वाटेल ते बोला पण माझ्या वडलांना बोलू नका...प्लीज...माझे वडील देवमाणूस आहेत. त्यांच्या मूर्ख मुलानं आज दारू घेतली त्याची शिक्षा

त्यांना नको. गरिबी हा त्यांचा दोष नाही. ते प्रामाणिक आहेत; हा दोष आहे... माझ्यासारख्या मुलावर ते विश्वास ठेवतात, हा दोष आहे. मला तुम्ही मारलंत, माझी चेष्टा केलीत...ही शिक्षा हवीच होती माझ्यासारख्या नालायक मुलाला...ज्याला वडलांच्या पैशाची, त्यांची प्रेमाची किंमत कळली नाही. (रडतो.)

पहिला : दारू कशी बोलतेय बघ...

सोवळा : पहिलीच दारू अशी बोलते. पहिलं पाप पश्चातापाला बोलकं करतं...मला बोलू दे...नाहीतर मी वेडा होईन...ही श्रीमंत दारू मला पेलवत नाहीए...बोलल्याशिवाय मनावरलं हे ओझं हलकं होणार नाही...बाबा, तुमच्या ह्या कृतघ्न पोराला क्षमा करा...मी आज दारू प्यालो, तुमच्या पैशानं...मला माहीत आहे हा पैसा कुठून आलाय...ह्याचं मोल केवढं आहे हे आता मला कळतंय...

ह्या दारूनंच सांगितलं मला...सगळ्यांसारखा माझा फर्स्ट-क्लासचा पास असावा म्हणून ह्या वयात देखील थर्डक्लासनं तुम्ही उभे राहून जाता...तुमच्या खादीच्या फाटलेल्या कपड्या-तून माझे हे टेरेलीनचे कपडे विणले गेले आहेत.... बाबा, ह्या पोरांनी, ह्या पोरींनी तुमची टिंगल केली. त्यांना माहीत नसलं तरी मला माहीत आहे, तुम्ही किती मोठे आहात. जन्मभर ऊन झेलून आम्हाला सावलीत ठेवलंत... पिढ्या न पिढ्या सावलीतच राहाणाऱ्यांना तुमची किंमत कळणार नाही हो.. ह्यांना कळणार नाही की इतक्या वर्षांचं पानाचं एकुलतं एक व्यसन– मी कॉलेजात जायला लागल्यापासून तुम्ही सोडून दिलंत; आणि आज मी त्याच पैशानं दारुपान करतोय हे दु:ख मला जाळतंय...इथं मी कुणाच्या संगतीत आहे, पाहिलंत ? ज्यांना घराची ऊब माहीत नाही, ज्यांना आईवडील, बहीण-भाऊ ही प्रेमाची नाती माहीत नाहीत. (तिसऱ्याकडे बोट दाखवून) हा एकदा घरी आला होता आपल्या. पुढल्या खोलीत

तुम्ही रांगेनं लावलेल्या देशभक्तांच्या तसबिरींना हा हसला होता, म्हणाला होता, तुझ्या बापाला आर्टिस्टिक सेन्स नाही, कसल्या कुरूप माणसांच्या फ्रेम्स लावल्या आहेत...बाबा, त्यांतल्या एकाही मोठ्या माणसाला तो नावानंदेखील ओळखत नव्हता...तेव्हाच मी त्याच्या मुस्काटात मारायला हवी होती, त्या थोरांचा आणि तुमचा एकेरी उल्लेख केला म्हणून. बेचाळीसच्या चळवळीत तुमची चांगली नोकरी गेली हे त्याला सांगितलं तर म्हणाला, केवढा मूर्खपणा आहे. तुम्ही म्हणता ते खरं आहे. आम्हाला भूतकाळ ठाऊक नाही म्हणून आम्ही भविष्यकाळ घडवू शकत नाही. ह्या...असल्या माणसांच्या संगतीत मी आता आहे हो. त्यांना त्याग माहीत नाही, श्रद्धा माहीत नाही. (रडतो) फक्त भोग माहीत आहे, चैन माहीत आहे, स्वार्थ माहीत आहे...मला क्षमा करा...

महाराज : (त्याच्याजवळ पाकीट फेकतो) ए भिकाऱ्या, हे घे आणि चालता हो आधी...साला पिकनिकला येऊन–

दुसरी : नाय तर काय ?

सोवळा : मला भीक नकोय. ठेवून द्या ते पैसे...माझा गुन्हा, मला झालेली शिक्षा माझे वडील भोगतील ना तेव्हा मला खरी शिक्षा मिळणार आहे.

(अँग्री त्याला गचांडी देतो. तो दारातच पडून राहातो. रडत. कण्हत...)

पहिला : सो ?

हिरॉइन : काहीतरी गंमत हवी आता–

अँग्री : चल बाहेर. मी देतो...(तिचा हात धरतो.)

(सगळे टाळ्या पिटतात. इतक्यात मोटारचा आवाज.)

तिसरा : आला...हीरो आला.

दुसरा : हिचा दोस्त देखील येणार होता ना ?

महाराज : हीरोनं त्याला गाडीतून आणण्याचं कबूल केलं होतं.

पहिली : अय्या. खरंच...

दुसरी : नाय तर बघावं तेव्हा कॉम्पिटिशन चालू असते दोघांची.
हिरॉइन : (अँग्रीला) हात सोड माझा.
अँग्री : सॉरी...आजचा दिवस पुन्हा उगवणार नाहीए.
पहिला : त्या हीरोशी गाठ आहे.
अँग्री : म्हणून तर थ्रिल आहे. आम्हाला आता थ्रिल हवंय ! ! कसल्या तरी मोठ्या गुन्ह्याचं...सूड, बलात्कार, मर्डर...एनी कल्पवेल ऑफेन्स, फॉरीनमध्ये पाह्या...

(हीरो येतो.)

हीरो : हाय फ्रेन्डस् !
सगळे : हाय !
किती उशीर केलास रे.
तू नव्हतास तर काही साली मजा नव्हती.
व्हाय सो लेट ?
हीरो : इथं हा कोण पडलाय ?
तिसरा : आपला सोवळा.
हीरो : नुसताच पडलाय की मर्डरबिर्डर ?
चौथा : नुसताच...दारू पिऊन.
हीरो : मग काही थ्रिल नाही...माझी ब्यूटीक्वीन आलीय की नाही?
तिसरा : तुझी ?
हीरो : येस...माझी आणि माझी एकट्याचीच आता...
हिरॉइन : (हीरोचं लक्ष जाण्यासाठी अँग्रीला) ए, सोड ना हात.
हीरो : (अँग्रीला) सोड तिला.
अँग्री : सॉरी...आम्ही बाहेर जाऊन येतोय.
हीरो : म्हणजे ?
अँग्री : अ लिटल फन.
हीरो : हिच्याबरोबर ?
अँग्री : ऑफ कोर्स. (हसतो.) विथ हर अँण्ड विथ हर अलोन.
हीरो : आय से–लिव्ह हर अलोन.
अँग्री : आय से सॉरी.

दुसरा : म्हणजे ?

पहिला : त्याला थ्रिल हवंय.

अँग्री : (हीरोला) ही तुझी आहे म्हणतोस ?

हीरो : हो...हो. आता माझी एकट्याचीच.

चौथा : हीरो हिच्या दोस्ताला आणणार होता ना बरोबर ?

पहिला : तो कसला येणार ?

तिसरा : छोड दो ये बात...हीरोशी फाइट द्यायचा चान्स तो सोडणार नाही, डरपोक नाही तो.

अँग्री : म्हणजे आतापुरती ही तुझी एकट्याची, असंच ना ?

हीरो : आतापुरती नाही, कायमची.

अँग्री : आर यू शुअर ?

हीरो : हंड्रेड परसेंट.

अँग्री : व्हेरी गुड...म्हणजे मला हिला न्यायला हरकत नाही.

हीरो : व्हाट डू यू मीन ?

अँग्री : रीव्हेंज...तुझा सूड घ्यायचाय मला.

हीरो : थँक्यू. फक्त आता कारण सांग.

पहिला : हां...लेटस नो अ एक्झॅक्ट रीझन..

अँग्री : तुझ्या बापानं माझ्या आईला फसवून नेलंय, कळलं ? तुझा बाप रास्कल आहे...

चौथा : पण त्याचा सूड ह्याच्यावर का ?

अँग्री : बापाचा पैसा ह्याचा, तसंच बापाचा गुन्हा तो ह्याचा गुन्हा...

हीरो : कुणाशी बोलतो आहेस?

अँग्री : तुझ्याशी...तुला कोण भितंय ?

हीरो : हिच्या सो कोल्ड दोस्ताचं काय झालंय–माहीत आहे ?

सगळे : काय झालं ? भांडण ? मारामारी ?

हीरो : त्याचा निकाल लावून टाकलाय मी.

मुलगी : म्हणजे ?

हीरो : इथं येताना त्याला मी गाडीतून फेकून दिलं...आय मर्डर्ड हिम. बोलणार नव्हतो, पण ह्या माणसासाठी (अँग्रीला धरतो.)

खुनाची सवय झालीय आता मला... (सगळे घाबरतात.)

अँग्री : हा खून पचणार नाही तुला...

सगळे : अरे पण.... (दचकतात.)

हीरो : माइंड वेल...कुणी जास्त शहाणपणा केला तर माझ्याशी गाठ आहे.

अँग्री : बस्स, हेच थ्रिल हवंय...नाहीतर काय आहे आपल्या लाईफ-मध्ये ? ज्या गोष्टी शिकत आलो त्या बाजारात मांडलेल्या दिसताहेत...सरळ जगून आता चालण्यासारखं असतं तर तो आठ बुकं शिकलेला हातभट्टीवाला तुमच्या-माझ्यासारख्यांना विकत घेऊ शकला नसता. ह्या सोवळ्याला अशी शिक्षा मिळाली नसती...कोण सरळ वागतंय ? ह्या निर्लज्ज पोरी ? विद्यार्थीदशेत दारू पिणारे, जुगार खेळणारे, प्रतिस्पर्ध्याचा खून करून विजय मिळवणारे आपण ? कोण सरळ आहे ? सगळे सेल्समन आहेत. सगळे सगळं विकताहेत... घर, दार, बायको, शिक्षण (हिरॉइनचा हात घट्ट धरतो.) चल राणी, मला थ्रिल विकत हवंय. (हीरोला) अर्ध्या तासात येतोच आम्ही, (सोव-ळ्याच्या अंगावरून जाऊ लागतो. हीरो पुढं धावतो. इतक्यात काळोख.)

# अंक दुसरा : दुकान चवथे

(एक खोली. दोन-चार बाके. काही स्टुले. बॉस येरझारा घालतोय. चौघेजण– त्यात एक मुलगी पेपर लिहिण्यात दंग. एक मुलगी आणि बच्चू गप्प बसलेत. १ ला लिहिणारा 'टक टक' करतो.)

बॉस : येस ?

१ लिहि. : सप्लिमेंट. (बॉस सप्लिमेंट देतो.)

बॉस : किती प्रश्न झाले ?

१ लिहि. : दोन कंप्लिट. तिसरा स्टार्ट करतोय.

बॉस : व्हेरी गुड. पेपर सोपा हाय ना ?

१ लिहि. : ठीक आहे. साल्यांनी ऐत्या वेळी दोन प्रश्न बदलले.

बॉस : बदलले नाहीत. एचनं आपल्याला फसवलंय. दोन प्रश्न त्यांनी खोटे दिले.
पैसे वाढवून मागत होता. म्हटलं, लास्ट टायमालाच वाढवलेत. फुडल्या इयरला बघू; तर साला फिरलेला दिसतोय. एवढी एक्झॅम होऊ दे. मग तो हाय आणि मी हाय. (हसतो. सिगरेट पेटवतो. दोन झुरके घेतो.) पण साला मगजवाला हाय, एच. (दुसऱ्या लिहिणाऱ्याला) तुम्ही– नंबर सहाशे अका–

जरा जलदी करा. अक्षर चांगलं काढत नाय ना ?

२ रा : नाही. बॉस. मलादेखील सप्लिमेंट देऊन ठेवा दोन-चार.

बॉस : काय– घरी न्यायची आयडिया हाय काय ? साला वांधा होईल हो. नंबर टाकलाय बरोबर पेपरावर ? (२ रा मान डोलावतो.) किती ?

२ रा : सहाशे अक्का.

बॉस : शाबास...आणि बाई, तुमचं काय ?

पहिली : (हसते) ओन्ली वन क्वेश्चन कंप्लीट.

बॉस : च्...त्या पोरीला फेल व्हायचं नाय हां...हात जलदीनं चालवा. येत नसेल तर ह्यांना कुणाला इचारा...हां...चार वर्ष बिझनेस करतोय. कुणाचं नुकसान नाय केलेलं. विद्यार्थी पास होणार म्हणजे पास होणार. फस क्लास, तर फस क्लास. हां...बिझनेस म्हणजे रिप्युटेशन पायजे. (बच्चूला) काय साहेब, खरं का नाय ?

बच्चू : हो...हो नं...बॉस, माझ्या परीक्षेचं–

बॉस : डोण्ट वरी मीन्स डोण्ट वरी...तुमच्या नंबरवर आमचा माणूस गेलाय (पहिल्याला) आता म्हणजे फिजिक्स पार्ट वन ना ?

१ ला : हो.

बॉस : म्हणजे आमचा 'पी' गेलाय. (बच्चूला) मिस्टर, आमचा 'पी' म्हणजे क्वेश्चन नाय, सेकण क्लास शुअरली...काय, फुडल्या इयरला मेडिकल ना ?

बच्चू : हो.

बॉस : मेडिकलला ॲडमिशन मिळाली की पेढे आणायचे हो. (हसतो.) आणि फुडल्या इयरपासून आम्ही मेडिकलची पण लाईन स्टार्ट करायची म्हणतोय. तुमच्यासारख्यांचा सपोर्ट पायजे. (दुसऱ्या मुलीला) तुम्ही पण लक्षात ठेवा. यंदा साला फिजिक्सला वांधा आला...फिजिक्सवाले फार भेटत नाहीत. (पहिल्याला) अजून असिस्टंट आला नाही रे ?

१ ला : येईल.

बॉस : पण टाइम केवढा झाला, अजून दुपारचा पेपर हातात नाय, फिजिक्सवाला नाय... (सिगारेट चुरगाळून फेकतो.)

बच्चू : मी जरा बाहेर जाऊन येऊ का ?

बॉस : काय, फास लावायचाय का आमच्या गळ्याला ? पेपर होई-पर्यंत इथंच बसलं पाहिजे. तुम्हाला पहिले छूटच मी सांगितलं होतं.

बच्चू : पण जरा—

बॉस : नो मीन्स नो. कशासाठी पण बाहेर जायचं नाही. साला तिकडे परीक्षेला बसला असता तर बाहेर सोडलं असतं ?

२ री मुलगी : अहो, पण ती परीक्षा आणि इथली—

बॉस : दोन्ही परीक्षाच— इथली जास्त लफड्याची. कुणी चुगली खाल्ली तर दहाजणांचा गळा जाईल...समजलं ? अहो, ह्या बिझनेसमध्ये देखील काँपिटिशन हाय. (बच्चूला) कुठंही बाहेर जायचं नाही.

बच्चू : कंटाळा आलाय—

बॉस : (हसतो) अभ्यासाचा कंटाळा आला म्हणून इथं पैसे भरले तुमच्या फादरनी... आता इथंसुद्धा कंटाळा ? ...हल्लीच्या पोरान्ला साला अख्खा दिवस टाईमपास हवा.

बच्चू : हो, म्हणजे—

बॉस : बकवास बंद. साले हे पेपर लिहिताहेत, दिसत नाही ? डोण्ट डिस्टर्ब देम. आपण एक काम करायचं नाही, आणि पब्लिकला पण हैराण करायचं...टाईमपास हवा तर, (हसतो) साला तुमचा पेपर तर बघा...कळू दे तर खरं, आपल्याला कोणता पेपर आला...(बाजूला जाऊन टेबलातून पेपर काढत) फिजिक्स पार्ट वन...पार्ट वन...हां...घ्या (दुसऱ्या मुलीला) आणि हा तुम्हाला...प्रॅक्टिकललादेखील तुम्हाला सब्स्टीट्यूट हवाय ना ?

बच्चू : हो.

बॉस : (दुसरीला) तुम्हाला ?

२ री मुलगी : हो.

बॉस : (दुसरीला) पण त्याची फी दिली नाय तुमी. आम्हाला ह्या स्कॉलरना द्यावे लागतात ना पैशे ?...हां, दोन दिवसांनी दिले तरी वांधा नाय...तुमच्या माहितीच्या कुणाला मदत पायजे असेल तर सांगून ठेवा हां आधी. आधी समजलं म्हणजे अॅरेंज-मेंट करायला इझी होतं...भानगडी दोन आहेत. फिजिक्स-वाले आणि मुली मिळणं म्हणजे डिफिकल्ट पडतं. (दारावर टक टक) कोण हाय ?

असिस्टंट : ग्रॅज्युएट. ग्रॅज्युएट.

बॉस : ग्रॅज्युएट (बच्चूकडे बघून हसतो) आमचा कोडवर्ड हाय... (दार उघडतो. दारात असिस्टंट आणि एक स्कॉलर...चष्मा लावलेला.) या.

असिस्टंट फिजिक्सवाला. (स्कॉलरला) हा आमचा बॉस.

स्कॉलर नमस्कार.

बॉस : ते राहू दे. तुमची माहिती पायजे.

स्कॉलर : (इकडे-तिकडे पाहात) माझं नाव--

बॉस : नाव गेलं खड्डयात. शिक्षण किती झालंय ?

असिस्टंट : बॉस, स्कॉलरशिप होती ह्याला. सिनिअरला शिकत होता.

बॉस : (हसतो. स्कॉलरला) तुम्ही असेच-- दुसऱ्यांनी पेपर लिहून पास झालेले नाहीत ना ?

स्कॉलर : (दचकतो) आँ ? नाही...नाही. खरं तर हा प्रकार मला या क्षणापर्यंत ठाऊक नव्हता. असं पास होण्यापेक्षा मी जीव दिला असता.

बॉस : (हसतो) तुमचा जीव स्वस्त हाय, म्हणून बोलताय. हे जीव पहा. पैशेवाल्यांचे हायेत. आजकाल पैसा पायजे, बस्स...काय पायजे ते विकत मिळेल-- परीक्षा, पेपर, मार्क, क्लास, डिग्री. हां, चार वर्षांचा अनुभव हाय माझा. सीझनला पाच-दहा हजार मोजून घेतो...बरं, इंटरचा फिजिक्स पेपर लिहिता येईल तुम्हाला ?

स्कॉलर : हो.

बॉस : शिवाय पायजे तर सगळी बुकं हायेत. बिझनेस करायचा म्हणजे लायब्ररी पायजे. असिस्टंट, त्यांना ट्रंकेतील पुस्तके दाखव. रूम पायजे, तुमच्यासारखे स्कॉलर पायजेत...आमच्या असिस्टंटनी पैशाचं सांगितलं ना ?

स्कॉलर : हो...मला स्वतःला हे पसंत नाही हो, पण परिस्थितीमुळे.

बॉस : काय झालं ?

स्कॉलर : माझे वडील सस्पेंड झाले आहेत.

बॉस : का ? पैसे खाल्ले म्हणून ?

स्कॉलर : छे हो. पैसे खाल्ले नाहीत म्हणून त्यांना काढून टाकलंय... शिक्षक होते ते शाळेत.

२ री मुलगी : बिच्चारे.

२ रा लिहि. : किती वडबडताय हो तुम्ही ? बॉस, सप्लिमेंट प्लीज. (बॉस सप्लिमेन्ट देतो.)

बॉस : (लिहिणाऱ्या मुलीला) बाई, तुम्हाला सप्लिमेंट नको ?

१ ली मुलगी : माझं अक्षर बारीक आहे.

बॉस : किती क्वेश्चन झाले ?

१ ली मुलगी : दोन होत आले.

बॉस : दोनच ? असिस्टंट, बाईंना पैसे द्या आणि म्हनावं, दुपार-पासून येऊ नका. पोरान्ला काय नापास करायचं हाय पैशे घेऊन ?

असिस्टंट : मग दुपारचा पेपर कोण लिहिणार ?

बॉस : कोण काय ? तुझा बाप. मी लिहिणार.

बच्चू : तुम्ही ?

बॉस : मग काय हरकत हाय ? मी बी. एस्सीपर्यंत शिकलोय म्हटलं. आणि तुमच्यासारखा नाय. प्रत्येक टायमाला सेकण्ड क्लास.

२ री मुलगी : मग इथं कसे आलात ?

बॉस : आणलं तुमच्यासारख्या एका पैशेवाल्यानं, माझा रूमपार्टनर होता. वर्षभर उनाडक्या केल्या. मला म्हणाला, परीक्षेच्या

टायमाला तू माझा पेपर लिही, मी तुझा लिहितो...पाचशे रुपये कबूल केले.

बच्चू : मग ?

बॉस : मग काय ? परिस्थिती बेकार होती. डिग्री घेऊन तरी काय लगेच सर्व्हिस मिळणार होती ? केलं कबूल. शेवटच्या पेपरा-पर्यंत पैशाचं नाव काढेना तो. म्हटलं, सालं फुक्कट जाणार. पैशे नाहीत, डिग्रीपण नाही. शेवटच्या पेपरला मीच कंप्लेंट केली...दोघांची दांडी गुल...तीन वर्षं डीबार...मग ह्याच बिझनेस स्टार्ट केला...नायतरी सर्व्हिसमध्ये इतके पैशे मिळाले नसते...(हसतो. लिहिणारे ऐकत बसले आहेत) बघताय काय? पेपर लिहा. नंबर सहाशे अक्रा, तुझी गोष्ट डिफरंट आहे. तू स्लो लिही. सहाशे अक्राने फक्त पासाचे पैशे दिलेत. त्याला क्लास नकोय...बाई, तुम्ही सुद्धा पास होयला पायजे...

स्कॉलर : मी...माझं काय ? कुणाला कळणार बिळणार नाही ना ?

बॉस : डोण्ट वरी. सगळा कंप्लीट बंदोबस्त ह्राय. हां, तुमची पयली टाईम म्हणून नर्व्हसनेस येणार... तुम्ही दुपारपासून पेपर लिहायचे, पेपरप्रमाणे पैसे मिळतील... फसक्लासवाल्याचं काम जमेल ना ?

स्कॉलर : हो...पण...म्हणजे काय आहे...मला...माझा अगदीच नाइ-लाज झालाय...माझं मन आतून रडतंय. माझ्या केवढ्या आकांक्षा होत्या. डिग्री मिळाल्यावर—

असिस्टंट : तुम्हाला काय लगेच मोठी नोकरी मिळणार आहे हजार रुपयाची ?

स्कॉलर : तसं नाही हो. डिग्री मिळाल्यावर मी माझ्या गावात एक छोटी शाळा काढणार होतो...अगदी आदर्श. माझ्या शाळेचा प्रत्येक विद्यार्थी देशाचं भवितव्य घडवणारा असाच बनवणार होतो. वडलांकडून मी केवढी स्फूर्ती घेतली होती. साधं त्यागमय शिक्षकाचं जीवन, अहोरात्र ज्ञानदान. शाळेनं मला फक्त दोन वेळचे चार घास आणि लज्जारक्षणापुरतं वस्त्रं एवढं पुर-

वायचं. ज्ञानदानाचं पुण्यकर्म करायचं होतं मला... आणि मी आज इथं ह्या ठिकाणी पापकर्म करायला (मटकन बसतो.)

असिस्टंट : (हसतो) बेवकूफ, सालं आजच्या जमान्यात –

बॉस : (असिस्टंटला) चूप, तुला कळलं तरी का तो काय बोलला? (स्कॉलरला) तुम्ही बोला हो, मनातून आलेले असे शब्द हल्ली एकायला मिळत नाय...सगळे साले गोड शब्द विकतात.

२ री मुलगी : (स्कॉलरला) तुम्ही आणखी बोला ना... मला असं ऐकायला खूप खूप आवडतं...(बच्चूला) तुम्हाला आवडतं? (बच्चू मान डोलावतो.)

स्कॉलर : (२ऱ्या मुलीला) तुम्ही सुद्धा माझ्यासारख्या–

२ री मुलगी : नाही.

बॉस : (हसतो) हे तुम्हाला पोसणारे विद्यार्थी...ह्या बाई आणि हे– ह्यांच्याऐवजी दुसरी माणसं परीक्षेला बसलीएत. खूप पैशेवाली माणसं हायेत.

२ री मुलगी : मी...मी नाही हं...मी एका सामान्य कुटुंबातली–

बॉस : मग आमची एवढी फी चटकन कशी–

२ री मुलगी : मी...मला...(स्कॉलरला) मला किनई, माझ्या एका श्रीमंत मित्रानं पैसे दिले...तो दरवर्षी इथूनच पास होतो...

बॉस . (हसतो) आलं लक्षात, लव स्टोरी.

स्कॉलर : प्रेम, त्याचं खूप प्रेम आहे तुमच्यावर ?

२ री मुलगी : अं, हो...असावं...

बॉस : म्हणजे अजून ओळख पटायचीय...बाई, हे इयर झालं की सरळ विचारा त्याला...

१ ला लिही. : तुम्ही गप्प बसताय की पेपर टाकू ?

असिस्टंट . बॉस, किती वाजले पाहिलंत ? मला हे पेपर घेऊन तिकडे हॉलवर जायचंय...माहीत आहे ना? बोलू नका आता .. दुपारच्या पेपरचं काय ?

बॉस · तो वांधाच झालाय. 'एच' चा अजून पत्ता नाही. फुडल्या इयरला त्याला गचांडी देऊन दुसरा माणूस पायला पायजे.

स्कॉलर : हा ‘ एच ’ कोण ?

बॉस : एक चीज आहे, पेपर फोडायचे आणि आणून द्यायचे यात त्याचा हात धरणारा कोणी नाय.

२ री मुलगी : पण हे असं करणं म्हणजे जरा–

बॉस : तुमच्या प्रेमाप्रमाणेच हाय– जमलं तर ठीक, नायतर रीस्क... आजकाल बाई, कोण प्रामाणिक हाय ? तुम्ही प्रामाणिक नाय, तुमचं प्रेम प्रामाणिक नाय...चैनीत जगायचं तर ही सगळी नाटकं–

बच्चू : माझा वेळ जात नाही हो–

बॉस : वर्षभर अभ्यास केल्याशिवाय कसा वेळ गेला ? आता फक्त तीन तास काढायचे आहेत. दुपारी चहा घेऊन या. पुन्हा बसा. बाहेर कुणी पायलं तर–

बच्चू : पण इथं वेळ कसा काढू ?

बॉस : ओ के, त्याची पण तयारी ठेवतो आम्ही. (बाजूच्या कपाटातून पत्त्याचे जोड आणतो) हे घ्या पत्ते. बाई, तुम्ही पण खेळा. त्यांच्याबरोबर वाटल्यास पैशे लावून रमी– हा श्रीमंतांचा खेळ हाय.

स्कॉलर : इथं पत्ते खेळतात मूलं ?

असिस्टंट : पत्ते खेळले तरी खूप झालं. चहा, सिगरेटी, कधी (अंगठा ओठाशी नेतो.)

स्कॉलर : हे विद्यार्थी, म्हणून मला एक आदर्श शाळा काढायची होती हो.

२ री मुलगी : तुम्ही खरंच अशी शाळा काढा, यापुढं आमच्यासारखे विद्यार्थी निपजता उपयोगी नाही. (रडू लागते.)

बच्चू : तुम्ही रडता काय ?

१ ली मुलगी : काय झालं हो ?

बॉस : (पहिल्या मुलीला) आधी पासिंग मार्क्स मिळवा, मग चौकशी करा.

१ ला लिही. : अरे, काय बडबड चाललीय ?

स्कॉलर : ही माणसं नेहमी हेच करतात ?

बॉस : नो, सिझनप्रमाणं आम्ही त्यांना डेली वेजिसवर ठेवतो. एस. एस. सी. पासून बी. ए., बी एस. सी, बी. कॉम., अहो, म्हटलं तर ही इन्स्टिटयुशनच हाय.

स्कॉलर : (२ ऱ्या मुलीजवळ जातो) तुम्ही रडू नका...माणसाच्या हातून चुका होतात. मी नाही का आज जाणूनबुजून हा गुन्हा करतोय. मला तर इतकं रडू दाटलंय...तुम्ही निदान वर्षभर प्रेम केलंत. मी अभ्यास करूनदेखील ही गुन्हा करण्याची शिक्षा भोगतोय. .तुमच्यासारखं प्रेम करणं...

२ री मुलगी : ते सुद्धा चुकलंच हो माझं...तो मला फसवणार आहे...नक्की.

स्कॉलर : दुसऱ्यानं फसवलं म्हणून आपलं प्रेम डागळत नाही. जे नैसर्गिक असतं, प्रामाणिक असतं ते सुंदर राहातं.

बच्चू : (स्कॉलरला) पत्ते खेळणार ?

स्कॉलर : अंहं...त्यापेक्षा या बाईंना विचारा ना. त्यांचा पार मूड गेलाय.

बच्चू : (दुसऱ्या मुलीला) येणार खेळायला ?

२ री मुलगी : नको...आता कशातच काही अर्थ राहिलेला नाही.

(दारावर टक टक)

बॉस : –शू....कोण हाय ? (बच्चूला) पत्ते वापरण्याचा चार्ज दोन रुपये हाय. (असिस्टंटकडे पाहून) तो ह्याच्याजवळ देऊन ठेवा. डिटेक्टिव्ह पुस्तक वाचायचं असेल तर चार्ज एक रुपया हां.... बिझनेस मीन्स बिझनेस. (दारावर टक टक) कोण हाय ?

एच : ग्रॅज्युएट, ग्रॅज्युएट...

बॉस : हां. (दाराशी जातो, स्कॉलरला) तिथं टेबलाशी बसून काहीतरी लिहीत बसा...डोण्ट वरी. (दार उघडतो) आलात ?

एच : हो. काय गडबड आहे ?

बॉस : कुठं काय, नवीन आलेल्या स्कॉलरला जरा इन्स्ट्रक्शन देत होतो. (हसतो) हे स्कॉलर–

(स्कॉलर उभा राहून नमस्कारासाठी हात वर उचलतो,

दचकतो.)

एच : तू ?

स्कॉलर : सर. (एकदम एचच्या पाया पडतो) सर...क्षमा करा मला. मी...म्हणजे,.. मी आताच...नाही सर, माझा नाइलाज. तुम्ही माझ्याबद्दल किती अपेक्षा बाळगल्या होत्या ठाऊक आहे मला. तुम्हाला हे काळ तोंड असं...(एच अवाक्.)

बॉस : (मोठ्याने हसतो) ए, ऊठ. वेडा की काय, पाया कसला पडतोस ?

स्कॉलर : (बॉसला) तुम्हाला काय ठाऊक–ही व्यक्ती किती मोठी आहे. ह्यांनीच मला नेहमी उत्तेजन दिलंय, आमच्या शाळेचे हे हेड-मास्तर...

बॉस : (हसतो.) उठा आता. आमचा एच म्हणतात तो हाच. हा एच आम्हाला पेपर आणून देतो. सगळ्यावर सुपरव्हिजन...साला एकदम आयडियाबाज...

स्कॉलर : सर, सर, हे खरं आहे ?

बॉस : एच, लेका, सांग ना.

एच : दुर्दैवानं खरं आहे. नाइलाजापोटीच ही पापाची फळं आली आहेत.

स्कॉलर : सर...सर, हे पाप करण्यापेक्षा–

एच : पाप आणि पुण्य. व्याख्या पार बदलल्या आहेत त्या शब्दांच्या. आजकाल पापाशिवाय जगता येत नाही. पुण्याचा हात धरावा तर मरणच भेटतं... घरी दहा तोंडे खाणारी आणि मिळव-णारा मी एकटा...अरे, लायकीपेक्षा जास्त पैसा लाभला की माणसं पापं विकत घ्यायला लागतात; आणि गरजेपुरताही पैसा ज्यांना मिळत नाही ती माणसं पाप विक्रीला काढतात. तुझ्या वडलांची तरी नोकरी का जावी ? ते देखील एक आदर्श शिक्षक होते ना ? हां, जाऊ दे. पापाचा विचारच करायचा नाही. तू इथं आलास हे छान झालं. (बॉसला) हा एकदम हुषार पोरगा आहे. तुम्हाला फर्स्टक्लासच्या ऑर्डर्स घ्यायला

हरकत नाही. ह्यालासुद्धा पैसा मिळेल–

स्कॉलर : सर, तुम्हीच मला हे सांगताय. पटत नाही हो... मी... मला कुणी वेगळंच व्हायचं होतं.

२ री मुलगी : त्यांना किनई, आपल्या गावात एक आदर्श शाळा काढायची होती.

एच : विसर ते...आदर्शाचे दिवस गमावले आहेत आपण...दुनियेच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठीच आदर्शाच्या गप्पा कराव्यात आणि आपली पोतडी भरत राहावी हा व्यवहार आहे.

स्कॉलर : मला पटत नाहीए ते अजून...पटणारसुद्धा नाही कधी. तुमचा हा व्यवहार विसरून एकजण जरी आपल्या मार्गानं गेला तरी खूप कार्य होईल. माझी श्रद्धा मला हेच सांगत आलीय.

२ रा लिहि. : बॉस, पेपर देऊ ? पन्नास मार्कांचा सोडवलाय. चाळीस नक्की मिळतील.

बॉस : त्या बाईंना जरा मदत करा. त्या फार स्लो चालल्या आहेत. (पहिल्याला) तुमचं काय ?

१ ला लिहि. निक्काल... साले तुम्ही बडबडताय किती ? हा एच म्हणजे साला मास्तर. तासभर बडबड बडबड...

स्कॉलर : चूप रहा. कुणाला बोलताय ?

एच : (हसतात.) वेड्या, ह्या पापाच्या खाईत सगळेच मान आणि सगळेच अपमान... तू असं कर, हीच लाईन धर आता. पैसा मिळेल–

स्कॉलर : (रडू लागतो.) सर, प्लीज... तुम्ही असा काही धडा शिकवू नका. मला सहन होत नाहीए हो.

एच : मग काय करणार आहेस तू ? तुझी स्कॉलरशिप गेली... परीक्षेच्या फीचे पैसे तुझ्याजवळ नाहीत... घरी बापाला उपास पडताहेत. आणि शिकून तरी असे किती पैसे मिळवणार आहेस ? भिकेची लक्षणं आहेत ही. म्हातारपणी ह्या पुण्याचाच पश्चाताप होईल.

स्कॉलर : नाही नाही. मी भीक मागेन, पण–(खाली कोसळतो.)

एच : मग माग भीक. तीसुद्धा महाग पडेल. भीक मागतोय म्हणे... माझं ऐक आणि ह्या धंद्यात–

बॉस : वा रे मास्तर. स्कॉलर, अहो स्कॉलर–

२ री मुलगी : (पुढं जाऊन स्कॉलरच्या पाठीवरून हात फिरवते.) अहो, असं काय करताय? (बॉसला) तुम्ही काही सांगा हो.

बॉस : स्कॉलर, माझं ऐका. तुम्ही आता दुपारचा फक्त पेपर लिहा. ऐत्या वेळी दुसरा माणूस मिळणार नाही म्हणून एवढं एक पाप करा. वाटलं तर उद्यापासून येऊ नका–

एच : आणि भीक मागायला लागा. (स्कॉलरला) माझ्याबद्दल तुला मिळालेली बातमी कुठं फोडलीस तर याद राख... माझ्याशी गाठ आहे. म्हणे, आदर्श. अजून ऐक, या मार्गानं आलास तर पैशाची रास पडेल पायाशी.

बॉस : चूप रे...कोण भीक मागणार? हे स्कॉलर? अरे जा. स्कॉलर, माझं ऐका. तुमच्या मनच्या मार्गानं बघा जाऊन, जमलं तर ठीकच. नाहीतर या मग माझ्याकडे. काही कसली मदत लागली तर मी हाये तुमच्या पाठीमागं. तुमच्या ह्या वयात जो काळीज शाबूत ठेवतो तो कधी ना कधीतरी जिंकतोच. हो, खोटयाची दुनिया फक्त चार दिवसांची. जा बेटा, दुपारचा पेपर देखील लिहू नकोस. कशाला विटाळतोस तुझे हात? (स्कॉलर रडू लागतो.) अंहं... रडायचं नाही. पापाशी लढत द्यायची आहे ना तुला. कधी पैशाची अडचण पडली तर ये माझ्याजवळ–(एचला) मास्तर, तेव्हा बी. एस्सीला असताना मी असाच होतो. देव होणार होतो तो राक्षस झालो. एज्युकेशनचाच धंदा खोलला. ह्या स्कॉलरना होऊ दे देव.

२ री मुलगी : खरंच? (खूप आनंद होतो.)

बच्चू : पण मग उद्या पोरांचं काय होणार?

बॉस : तुझ्यासारखीच नालायक पोरं ना? मरू दे त्यांना...

१ला लिहि. : बॉस, एक तास राहिलाय...बकवास बंद करो.

असिस्टंट : (बच्चूला) पायाचे दोन रुपये–

स्कॉलर : मी... मला... तुमचे उपकार—

बॉस : एक झकास शाळा काढ की फिटले उपकार आणि आमची पापं. काय एच? (मोठ्यानं हसत राहातो.)

असिस्टंट : (बच्चूला) पायाचे दोन रुपये. (पैसे घेऊन बॉसला देतो. बॉस पैशाची रास ठेवतो. बघत राहतो.)

का ळो ख.

# अंक तिसरा : दुकान पाचवे

(मोठ्या रेल्वे-स्टेशनचा बाहेरचा भाग. दूर गावाहून येणाऱ्या-जाणाऱ्या गाड्या ह्या स्टेशनवर येतात. अनाउन्सरचा आवाज दुरून ऐकू येतो...करीब देढ घंटा देरीसे आयेगी...दादा पेपर वाचत उभा आहे. लंगडा भिकारी जाताना दिसतो. लोकांची जा-ये चालली आहे. एक पोलीस उगाच इकडेतिकडे संशयाने पाहून जातो. साथीदार येतो.)

साथी : एक्स्क्यूज मी–

दादा : (अनोळखीपणे) येस ?

साथी : दिल्लीची गाडी यायला अजून किती अवकाश आहे ?

दादा : मी स्टेशनमास्तर नाही, आपण तिकडे जाऊन स्टेशनमास्तरला विचारू शकता.

साथी : आर यू वेटिंग फॉर अ टॅक्सी? (दादा गप्प) आपल्याला टॅक्सी–

दादा : माफ करा. (वाचू लागतो.)

साथी : जरा मधलं पान देता ? (दादा नाइलाजाने पेपरच देतो. साथीदार वाचू लागतो.) काय भयंकर बातमी आहे हो. (दादा गप्प.)

(पोलिस येतो. थांबतो.)

दादा : (पोलिसाला) काय हवालदार ?

पोलिस : (तोंडात पान कोंबत) हं...ठीक–

दादा : नवीनच पोस्टिंग झालेलं दिसतंय,

पोलिस : हो. कालपरनंच पोस्टिंग झालंय इथं.

दादा : किती वर्षं झाली खात्यात ?

पोलिस : दोन.

दादा : व्हेरी गुड. इथं हल्ली एस. आय. कोण आहे ?

पोलिस : काय बघा...असं बरंचससं काय नाव आहे–

दादा : (हसतो) तेही नवीनच आले आहेत ना ट्रान्स्फर होऊन ?

पोलिस : हो. तरी बघा वर्ष झालं असेल.

दादा : (हसत) कसे काय आहेत तुमचे साहेब ?

पोलिस : म्हंजे ?

दादा : अहो, माझ्याच कॉलेजमध्ये होता तो. (पोलिस कौतुकाने पाहतो.) अभ्यासात तसा हुषार नव्हता. पण क्रिकेट काय खेळायचा. आता तुमच्या खात्यात सुद्धा म्हणे मोठं नाव कमावलंय.

पोलिस हो हो.

साथी : थँक्यू (पेपर परत देऊ लागतो)

दादा : वाचा ना. मी मिसेसची वाट बघतोय, तोपर्यंत–

पोलिस : आमच्या लायनीत असं आहे बघा–

दादा : हवालदार, तुम्हा लोकांनी ह्या तिकिटांच्या क्यूकडे विशेष लक्ष दिलं पाहिजे. चक्क ब्लॅक चाललंय. मघाशी तिथं मी प्लॅटफॉर्म तिकीट घ्यायला गेलो...ओह, इट वॉज हॉरिबल.

पोलिस : आता आम्ही काय सांगायचं? इथं स्टेशनवर असे गुन्हे वाढलेत. घ्यायला बघावं तर एका टायमाला सगळीच मान्सं गुन्हेगार वाटतात. तर दुसऱ्या टायमाला सगळी मान्सं एकदम जंटलमेन.

दादा : (हसत) खरंय. (टाळी वाजवतो. कुणाला तरी हात करतो.)

साथी : हवालदार, दिल्लीची गाडी–

पोलिस : यील एवढ्यात.

(बाई येते. श्रीमंतीची ऐट.)

बाई : (दादाला) उशीर झाला ?

दादा : अग, गाडी लेट आहे म्हणून ठीक. नाहीतर तुझी चुकामूक झाली असती. बेबीला नाही आणलंस बरोबर ?

बाई : बेबी ? हां, नाही आणलं. पप्पू देखील मागं लागला होता. आय सेड नथिंग डुइंग... (पोलिस गांगरतो. जातो.)

दादा : (पोलिसाकडे बघत) थँक्यू... साला सारखा संशयानं पाहात होता.

साथी : बातमी वाचलीत ?

दादा : केव्हाच.

बाई : कसली बातमी ?

साथी : आपलीच. ती मागली केस...तीन वर्षं झाली.

दादा : ह्या कानाचं त्या कानाला कळलं नाही. आपल्या ज्युनिअरचं काम म्हणजे शंभर टक्के. (साथीदाराला) तू जा इथून... आणि बघून ये. उभा राहू नकोस. (साथी जातो, बाई पेपर घेते, वाचते.) आपल्या चारशेवीसची जाहिरात येतेय, ती वाचतेस ना ?

बाई : मग ? परवा तर त्याची मी साली गंमतच केली.

दादा : काय ?

बाई : त्या हॉटेलात गेले. म्हटलं, मला पिक्चरमध्ये काम करायचंय.. बाहेर खूप पोरी आणि पोरं बसली होती. जाहिरातीवर साले विश्वास ठेवतात. (हसते) आत गेले.

दादा : मग ?

बाई : आपला फोरट्वेंटी डायरेक्टर म्हणून बसलेला...मला पाहिलं तशी दचकला. त्याला वाटलं, आपलं कमिशन वसूल करायला मी आलेय...

दादा : चारशेवीस झाला तरी कमिशन चोख देतो हं...काल आठशे दिले रोख...हं, पुढं काय झालं ?

बाई : मी म्हटलं, मी स्क्रीन टेस्ट द्यायला आलेय. (हसते.)

दादा : (रागावून) च्यायला, मग स्क्रीनटेस्ट दिलीस की काय ?

बाई : (वात्रटपणे हसून) तो काय सोडतोय मग ? दादा, रागवायचं काम नाही हां. तुझी काय बायको आहे मी ?

(लंगडा भिकारी येतो.)

लंगडा : साहेब, गरीबाला काही–

(दादा बाजूला बघतो. पोलिस येतो.)

दादा : (हळूच) कळलं (मोठ्याने) अरे हट. (लंगडा जातो. दादा सिगारेट पेटवून बायकोला) शी: व्हॉट अ वेस्ट ऑफ टाइम. तू टॅक्सीनं का आलीस ?

बाई : आपल्या गाडीचा डेल्को जरा ट्रबल देतोय–

दादा : (पोलिसाला) काय– एस. आय. साहेब आहेत का ड्यूटीवर?

पोलिस : नाहीत. हापवर आहेत.

दादा : (बाईला) आपला बाळ्या इथं एस. आय. म्हणून पोस्ट झालाय.

बाई : रिअली? त्यांनी एकदा जेवायला यायचं कबूल केलंय आपल्याकडे. त्यांना रिमाइंड केलं पाहिजे. (पोलिस जातो )हा सारखा येतोय हं इथं...

दादा : आज बराच नवीन फोर्स आलेला दिसतोय. (एकदम) तू त्या चारसोबीसला चान्स (ती हसते) माझ्याशी गाठ आहे– (म्हातारा आणि साथीदार येतात. दादाशी ओळख नसल्याचे साथीदार दाखवतो.)

म्हातारा : तर...अशी हकीगत आहे.
(अनाउन्सर : देहलीसे आनेवाली गाडी करीब डेढ घंटा देरीसे आ रही है.)

एक प्रवासी : (तिथून जाताना सोबत्याला) ह्या गाड्या कध्धी वेळेवर येत नाहीत.

सोबती : कोण येणार आहे दिल्लीहून ?

प्रवासी : माझी बहीण येतेय. एकटीच येतेय म्हणून जरा... (दोघे जातात.)

म्हातारा : घरी दोन मोटारी आहेत, पण म्हाताऱ्या बापाला आणायला स्टेशनावर यायच्या नाहीत, चाकं झिजतील ना ?

साथी : कुठं असतो मुलगा ?

(दादा आणि बाई ऐकतात पण ऐकत नाही असे दाखवतात.)

म्हातारा : हा पत्ता पहा, (खिशातून कागद काढत) मोठा हाफिसर झालाय. दोन-तीन हजार पगार आहे. राहायला झक्कपैकी जागा आहे...पण बापाच्या नशिबाचं लाटूर काही सुटत नाही. आता काय आहे ? माझी प्रकृती ही अशी तोळामासा. घरात बघायला एका गड्याशिवाय कुणी नाही. बरं, तोही म्हातारा. म्हातारा म्हणजे किती ? मला तरुण म्हणेल एवढा. काही दुखलं खुपलं तर चांगला डॉक्टर मिळायची मारामार...मुलगा महिन्याला दीडशे रुपये पाठवतो...हो, चांगलं ते चांगलं म्हटलं पाहिजे...एक तारीख कधी चुकली नाही. पण म्हणतो कसा ? तुम्ही तिकडे लातूरलाच चैनीत रहा. म्हणजे आहे की नाही ? त्याच्या फॅशनी जागेत मी शोभणार नाही म्हणून न येण्या-बद्दल दीडशे रुपये मोजतो तो. पैशाचा बाजार आहे ना हल्ली ! आता सांगा, मी इथं ह्या शहरात एकटा आलोय. खिशात नाही म्हटलं तरी दीडदोनशे रुपये. हो, प्रवास करा-यचा म्हणजे बरोबर पैसे हवेत...ह्या मुलाचा पत्ता नाही इथं. आणि मला त्याच्या घराचा पत्ता शोधायचा म्हणजे... कुणाला विचारावं तर प्रत्येकजण घाईत...तुम्ही देवमाणूस भेटला–

साथी . देवमाणूस काय आणि काय ? तुम्ही एकटेच दिसलात, माणूस म्हणून चौकशी केली.

म्हातारा : अहो, माणसासारखा जो माणूस वागतो त्यालाच देवमाणूस म्हणतात.

साथी : तेव्हा तुम्हाला मुलाकडे जायचंय.

म्हातारा : हो. त्याला चांगलं खडसावणार आहे. दोनच मुलगे. अहो, माझे डोळेच ते. धाकट्याची गरीबी, तो दहादा घरी बोलावतो राहायला, पण तुम्हीच सांगा, आपण कसं जायचं ? त्याच्या-

वर आणखी खर्चाचा बोजा पडणार आपल्यामुळं...इथं यावं तर हा मुलगा असा, या समुद्रात कुठं हरवलो, कुणी फसवलं–

साथी : तर काय ? त्याला इतका पैसा मिळतोय, तो शोधेल तुम्हाला.

म्हातारा : आणि पळवलं बिळवलं कुणीं...पेपरमध्ये वाचतो आपण. त्या गुंडानं मला पळवलं आणि मुलाला पत्र पाठवलं की, बाबा रे, एक पाच हजार रुपये पाठव, तुझ्या बापाला सोडतो.

साथी : (उत्सुकतेने) तर ?

म्हातारा : तर काय ? हा गधडा दिडकी देणार नाही. म्हणेल, यापुढं तेवढेच दीडशे रुपये वाचले. हां, आता धाकटा मुलगा आहे ना, त्याला कळलं तर तो जीव गहाण टाकून कर्ज काढील आणि सोडवील मला.

दादा : एक्स्क्यूज मी...व्हॉटस् रॉंग ?

साथी : ह्यांना मुलाचा पत्ता सापडत नाहीए.

दादा : ऐकलं मी. आपल्या टॅक्सीनं यांना नेलं तर–

साथी : काही उपयोग नाही.

(लंगडा येतो.)

लंगडा : (साथीदाराला) गरीबाच्या पोटाला काही–

दादा : काय त्रास झालाय ह्या भिकाऱ्यांचा, जा...(लंगडा जातो.)

साथी : (म्हाताऱ्याला) बाबा, तुम्हाला मी टॅक्सी करून देतो. टॅक्सीवाला बरोबर पत्त्यावर पोचवील.

म्हातारा : देवच भेटला हो तुमच्या रूपानं. (पोलिस येतो.)

पोलिस : (म्हाताऱ्याला) काय भानगड आहे ?

म्हातारा : काही नाही बाबा...ही भली माणसं भेटली–

बाई : व्हॉट अ पिटी, बिचारा म्हातारा...हवालदार, ह्यांना टॅक्सीनं पाठवून द्याल का– प्लीज ? आणि टॅक्सीचा नंबर घेऊन ठेवा हं. आजकाल (म्हाताऱ्याला) बाबा, तुम्ही निर्धास्त जा, ह्या हवालदारांना काही–

म्हातारा : (पाच रुपये काढतो) हवालदारा, हे घे.

पोलिस : नको...नको.

बाई : घ्या हो.

दादा : घ्या, त्यांनी खुषीनं दिलेत–

म्हातारा : घे बाबा. मुलगा हजारो रुपये कमावतोय...घे तू...

दादा : घ्या (म्हातारा पोलिसाच्या हातात नोट कोंबतो.) तुझ्या मुलाला खाऊ म्हणून घे. म्हातारपणी पोरांनी फेकलं तरी आपण आपलं कर्तव्य (पोलिस आणि म्हातारा बोलत निघतात.)

साथी : (सहजच) ही दिल्लीची ट्रेन–

बाई : आय ॲम सो टायर्ड (पोलिस आणि म्हातारा जातो.)

दादा : (साथीदाराला) आजकाल ही श्रीमंत पोरं अशी क्रूएल झाली आहेत नाहीतर ही केस आपण पाच-सात हजाराखाली सोडली नसती...(रागाने सिगारेट फेकतो.)
(अनाउन्सर– देहलीकी गाडी प्लॅटफॉर्मपर आ चुकी है. मुसाफिरोंसे निवेदन है की वे...)

बाई : गाडी आलीय...बी क्विक्...आज एक तरी ऑर्डर–

दादा : आपल्या असिस्टंटचा काय पत्ता ?

साथी : तो गावाला गेलाय. पोरगा आजारी आहे म्हणे.

दादा : पोरं नेहमीच आजारी पडणार म्हणून काय धंदा थांबवायचा ?

साथी : म्हणत होता, पोरगा सारखी आठवण काढतोय, कधी भेटेन असं झालाय.

दादा : (मोठ्याने हसतो) त्याला सांगायचं नाही– तिकडे मलबाऱ्याच्या डेनमध्ये आई-बापासाठी रडणारी पोरं पाहा पळवून आणलेली म्हणून त्यांना जळत्या सिगारेटचे चटके देतात, त्यांचे हातपाय मोडतात...ओरडतात, किंचाळतात पोरं... आई-बापांना, भावाला, बहिणीला हाका मारतात. (हसतो.) पोरांच्या रडण्यानं आणि अशा आठवणी काढण्यानं काळीज हलतंय तर साले धंद्यात कशाला मरायला येतात ? पैशाचा धूर पाहिजे तर काळजावर चांगले तीन दगड ठेवलेच पाहिजेत. (अनाउन्सर...बाए हाथको टॅक्सी स्टॅंड है वहाँ जा सकते हो)

बाई : माणसं यायला लागली आहेत हं.

(टॅक्सी चालू झाल्याचे आवाज, माणसाचे आवाज...हमालांची धावपळ. हातात पोर्टमॅंटो घेऊन एक रुबाबदार इसम जवळ येतो. मुद्दाम पडला असा रुमाल टाकतो. पुढे जाऊ लागतो.)

दादा : (रुमाल उचलून बघतो. अंदाज घेतो) एक्स्क्यूज मी सर– (रुबाबदार इसम थांबतो, हसतो.) आपका हॅंकरचिफ–

इसम : बिझनेस ?

दादा : (हसतो) बिझनेस.

बाई : या गाडीनं आलात ?

इसम : येस, ऑर्डर्स आहेत.

बाई : किती ?

इसम : तीन.

दादा : सी–

इसम : चाइल्ड ना ? एक

साथी : एल ?

इसम : लेडी दोन, एक माझी स्वत:ची, दुसरी कोटा स्टेशनवर आठशेला विकत घेतली– तिथल्या दादाकडून. त्यानंच तुमचा पत्ता दिला...(हलक्या आवाजात) दोन हजाराला दोन्ही देतो. परत जायचंय लगेच.

दादा : ओ. के.

इसम : सी. चं काय ?

दादा : आमचा असिस्टंट आला नाहीए. सी चं डिपार्टमेन्ट त्याच्याकडे आहे.

इसम : बघा, फायदेशीर सौदा आहे.

साथी : मलबारीकडे जागा कुठंय ? डेनमध्ये तीन पोरं आहेत, वॅगनची वाट पाहात–

दादा : तिथंसुद्धा दो या तीन करावं लागतं. जास्त पोरं झाली की बोंबाबोंब– एल मालाला हरकत नाही. (बाहेरचे आवाज) टाइम थोडा आहे. खूण काय ?

इसम : पैसा रोख...टू थाऊजंड.

(लंगडा येतो. मागून पोलिस)

दादा : हवालदार, पोचवलं म्हातारबुवांना ?

पोलिस : हो, तुमचे पाव्हणे आले वाटतं ?

बाई : (इसमाकडे बोट दाखवून) हे काय ?

पोलिस : (जायच्या घाईत) बराय...तिकडं गेलं पाहिजे. गाडी प्लॅटफॉर्मला आलीय...(जातो)

दादा : (लंगड्याला) लंगड्या, इकडे ये रे... (लंगडा जवळ येतो.) दोन हजार मागतोय.

(लंगडा झोळी उघडून हळूच दोन हजार रुपये काढून देतो.)

(इसमाला) हं, घ्या. खूण ?

इसम : निळी साडी..पांढरी पर्स...तो कोटयाचा माल. पंजाबी ड्रेस तो माझा स्वत:चा. बरोबर कोण येतंय—माल दाखवला की सुटलो.

दादा : हा लंगडा येईल. (हसतो.) डोन्ट वरी... तो चांगला आहे. आणि हा साथीदार घ्या.

इसम : पण...

दादा : माल दाखवा. खलास... आज इतकी वर्षं बिझनेस करतोय... तुम्ही किती वर्षं ?

इसम : दोन झाली. त्याच्या आधी दुसरा लाईन होती. पण त्यात रिस्क फार...ही लाईन फर्स्टक्लास आहे.

बाई : आजच्या मालाची काही इन्फर्मेशन—

इसम : पंजाबी ड्रेस पिक्चरसाठी आलीय. दुसरी घरून भांडून आलीय. मॅरीड आहे. स्टेनोची नोकरी करत होती.

दादा : (साथीदाराला) तू निळी साडी घेऊन जा. टॅक्सी कॉर्नरला उभी आहे. आम्ही पंजाबी ड्रेस नेतो. टॅक्सीत लंगड्याला घे जपून...गडबड केली तर पहिली पनिशमेंट दे. (लंगड्याला) जा तू...

इसम : ते पोरसुद्धा घ्या ना. पाचशे रुपयांत तोडतो.

दादा : नको. (लंगडा जातो.)

इसम : नको काय ? घरून पळून आलंय... गडबड करणार नाही.

स्पेलखाली आहे. कुत्र्यासारखं येईल.

बाई : नको...असिस्टंट आला नाहीए.

दादा : लाईन मिक्स करत नाही आम्ही. तुम्ही दुसऱ्या कुणाला विकून टाका. प्रायव्हेट गाड्या उभ्या आहेत तिथं. मिस्टर एक्स आहे त्याला द्या......कोडवर्ड शम्मीकपूर ब्रह्मचारी. (टॅक्सीजचे आवाज...गडबड गोंधळ) तुम्ही लौकर पंजाबी ड्रेस पाठवा... (साथीला) कोटयाचा माल नेलोस ना? जा... संशय येईल. (साथी जातो. मग इसम जातो.)

बाई : कोटयाचा माल विकत घेतलाय म्हणे...म्हणजे काय ?

दादा : (हसतो) तुला शिकायचंय अजून... कोटा स्टेशनवर तिथल्या दादानं ह्या इसमाला माल दाखवला. इन्फर्मेशन दिली, त्याचे आठशे रुपये घेतले, झालं. पसा कमी पण रीस्क नाही. . माल चांगला असेल तर वीस हजार मिळतील. पिक्चरखाली आहे.

बाई : ह्या पोरींना वाटतं, पिक्चरमध्ये चान्स मिळाला की लाखो रुपये मिळतील. (हसते) आता घे म्हणावं लाखो रुपये. चारशेवीसकडे घेऊन जाऊ तिला.

दादा : नको, तो साला लगेच धंद्याला लावील तिला.

बाई : मग ?

दादा : आपण स्ट्रेट विकून टाकू...आपल्या फ्लॅटवर चार दिवस ठेवू.

बाई : कळलं.

दादा : मग सोडतो काय ? तू साली फोरट्वेंटीला स्क्रीनटेस्ट देतेस ती? (ती हसते) शू, हसू नकोस.

बाई : हसू नकोस काय ?... सगळं खोटं होतं ते. तुला सोडून त्या चारशेवीसकडे जाईन तरी मी ? तुझ्यावर मी जीव लावलाय तो. (हसते.)

दादा : पण तो फोरट्वेंटी तुझ्या मागं मागं असतो.

बाई : कोण नाही मागं ? तुझा हा साथीदार काय, तो लंगडा काय, पण मी सगळ्यांना सांगितलंय, मी तुझीच आहे म्हणून.

दादा : म्हणजे ?

बाई : मघाशी हवालदाराच्या समोर तू आपल्या खोट्या पोरांची चौकशी केलीस ना? बच्चूची, बेबीची...? माझ्या तेव्हा मनात आलं, आपलं लग्न झालं की अशी छोटी छोटी मुलं...

दादा : (तुच्छतेनं हसून) वेड लागलंय काय तुला?

बाई : वेडच लागलंय...आपली मुलं...तुम्हाला आवडत नाहीत मुलं?

दादा : विकायला आवडतात. कसलं पोरावर प्रेम आणि काय.

बाई : मग आपला असिस्टंट—आजपर्यंत कितीतरी पोरं त्यानं पळवली, विकली, त्यांना छळलं; पण पोटचं पोर आठवण काढतंय म्हटलं तशी गावी गेला... मला देखील कधीकधी वाटतं, हे सगळं सोडावं.

दादा : आणि काय भीक मागावी? हे बघ असं नाटक—सिनेमातल्या-सारखं बडबडू नकोस. ही लाईन उत्तम आहे—

बाई : फक्त मनावर दगड रचायचे—

दादा : आणि माणसं विकायची. माणसांची विक्री— गरिबीतून मी शिकलो. माझं ज्ञान, माझे कष्ट विकायला ठेवले— कुणी गिऱ्हाइक नव्हतं. मग माझी बहीण— पळवलं कुणीतरी तिला... कुणी म्हणतं, तिच्या प्रियकरानंच तिला पळवलं आणि विकून टाकलं. कल्पना आली. आता ज्ञान विकायचं नाही, कष्ट विकायचे नाहीत. विकायची माणसं—

बाई : किती भयंकर.

दादा : हे नाटकातल्यासारखं बोलली नाहीस तरी हे भयंकरच आहे, कारण ते सत्य आहे...सत्य असंच असतं म्हणून आमचे मास्तर सांगायचे...मास्तर परवा भेटले होते... हल्ली परीक्षेचे पेपर फोडून पैसा कमावतात.. ते केवढं भयंकर...माझ्यावर तू प्रेम करतेस— केवढं भयंकर— मला प्रेम नकोय तुझं... ही मनं, ही प्रेमं दगडांनी चेचून टाकायचे हे दिवस आहेत.

बाई : तुला माझ्याबद्दल कधीच काही वाटलं नाही?

दादा : सत्य सांगू? पहिल्यापासून जे वाटलं ते आजही वाटतंय...

बाई : काय?

दादा : तुला विकलं तर पंधरावीस हजाराला मरण नाही. (बाई दचकते. पंजाबी ड्रेसातली मुलगी येते. हातात सिनेमाची मासिके, वर्तमानपत्रे.) शू...ती येतेय...गो अहेड...

बाई : (पंजाबी ड्रेसला) हॅलो.

पंजाबी : हॅलो.

बाई : तुम्हाला कुठंतरी पाहिल्यासारखं वाटतं.

पंजाबी : अच्छा ? कुठं पाहिलंत ?

बाई : (दादाला) तुम्हाला नाही का हो वाटत– ह्यांना कुठं पाहिलेलं ? (पंजाबीला) हे माझे मिस्टर.

दादा : नमस्ते.

पंजाबी : नमस्तेजी. कुठं पाहिलंय मला ?

दादा : आपण कुठल्या पिक्चरमध्ये–

बाई : आय ॲम शुअर–तुम्हाला मी पिक्चरमध्येच पाहिलंय... तुम्ही पिक्चरमध्ये काम करता ना ?

दादा : नक्की.

पंजाबी : नाही हो.

बाई : नो किडिंग प्लीज. तुम्ही नक्कीच पिक्चरमध्ये...इतकी ब्यूटिफुल फिगर– प्लीज, सांगा ना.

पंजाबी : (आनंदित होऊन) नाही हो–

दादा : बरं, पण पिक्चरमध्ये जायचा तरी विचार–

पंजाबी : दॅटस् करेक्ट.

दादा : आमचा अंदाज चुकायचा नाही. (बा.ला) काय ग ?

बाई : हो नं. डायरेक्ट नसला तरी तसा आमचा फिल्म लाईनशी अगदी जवळचा संबंध आहे.

पंजाबी : हाऊ कम ?

बाई : ह्यांचे मोठे ब्रदर–

दादा : ही इज वन ऑफ द टॉपमोस्ट प्रोड्युसर्स.

बाई : त्यांचीच वाट पाहात थांबलो आहोत आम्ही.

पंजाबी : ह्या गाडीला होते ते ?

दादा : हं...चारपाच पिक्चर्स एकदम लाँच करतोय तो. फायनान्स मिळवणं.

बाई : नवीन नवीन फेसिस शोधणं... त्यांना प्रत्येक पिक्चरमध्ये नवीन हिरॉइन आणायची आहे...(दादाला) आपण असं केलं तर ?

दादा : कसं ?

बाई : ह्यांचं नाव सजेस्ट केलं तर ? आजच्या सगळ्या नटी फिक्या पडतील यांच्यापुढं.

दादा : आय डू ॲग्री बट...यू नो...ह्या तयार पाहिजेत ना...

बाई : ते झालंच... पण भाईजींना ह्यांचा नुसता फोटो दाखवायचा अवकाश, ही विल जम्प ॲट धि आयडिया... अ न्यू ब्राईट स्टार ऑन द होरायझन... स्क्रीनमध्ये फुल पेज जाहिरात टाकतील ते.

दादा : (पंजाबीला) माफ करा हं... आमची मिसेस म्हणजे एकदम मनातलं बडबडून टाकणार... तुम्हाला राग तर नाही ना आला ?

पंजाबी : अंहं...

बाई : (पंजाबीचे हात धरून) मग सांगा ना. आर यू रेडी टू ॲक्ट? प्लीज... फक्त एकाच पिक्चरमध्ये हिरॉइनचा रोल करा मग वाटल्यास सोडून द्या... ओह, प्लीज...से येस .. हिंदी येतं?

पंजाबी : मला चार भाषा येतात. पिक्चरमध्ये जाण्यासाठी मी हिंदी शिकले, उर्दू शिकले, बंगाली शिकले, शिवाय डान्स...

बाई : वंडरफुल, वंडरफुल, इंडीड.

दादा : तू अशी आहेस. आपला हट्ट पुरा केल्याशिवाय राहाणार नाहीस. (पंजाबीला) तुम्ही हिचा वेडेपणा...

पंजाबी : ओह ..शी इज सो लव्हेबल, बेहेन–माझं लकच म्हटलं पाहिजे. इथं पिक्चरमध्ये काम करण्यासाठी मी घर सोडून आले आणि पहिल्यांदा तुम्हीच भेटलात...

दादा : एका बड्या प्रोड्युसरची लाडकी भावजय आहे ही. हिनं सांगितलं म्हणजे आमचे बंधुराज हो म्हणणारच.

बाई : तुम्ही जाहिरात वाचलीत त्यांची ? (पं. च्या हातून वर्तमान-पत्र घेत) वॉन्टेड न्यू फेसेस ?

पंजाबी : अर्थात...म्हणून तर मी...पळून आले.

दादा : घरी कोण कोण आहेत ?

पंजाबी : पपा, ममी, दोन भाऊ, पपा खूप मोठे बॉस आहेत. ममी सोशल-वर्कर आहे. भाऊ आपले असेच...

बाई : म्हणजे ?

पंजाबी : गुंड. मवाली. सगळं मनासारखं होत गेलं, आता थ्रिल हवं म्हणून...

बाई : माफ करा, आपलं एज ?

पंजाबी : जस्ट एटीन.

दादा : शिक्षण विचार आता.

पंजाबी : अपटू बी. ए. बहेन–

बाई : (पं. ला जवळ ओढून घेत) बेहेन...बस...आजपासून तू माझी बेहेन –

दादा : बेहेन ! आणखी चार महिन्यांनी ह्यांनी पंधरावीस पिक्चर्सची कॉन्टेक्ट्स साईन केली ही कोण बहीण आणि कोण–

पंजाबी : ना...ना...ये कैसा हो सकता ? बेहेन–

(पोलिस येतो. दादा दचकतो.)

दादा : काय हवालदार ? फार धावपळ चाललीय –

पोलिस : पेशल वॉच आहे ना आज...इन्फर्मेशन आलीय– (थांबतो.) अजून थांबला आहात ?

दादा : आता निघालोच–

पोलिस : पाहुणे आले ?

दादा : हो. (पं. कडे बोट दाखवून) हे काय.

पोलिस : आणि मघाचे पाहुणे ?

बाई : ते माझ्या बहिणीला (पं. ला जवळ घेत) फक्त सोबत म्हणून.

(पोलिसाला संशय येणार इतक्यात–)

पंजाबी : अक्का, चल ना, अशी भूक लागलीय...

दादा : चला.

बाई : (पटकन सुचून) आम्हाला वाटलं होतं, तू मिस्टरना घेऊन येशील ?

पंजाबी : पण त्यांना लिव्ह मिळाली नाही ना.

दादा : पोलिस डिपार्टमेंट म्हणजे असंच.

पोलिस : काय ?

दादा : नाही. माझे साडू– म्हणजे ह्यांचे मिस्टर तिकडे एम. पी. मध्ये डी. एस. पी. आहेत, ते येणार होते इकडे, तर–

पंजाबी : आयत्यावेळी काही स्पेशल ड्यूटी आली आणि लीव्ह कॅन्सल, आय वॉज सो अपसेट–

बाई : नॅचरली. (पोलिस जातो) शाब्बास, काय ॲक्टिंग आहे, तुला बरं सुचलं हं–

पंजाबी : मग काय करणार ? पळून आलेय ना, घरून इकडे ताराबिरा आल्या असतील. मघाशी ना ?–

बाई : काय झालं ?

पंजाबी : माझा भाऊ इथं दिसला...मला वाटतं, तो कोटयाहून माझ्या-मागं असावा...पण पंजाबी ड्रेसमुळं, या हेअरस्टाईलमुळे त्यानं ओळखलं नसेल. माझ्याशी बोलायलासुद्धा आला गाडीत...मी इंग्रजीत उत्तर दिलं, मी पिक्चरमध्ये काम करण्यासाठी जातेय म्हणून.. शी...बोलायलाच नको होतं त्याच्याशी ..

बाई : तुमचा भाऊ म्हणजे –

पंजाबी : सख्खा भाऊ...तो गुंड...मघाशी इथून नाही का गेला तो ? तुमच्याशी बोलला देखील असेल...

दादा : आं ?

पंजाबी : (रुबाबदार इसमाचं वर्णन करते) बघा, असा रुबाबदार होता. क्रीम कलरचा सूट, हातात पोर्टमेंटो –

बाई : तो...तो तुमचा भाऊ ?

पंजाबी : हो नं, गुंड आहे, पण माझ्यावर इतका जीव आहे त्याचा... एकदा वाटलं होतं, त्याला हाक मारावी. झालेला गुन्हा सांगून त्याची क्षमा मागावी..इतक्या दिवसांनी अचानक दिसला आणि आपण ओळख दाखवली नाही तर जन्माचं दुःख खुपत राहील. (डोळे टिपते) पण कलावंत व्हायचं म्हणजे रिस्क घेतलं पाहिजे...मनावर दगड ठेवले पाहिजेत. नाही का ? पण आपलं नाव, ओळख...(पोलिसाची शिटी वाजते.)

दादा : बी क्विक...चला...

बाई : आपल्याच टॅक्सीनं जाऊ.

(घाईघाईनं तिघे जातात)

(टॅक्सीचा आवाज...गडबड...क्षणभरानं रुबाबदार इसम येतो. घाबऱ्या चेहऱ्यानं इकडं-तिकडं बघतो. पोलिस येतो.)

इसम : हवालदारसाहेब (काहीतरी सांगणार आहे.)

पोलिस : काय ?

इसम : काही नाही... काही नाही...टॅक्सी इकडेच मिळेल ना ?

पोलिस : हो–

(दोघे जातात.)

काळोख

कै. अं. आठे, ग्रंथालय शाखा.
क्र. २०८५५ नों. दि. ४।५।८५


# अंक तिसरा : दुकान सहावे

(सजवलेला दिवाणखाना. नाटककाराची पत्नी कोरड्या चेहऱ्याने बसलेली. बाजूला पुढारी आणि साहेब. सगळे नाटककाराच्या येण्याची वाट बघत आहेत.)

पुढारी : (तोंडात पान) किती ? साडेआठ झाले.

ना. पत्नी : हो.

पुढारी : एव्हापर्यंत यायला हव होतं बुवांनी.

साहेब : हो ना. माणसानं कसं वेळेवर यावं. या बुवानं काही–

पत्नी : बुवा ? कोण बुवा ?

पुढारी : (हसत) हॅं हॅं...बुवा म्हणजे कविराज. .नाटकवाले...

पत्नी : नाटकवाले ?

पुढारी : तेच– नाटककार...हॅं हॅं...ह्यांना आम्ही बुवाच म्हणतो. आम्ही म्हणजे–हे कार्यकर्ते साहेब आणि आमच्यासारखे –

पत्नी : पुढारी.

पुढारी : हॅं हॅं, आम्ही कसले पुढारी ? जन्टा प्रेम करते...आमचे वेडेवाकुडे डोण शब्द एकेटे म्हणूनच आम्ही पुडारी. .फॉर्टीटू मुव्हमेंटमध्ये म्हणजे बघा.. आम्ही ठाण्याच्या तुरुंगात असटाणा आमच्या बरोबर अशी एकेक मंडळी होटी–

पत्नी : ऐकलंय मी ते.

पुढारी : एकलंट का ? वाटलंच...आम्ही किटीही णको–णको म्हटलं तरी जन्टा आमच्याबद्दल बोलट असटे...कुणी बरं सांगितलं तुम्हाला ?

पत्नी : तुम्हीच सांगितलंय कितीतरी वेळा. (खिडकीशी जाते.)

साहेब : (हसतो) बाईसाहेबांचा स्वभाव भलताच विनोदी आहे हं.

पुढारी : फॉर्टीटूच्या काळाटल्या गोष्टी आटवाव्याट टेवड्या थोड्या.... म्हणजे एकडा काय झालं ? आम्ही असेच बोलट होटो. मी होटो...हल्लीचे आपले मंट्री...

पत्नी : माहीत आहे ती गोष्ट मला. (साहेब हसतो) तुम्हीच सांगितली होती...पण हे अजून कसे आले नाहीत ?

साहेब : काही कळत नाही.

पुढारी : येटील, येटील...हो काय साढा इसम आहे आटा ? यंडाचे नगराध्यक्ष होणार बुवा...फुडल्या वर्षी पडमभूषण णाही झाले टर णाव बडलीण...निडाण पदमश्री टरी...हां...मग टुमच्या-कडूण डणडणीत मेजवाणी घेणार आम्ही...काय ? सांगूण ठेवटो, बुवा पद्मश्री होणार म्हणजे...

पत्नी : बुवा हे नाव कुणी दिलं त्यांना ?

पुढारी : (खिडकीतून पिक टाकतो) काही कल्पना नाही, बुवा...पण कुणीतरी दिलं एवढं खरं. फॉर्टीटूमध्ये असंच झालं, आमचे एकेक कार्यकर्ते–

पत्नी : हं–

पुढारी : फॉर्टिटूच्या वेळी तुम्ही–

पत्नी : होते ना.

साहेब : बाईसाहेबांचा स्वभाव भलताच विनोदी हं.

पुढारी : पण काय करत होता तुम्ही तेव्हा ?

पत्नी : कॉलेजात होते. हेही माझ्याच कॉलेजात होते. अशा सुंदर कविता करायचे–

पुढारी : कशावर करायचे कविता ? म्हणजे स्वातंत्र्यावर, आमच्या

लढ्यावर किंवा आमच्यासारख्या देशभक्तांवर...

पत्नी : अंह ..प्रेमावर. त्यांनी एक कविता लिहिली होती तेव्हा... (भावनाविवश होते)...

साहेब : सांगा सांगा...

पत्नी :

पहाटेच्या धुक्यातून तू येतेस
त्या धुक्याच्या गंधभरल्या मोहराचेच
पुन्हा धुके होऊन...
आणि तरी तुला मी ओळखतो
तुझ्याकडे पाहून स्मित करतो
कारण...
कारण माझ्या मनीचे खुळे पक्षी
तेही धुकेच झालेले असतात...

पुढारी : अरेरे.

पत्नी : आवडली नाही कविता ?

साहेब : आपल्याला आवडली हं.

पुढारी : आवडणारच. ग्रामसेविका आणि शिक्षिका यांच्या घोळक्यातले ना तुम्ही ?

साहेब : (रागावून) पुढारी.

पुढारी : फॉर्टीटूमध्ये आम्ही देशभक्त तुरुंगात असताना बुवा प्रेमाच्या कविता करत होते ? स्वातंत्र्याच्या पहाटे आम्ही कोणती स्वप्नं पाहत होतो, काही कल्पना आहे ?

पत्नी : मंत्री होण्याची असतील.

साहेब : बाईसाहेबांचा हा विनोद मात्र...

पुढारी : आमची स्वप्नं होती, मातृभूमी सुजलाम सुफलाम करण्याची; आमची स्वप्नं होती धर्माची मुळं उखडून टाकून बंधुभाव निर्माण करण्याची...आमची स्वप्नं होती–

पत्नी : तुमच्या भाषणात मी एकदा ऐकलंय हे. (साहेब हसतो.)

पुढारी : आणि तरी तुम्ही, आम्हाला मंत्री होण्याची स्वप्नं पडत होती. असं म्हणावं ना ?

पत्नी : ते म्हटल...तुमची कृती पाहून...तुमची, तुमच्या मित्रांची, आजकाल ह्यांची...त्यांच्यातला तेव्हाचा भावविवश कवी–

पुढारी : प्रेमकविता करत होता. वा: त्या तरुणांबद्दल आम्ही कोणत्या अपेक्षा बाळगून होतो ? आम्हाला का हौस नव्हती ? आम्हाला का कविता करता येत नव्हती ? आम्ही का तरुण नव्हतो ?

पत्नी : अं हृ...

पुढारी : अं हृं काय ? आम्ही तरुण नव्हतो ?

पत्नी : अंहं, म्हणजे मला मला माहीत नाही. (हसते. साहेब हसतो.)

पुढारी : (चिडतो.) प्रेमाच्या त्या पांचट कविता वाचताना तुम्हाला काहीच वाटत नव्हतं ?

पत्नी : असं कसं ? खूप वाटत होतं.

साहेब : वाटणारच–

पत्नी : (स्वत:शीच) वाटत होतं, हे माझ्याशीच बोलताहेत. पहाटेच्या धुक्यातून मीच चाललेय. तेव्हा माझी पावलं किनई दवानं ओली सुद्धा झालेली दिसायची...ते दिवसच वेगळे होते...

पुढारी : फॉर्टीटूचे ना ?

पत्नी : कुणाला सालाचं, दिवसाचं भान होतं ? त्यांच्या कविता गुण-गुणताना कशाची जाणीवच नव्हती. त्यांची खूप गरिबी–

पुढारी : दारिद्र्य विसरायला ह्या कविता फार उपयोगी पडतात.

पत्नी : (हसते) पण मी घरचं ऐश्वर्यंच विसरले त्या कवितांनी... सगळं लाथाडलं आणि त्यांच्याकडे धावत गेले एका पहाटे. धुक्यात त्याचं घर परीच्या राजवाड्यासारखं दिसत होतं. ते कमानीत उभे होते... हसत...मग दहा दिशांनी सुखाचं धुकं दाटू लागलं.

पुढारी : बरं...येतो मी.

पत्नी : (आपल्याच नादात) ते म्हणाले...ये, तुझीच वाट पाहत होतो...त्यांनी आपले बाहू पसरले.. सारं धुकं आपल्या कवेत घेतलं.

पुढारी : येतो म्हटलं मी. तुमचं ते धुकं...बुवा आले की त्यांना एक

निरोप सांगाल ?

पत्नी : आँ ?

पुढारी : नाही, म्हटलं, बुवांना रात्री दहाच्या सभेला यायची आठवण करा.

साहेब : आणि म्हणावं, साहेब इलेक्शनच्या कामासाठी आले होते.

पुढारी : ते महत्त्वाचं नाही तेवढं, आजची सभा फार महत्त्वाची आहे.

पत्नी : आजसुद्धा सभा आहे ? रोज हे जागरण–

पुढारी : मग ? कष्टानं आणि त्यागानंच मोठेपण लाभतं...

पत्नी : मला वाटत होतं, कष्टानं आणि त्यागानं फक्त समाधान लाभतं.

पुढारी : विसरा ते दिवस.

पत्नी : फॉर्टिटूचे. (साहेब हसतो.)

पुढारी : (टोमणा लक्षात घेऊनही) आता समाधानापेक्षा मोठेपण हवंय.

पत्नी : कुणाला हवंय मोठेपण ?

पुढारी : (हसतो) बुवांना.

पत्नी : त्यांना कशाला हवंय ? त्यांच्या नाटकांनी, कवितांनी त्यांना ते उदंड दिलंय...

पुढारी : पहा ना, पण त्यांची उडी वाढलीय आता. त्यांना जनतेत मोठेपण पुढारीपण हवंय. आता इलेक्शनला उभे राहाताहेत ते...पद्मश्रीची स्वप्नं पाहाताहेत...आता कसली नाटकं आणि कविता ! (हसतो) बरं, घेऊ रजा ? (दार वाजते.) आले वाटतं बुवा. (दार उघडतो.) या, बुवा, तुमच्याच वाटेकडे डोळे लागले होते आमचे.

(नटवर्य आणि होरारत्न येतात.)

नटवर्य : (आत येत) थांबा. आम्ही बुवा नाही...पण स्वागताचा स्वीकार करतो...स्वागत पण स्वागत झालं, काय होरारत्न. (नाटककाराच्या पत्नीकडे पाहून) नमस्कार...नमस्कार.

पत्नी : नमस्कार. आपण म्हणजे–

पुढारी : वा: तुम्ही यांना ओळखत नाही ? हे आपले नटवर्य आणि हे होरारत्न. आणि नटवर्य, हे आमचे साहेब तिकडले मोठे

सरपंच आहेत. शिक्षण खातं आणि आरोग्य खातं असं सांभाळलंय– सगळ्या शिक्षिका आणि ग्रामसेविका अगदी खूष असतात. बाईसाहेब, हे होरारत्न म्हणजे–

नटवर्य : थांबा. महान ज्योतिषी आहेत हे. हात पाहण्यात यांचा हात धरणारा अजून जन्माला यायचाय...काय पुढारी ?

पुढारी : हो.

नटवर्य : थांबा. गेल्या जुलैत होरारत्नांनी पुढाऱ्यांना काय सांगितलं होतं, माहीत आहे ? (पत्नी मानेने नाही म्हणते) यंदा इथल्या सोसायटीचे तुम्ही चेअरमन होणार.

होरारत्न · आणि चार महिन्यांत झाले. ह्यांचा रवि इतका पॉवरफुल आहे.

नटवर्य : थांबा...आधी आपला गुरू बघू. वहिनीसाहेब, बुवा कुठं दौऱ्यावर वगैरे ?

पत्नी : नाही. जरा इथंच बाहेर गेले आहेत.

साहेब : एवढ्यात यायला हवेत, पण जर काही–

नटवर्य : थांबा. यांना सांगू दे– हं, बाईसाहेब, सांगा–

पत्नी : काही नाही. म्हटलं, बाहेर गेलेत.

नटवर्य : (होरारत्नाला) थांबा...(दोघे बसतात.)

होरारत्न : मी सांगितलं होतं, आज रात्री बुवांची भेट होणार म्हणजे होणार.

पत्नी : काही विशेष काम ?

होरारत्न : म्हटलं तर आहे, म्हटलं तर नाही. नटवर्यांनी फार आग्रह केला, बुवांचा हात बघा म्हणून–

पुढारी : हो. या इलेक्शनमध्ये–

होरारत्न : जिंकणार ? शुअरली, त्याचं नाव पार दिल्लीपर्यंत जाणार; मोठा मानसन्मान–

साहेब : होरारत्न, एकदा सवड काढून गरिबाघरी पायधूळ झाडलीत तर–

होरारत्न : जरूर...जरूर...

पुढारी : बरं, मी आज्ञा घेऊ आपली ?

नटवर्य : थांबा– बुवा येईपर्यंत आमच्याबरोबर जरा हॅ हॅं...काय पुढारी, आपण जुने दोस्त, पण बऱ्याच दिवसांत भेट नाही झाली.

पुढारी : कशी होणार ? आम्हाला का फुरसत आहे ? इलेक्शन तोंडाशी आलंय...

साहेब : म्हणजे, खायची सोय झाली तोंडाची. (हसतो. पुढारी चिडतात.)

होरारत्न : मी सांगितलंच होतं. बरं, आपल्या बुवांचं काय ?

पुढारी : त्याच धावपळीत आहे. सभा आहेत, वादविवाद आहेत. विरुद्ध पक्ष आहे–

नटवर्य : विरुद्ध पक्षात नाव घेण्यासारखं कोणी ?

पुढारी : तेवढा तो हेडमास्तर आहे आदर्श विद्यालयवाला– नवीन रक्त एवढंच भांडवल. मूर्ख ! त्याला शाळा बंद करून नाही भिकेला लावला तर नाव बदला. कालचा प्रकार कळला ना ?

होरारत्न : त्यांची मिटिंग म्हणे उधळली गेली–

पुढारी : त्यांच्या सभा उधळणं हे एक कामच होऊन बसलंय.

नटवर्य : थांबा, म्हणजे कालच्या प्रकारात तुमचा हात–

पुढारी : पूर्ण अडकला होता. आता बुवांच्या घरी हे आणि तुम्ही त्यांचे स्नेही म्हणून बोलायचं...काल तीनशे माणसांची ऑर्डर दिली होती.

होरारत्न : म्हणजे ?

पुढारी : (हसतो) तुम्हाला राजकारण कळायचं नाही. आजकाल वाट्टेल ते विकत मिळतं. अशा सभा उधळण्यासाठी माणसं पुरवणारी मंडळी आहेत. त्यांना पक्षबिक्ष काही नाही. पैसा देईल तो पक्ष. समजा, गाड्या लेट आहेत. जनता संतापत आहे, पण काही करू शकत नाही. मग–

साहेब : पुढारी व्हायची संधी घ्यायची. ह्या मंडळींना ऑर्डर देऊन गोंधळ माजवायला माणसं मागवायची. सांगाल त्या क्वालिटीची– कॉलेज स्टुडंटस्, कामगार, गुंड, तुमच्यासारखी सभ्य दिसणारी माणसं

(नाटककाराची पत्नी इतका वेळ त्रयस्थ आहे. आत-बाहेर करतेय– आता प्रथमच ती हसते.)

नटवर्य : थांबा. या लोकांना काय नाईट मिळते हो ?

पुढारी : (राग गिळून) ते क्वालिटीवर अवलंबून...आता ओळख असेल, एकदम मोठी ऑर्डर असेल–

नटवर्य : थांबा. आम्हाला कुठंतरी अशी भूमिका द्या ना...आमच्या गाजलेल्या भूमिका तुम्ही पाहिल्या आहेत तेव्हा...वहिनीसाहेब, नाटककंपनीचा मी मालक होतो, मालक. एखाद्या संस्थाना-सारखी कंपनी होती, महाराजा. दोन्ही वेळेला फस्क्लासपैकी जेवण, अंगावर रेशमी कपडा. माझा तेव्हाचा रुबाब या पुढा-ऱ्यांनी पाह्यलाय...नाटकाला येऊन बसायचे ना हे रोज. कंपनीतच दिवसभर पडलेले असत. चैन चैन म्हणजे एक का ? ह्यांना विचारा, ह्यांनी काय केलं आणि काय करायचं बाकी ठेवलं त्या दिवसांत.

होरारत्न : ते दिवस म्हणचे रात्रीच होत्या.

साहेब : आणि रात्री म्हणजे दिवस.

पत्नी : फॉर्टिटूचे ?

नटवर्य : थांबा, बरोबर ओळखलंत, बाईसाहेब. होरारत्न, बाईसाहेबांनी तुमच्यावर ताण केली हं–

होरारत्न : त्यांचा नेपच्यून पॉवरफूल असणार. त्याशिवाय एकदम इतकं एक्झॅक्टली बोलणं–

नटवर्य : थांबा. फॉर्टिटूची गोष्ट ऐका आधी. हे सदा कंपनीत पडलेले–

पत्नी : पण तेव्हा ते तुरुंगात पडले होते ना ?

नटवर्य : थांबा. कोण ? हे ? (पुढाऱ्याला) धन्य आहे, एकदा तरी तुरुं-गाची हवा खाल्लीय ?

पुढारी : (वरमतात) तसा म्हणजे मी–

होरारत्न : पैसे खाल्ल्याच्या आरोपावरून दोनदा हवा खाल्लीय. (पुढारी रागावतो.) रागावू नका...बुवांच्या घरी, आणि आपण स्नेही म्हणून बोलायचं हे...नटवर्य, ह्यांची पत्रिका पाहिली तेव्हा

पहिला प्रश्न हाच विचारला मी. काय पुढारी ?

(नाटककाराची पत्नी, साहेब, नटवर्य हसतात. पुढारी संतापतो.)

नटवर्य : थांबा. रागावू नका...पुढारी, ही आपली एक गंमत हो... बाईसाहेब, तुम्हीदेखील हे विसरून जायचं...ठरलं...आपले हे पुढारी फॉर्टिटूमध्ये तुरुंगात हालअपेष्टा भोगत होते असंच सगळ्यांनी समजायचं. आणि असंच सगळ्यांनी सगळ्यांना सांगायचं. काय पुढारी ?

पुढारी : मला काही विचारू नका. (नाटककाराच्या पत्नीला) मी निघालो.

साहेब : अहो पण माझ्या कामाचं–

पुढारी : (चिडलेले) तुम्हाला ग्रामसेविका आणि शिक्षिका यांच्यासाठी मदत मागण्याशिवाय काही सुचतं का ? हं...मदतीच्या नावा-खाली–

साहेब : (दम भरतो) पुढारी, जीभ आवरा...ह्या ग्रामसेविकांनी तुमच्याविरुद्ध केलेल्या तक्रारी सांगू का सगळ्यांना? (पुढारी जायला निघतात, एवढ्यात दार वाजते.)

नटवर्य . थांबा. बुवा आलेले दिसतात. (नाटककाराची पत्नी दार उघडते, नाटककार येतो.)

पत्नी : किती वाट पहायची ?

नाटककार : (तिच्याकडे लक्ष देण्याआधी इतरांकडे लक्ष देतो.) अरे वा, इलेक्शन-बैठकच भरलेली दिसते. माफ करा हं, जरा उशीर झाला...हं, काय पुढारी ? आमच्यावर नाराजी तर नाही ना ? अरे वा, साहेब, तुम्ही कसे इथं ?

पत्नी : ते केव्हाचे–

नाटककार : काय नटवर्य, ठीक ?

नटवर्य : थांबा. खरं सांगायचं तर ठीक नाही, पण–

नाटककार : आणि आपले होरारत्न काय म्हणताहेत ?

होरारत्न : पत्रिका पाहिलीय– आज हात बघायला म्हणून– नटवर्यांचा आग्रह पडला–

नाटककार : पत्रिकेवरून काय दिसतोय रंग ?

होरारत्न : इलेक्शनबद्दल ना ?

नाटककार : हो– आता दुसरा कोणता विजय हवाय.

होरारत्न : सेन्ट प्रर्सेन्ट सक्सेस आहे.

नटवर्य : थांबा. बुवा, आधी आम्हाला वचन हवंय या आनंदाच्या बातमीबद्दल.

नाटककार : दिलं वचन. झालं ?

पत्नी : (काहीतरी बोलायला मिळावं म्हणून हसत) अहो, पण कोणतं वचन– काही विचाराल की नाही ?

साहेब : पुढारी होण्याचं पहिलं लक्षण म्हणजे विचार केल्याशिवाय वचन देणं.

पुढारी : (पान लावू लागतो) बुवा, घेणार पान ?

नाटककार : बरं, द्या. तुम्हाला नकार देणं जीवावर येतं...तंबाखू मात्र थोडाच टाका हं.

पत्नी : तुम्ही तंबाखू खायला लागलात.

नटवर्य : थांबा. जनतेत मिसळायचं म्हणजे हे आलंच. सिगारेट, पान... ते पान (हसतो) काय पुढारी, बरोबर ना ? बुवा, आम्ही सांगतो. तुम्ही फार मोठे नेते होणार. आता नाटककार, कवी म्हणून ओळखण्यापेक्षा– जनता तुम्हाला नेता म्हणून ओळखणार.

पुढारी : मग फुडल्या वर्षी पद्मभूषण...(पान देतो.)

होरारत्न : प्रश्नच नाही. रवि-गुरूची युती आहे पत्रिकेत...मानसन्मान. लक्ष्मीची कृपा–

पुढारी : ती आलीच ओघानं– तुम्हाला, आम्हाला, जनतेला मधला माणूस हवा असतो, आम्ही सांगणार, (पान खातो) टुमच्या गावाला अमूक अमूक हवं असेल तर एवढी रक्कम हवाली करा...(ना. पत्नी गंभीर) अहो, आजच्या युगात हे न करील तो मूर्ख. (नाटककाराच्या अंगावर शितोडा उडतो.) आजकाल प्रत्येकानं सेल्समन बनलं पाहिजे. असा मुखवटा ठेवायचा–

नटवर्य : थांबा. बुवा, वचनाचं काय ?

पत्नी : अहो, आधी काय ते सांगा, मग हे उत्तर देतील.

नाटककार : वचन दिलं म्हणून सांगितलं ना ? बोला.

पुढारी : बुवा, रात्री सभा आहे. सर्व (शितोडा, नाटककार स्वतःच पुसतो.)

पत्नी : आताच आले आहेत दमून. आज नाही आले सभेला, तर–

नाटककार : चालणार नाही. असं काय करतेस ? आता तुला त्यागाची, सोशिकतेची सवय करायला हवी. मिरवायला हवं ना तुला ? नगराध्यक्षांची पत्नी म्हणून पद्मभूषणाचा मान स्वीकारताना माझ्या यशाची प्रेरणा म्हणून...आँ ? त्या सुखासाठी–

पत्नी : मी कालदेखील सुखी होते. खूप सुखी होते.... नाटककाराची, कवीची पत्नी म्हणून–

नाटककार : आपल्या लोकांच्या आकांक्षाच खुरटचा, काय पुढारी ?

पुढारी : अगडी बरोबर. (नाटककाराच्या अंगावर शितोडा.) माफ करा.

नाटककार : चालायचंच हो. (शर्ट पुसत) तुमचा कृपाप्रसाद आहे ह्या... शुभशकून...(पत्नीला ते आवडत नाही.) काय झालं ग ?

पत्नी : कुठं काय ? अरे हो, संध्याकाळी प्रकाशकांचा फोन आला होता. नवीन काव्यसंग्रहाबद्दल ते विचारत होते.

नाटककार : मूर्ख ! आणि हे पहा. ह्या फालतू लोकांना तूच वाटेला लावत जा...मला आता असल्या गोष्टीत लक्ष घालायला वेळ नाही कळलं ?

पत्नी : मला हल्ली काहीच कळत नाही.

पुढारी : टर राट्रीची सभा. राट्री (शितोडा उडतो. पुढारी हसतो.) प्रसाड, प्रसाड...उड्या टुम्ही मोठ्या पडावर गेलाट की जन्टेकडूण प्रसाड मागायचा...टुम्ही डेव... टुमाला नैवेड्य डाखवायचा आणि प्रसाड आम्ही खायचा. पोट भरूण... काय ? (पत्नी गंभीर) अहो असं पहा, इटकी वर्षं आम्ही जो ट्याग केला ट्याच्याबड्डल आम्हाला काही हवं की णको ? सढ्या ट्यागाचा माल चांगला खपतोय...

नटवर्य : थांबा. म्हणजे त्यासाठी फॉर्टीटूची कहाणी रचलीय. (हसतो.) बुवा, आम्हाला मात्र खरा खणखणीत प्रसाद लागेल हं.

पुढारी : टुमचा काय संबंढ ?

साहेब : फॉर्टिटूचाच, खोटी गोष्ट विकायची, म्हणजे पैसे फार लागतात, काय नटवर्य ?

होरारत्न : नटवर्यांना योग आहेच तो, आणखी तीन-चार वर्षांत–

नटवर्य : थांबा. अंह, तेवढा वेळ नाही. बुवा, आमच्यासाठी– एका गरीब कलावंतासाठी तुम्ही काहीतरी केलं पाहिजे.

पत्नी : म्हणजे काय केलं पाहिजे ?

नटवर्य : सरकारकडून दरसाल काही द्रव्यलाभ मिळवून दिलात तर... म्हणजे असं की आम्ही तेव्हा रंगभूमी गाजवलीय... महाराज! आमच्या भूमिका पहायला गावोगावचे लोक यायचे... शंभरा-शंभराच्या नोटा हातात कोंबून म्हणायचे, वाटेल ते करून एक सीट द्या. काय दिवस होते हो ते. गावात फिरायला जाताना टांगा... स्पेशल... आम्हाला बघायला रस्त्यात ही गर्दी. पण आता दिवस फिरले. कुणी नाटकात काम देत नाही. आमचं नाव कुणाला स्मरत नाही. आमची सेवा कुणी जाणत नाही. (डोळ्याला रुमाल लावतो.) एक वेळच्या अन्नाला मोताद होऊन (रडतो.)

नाटककार : नटवर्य, आवरा दुःख...तुमच्या भावना मी जाणतो...तुम्हाला मी वचन दिलंय...तुमच्या सेवेबद्दल–

पुढारी : कसली सेवा आणि काय ? थोबाडाला रंग फासला की म्हणे सेवा.

नटवर्य : खरोखरीच सेवा केली आम्ही, महाराजा. ह्यांच्या फॉर्टिटू-सारखी खोटी गोष्ट नाही. ती गोष्ट सांगून लोकांना लुबाडताना आम्ही उघड्या डोळ्यांनी त्याला बघतो, आणि आमची खरोखरीची सेवा.. (प. गंभीर) निरपेक्ष सेवा... बाईसाहेब, तुम्ही दयाळू आहात...महिन्याकाठी निदान पांचएकशे रुपये–

पत्नी : हो, निरपेक्ष सेवेला एवढे तरी पैसे हवेतच.

नटवर्य : हवेत ना? हवेत ना? पहा. कलेची कदर रसिकांनीच करावी. त्याग विकायला काढणारे हे पुढारी– त्यांना काय त्याची किंमत.

नाटककार : नटवर्य, बोलताना जरा संयम ठेवा. कोणाशी काय बोलताय–

पुढारी : बघा ना.

नटवर्य : बाईसाहेब–

पत्नी : अं–

नटवर्य : तुम्हीच आमच्या निरपेक्ष सेवेबद्दल बोला... थोड्याच काळात बुवा महत्पदावर चढतील–

होरारत्न : प्रश्नच नाही. त्यांच्या पत्रिकेतला रवी सांगून चुकलाय, नाहीतर मग लुंगेसुंगे (पुढाऱ्याकडे बघतो) बाईसाहेब, तुमचं खरं-खरं मत–

पत्नी : नटवर्य, तुमच्या निरपेक्ष सेवेबद्दल लोकांनी तुम्हाला काहीतरी दिलंच पाहिजे...त्यांचं हे कर्तव्यच आहे.

नटवर्य : कसं बोललात.

पुढारी : कसली आली बोडक्याची सेवा...दुसरं काही करता येत नव्हतं म्हणून घरून पळाले आणि नाटक कंपनीत शिरले. नाटकापेक्षा नाटकाबाहेरच त्यांनी चांगला अभिनय केला, पैसे देणाऱ्या शेटच्या गरजा भागवून नाटककारांना फसवलं, बाकीच्या नटांचा अपमान केला. त्यांचा पैसा खाल्ला. कलेच्या नावाखाली हॉटेलातून चैनी केल्या. कंपनीचे मालक म्हणून प्रत्येक नाटकात प्रमुख भूमिका केली–

नटवर्य : तुम्ही बोलू नका बाईसाहेब–

साहेब : तुमच्या सेवेबद्दल तेव्हाच्या प्रेक्षकांनी शेकडो रुपये मोजले होते, खरं?

नटवर्य : त्यात काय संशय?

साहेब : आता त्याच गोष्टी तुम्ही पुन्हा विकताय. वर आपली आजची दैनावस्था विकताय. माणसं नुसत्या शब्दांच्या जुन्या गोष्टी

पुन्हा विकत घेत नाहीत. नटवर्य, तेव्हा लोकांना दिलेला पैसा उधळलात. उद्याची काळजी केली नाहीत–

नटवर्य : खरंय... चुकलं आमचं... पण आता दुसरं काही विकायलाच नाहीए आमच्याजवळ. नाही असा खोटा त्याग, नाही–

पुढारी : नाटक्या, माझ्याशी गाठ आहे–

नटवर्य : आणि तुमची माझ्याशी गाठ आहे. तुमचं फॉर्टीटूचं बिंग फोडलं तर–

साहेब : हां, ते विकलं जाईल. पेपरवाले घेतील हे विकत–

पुढारी : पण विक्रीचे पैसे घ्यायला जिवंत असावं लागतं. नाटक्या, जपून रहा. सरपंच, तुम्ही देखील...नुसती ऑर्डर द्यायचा अवकाश–

नाटककार : अरे, काय हे चाललंय. आपण एकत्र येऊन इलेक्शन लढवणार आहोत. तुम्ही सगळे माझे परम मित्र आहात.

पुढारी : बुवा, आपल्यात हा नाटक्या नको.

नाटककार : आपल्याला सारा समाज हवा. श्रीमंत हवा, गरीब हवा. गिरणी मालक हवा. मजूर हवा...(पुढाऱ्याला बाजूला घेऊन) सध्या संभाळलं पाहिजे ह्या गाढवाला... कळलं ? (नटवर्या-कडे जाऊन त्याच्या पाठीवर हात ठेवतो.) नटवर्य, दिलेलं वचन मी पाळीन, झालं समाधान ?

पत्नी : म्हणजे तुम्ही त्यांना आधीच–

नाटककार : (कठोरपणे) ही बायकांची कामं नाहीत. माझ्या ह्या मित्राला मी मदत केलीच पाहिजे.

पुढारी : बरं, रात्रीच्या सभेत– त्या आदर्श विद्यालयवाल्याचा काटा काढायचं नक्की करायंचय, तेव्हा–

नाटककार : येतो मी...नटवर्य, तुमचं काम–(पुढारी जातो.)

नटवर्य : झालं. आभारी आहे. जाऊ आता ?

नाटककार : जाताय ? बरं, रात्री पुन्हा सभा आहे... आणि हे पहा, इथलं कुठं काही बोलायचं नाही. सगळं विसरायचं...माझ्यासाठी... कळलं ? ह्याचा मोबदला पुरेपूर–

नटवर्य : ठीक आहे. होरारत्नांना जरा आपला हात–

नाटककार : अं ? हो...पण आता म्हणजे...

होरारत्न : हवं तर उद्या-परवा आपल्या सवडीनं–

नाटककार : आधी फोन करू शकाल का ? कारण हे जरा खाजगी आहे. आपल्या दोघांखेरीज आणखी कुणी...

होरारत्न : ठीक आहे. ओळख ठेवा गरिबाची.

नाटककार : ( त्याच्या खांद्यावर थोपटत ) कशाला लाजवताय ? बरं, अच्छा...

(नटवर्य आणि होरारत्न जातात.)

साहेब : माझं काम जरासं नाजूक–

नाटककार : आलं लक्षात. रात्री सभेनंतर बोलू... तुम्हाला एकदा आपलं म्हटलं ना ? तुमचे शंभर गुन्हे मी माफ करायचे, आणि माझे शंभर गुन्हे... बराय...(साहेब जातो.)

पत्नी : (क्षणभरानं) तुम्ही रात्री खरंच जाणार आहात सभेला ?

नाटककार : हो.

पत्नी : गेलेच पाहिजे ?

नाटककार : अर्थात.

पत्नी : आज किती दिवसांत आपण स्वस्थपणं बसलो नाही. काही बोललो नाही, ठाऊक आहे ?

नाटककार : ह्या दिवसांचे हिशेब मांडायला मला वेळ नाहीए.

पत्नी : गेल्या सहा महिन्यांत तुम्ही नवं, चांगलं असं काही लिहिलं-सुद्धा नाही–

नाटककार : शक्य आहे.

पत्नी : एखादी सुरेखशी कविता–

नाटककार : तो मूर्खपणा करायला मला सवड नाही यापुढं.

पत्नी : म्हणजे ?

नाटककार : तुझं तू समजून घे– एकटीनं.

पत्नी : मला एकटीला अस्तित्व तरी आहे ?

नाटककार : मला ठाऊक नाही.

पत्नी : असं काय बोलता अलीकडे. तुझ्याशिवाय मी क्षणभरदेखील

जगू शकणार नाही, हे तुम्हीच म्हणत होता ना ?

नाटककार : काही लक्षात नाही.

पत्नी : काही लक्षात नाही ? खरंच, काही लक्षात नाही ? सगळं विसरलात ?

नाटककार : हो, सगळं विसरलो.

पत्नी : ती धुक्याची पहाट...ती कविता...पहाटेच्या धुक्यातून तू येतेस धुक्याच्या गंधभरल्या मोहोराचेच पुन्हा धुके होऊन.

नाटककार : धुकं फार वेळ टिकत नाही, माहीत आहे ना ?

पत्नी : टिकत नसलं तरी एखादं धुकं जन्मभर आठवत राहातं, एवढंच माहीत आहे मला.

नाटककार : असं कोडयात काही बोलू नकोस.

पत्नी : तुम्हाला काव्य आवडत नाही ?

नाटककार : नाही.

पत्नी : त्या काव्यानंच तुम्हाला नाव दिलं, प्रतिष्ठा दिली, आजचे हे सुखाचे दिवस दाखवले.

नाटककार : म्हणून काय झालं ? ज्याला शिखरावर जायचं आहे त्यानं आपला पाय पायरीतच अडकवून ठेवू नये. (ती हसते.) तुम्हा बायकांना हे समजणारच नाही–

पत्नी : असंच आहे. आपलं नाव-गाव पूर्णपणे सोडून सारं आयुष्य सासरी काढायचं आणि माहेरचं बालपण आठवत राहायचं एवढंच ठाऊक असणाऱ्या बायकांना हे समजणार नाही. (आठवण होते) जेवून घेणार ना ?

नाटककार : नको. मी बाहेर खाऊन आलोय.

पत्नी : खरं ? मग दूध, कॉफी काही–

नाटककार : नको...मी यायच्या आधी इलेक्शनबद्दल काय म्हणत होते ते लोक ?

पत्नी : तेच. बुवा नक्की निवडून...तुम्हाला बुवा का म्हणतात ?

नाटककार : का काय ? दोस्तीत आपलं त्यांनी–

पत्नी : ते दोस्त आहेत तुमचे ?

नाटककार : हो.

पत्नी : त्यांच्या सहवासात तुम्हाला आनंद वाटतो ? मला तर इतकी शिसारी आली होती–

नाटककार : राजकारण म्हटलं की आधी अशाच माणसांना हाती धरावं लागतं.

पत्नी : आणि यांच्या पानाचे शिंतोडे प्रसाद म्हणून...का ? का तुम्ही ही लाचारी स्वीकारताय ?

नाटककार : माझी स्वप्नं मोठी आहेत.

पत्नी : नुसती आकारानं–तुमची माझी जुनी स्वप्नं कशी सुगंधी होती. टवटवीत होती, काव्यमय होती. लोकांनी तुमच्यावर प्रेम केलं, एक कवी म्हणून, एक नाटककार म्हणून...त्यांना तुमचं नवीन नाटक हवंय. तुमच्या नव्या कविता हव्या आहेत...

नाटककार : लोक ? (हसतो) राजकारण. जनता– ही जनता कशी आहे सांगू ? ती प्रेम करते कलावंतांवर आणि लग्न मात्र करते पुढाऱ्याशी– दिखाऊ राजकारणाशी...

पत्नी : जिथं निवळ स्वार्थ आहे, त्यागाचा सेवेचा-बाजार आहे...अशा बाजारात– माणसं विकणारा आणि विकत घेणारा बाजार... तुम्ही प्रतिभा घेऊन खोटा मान घ्यायला भटकताय. त्या पहाटे मी ऐश्वर्य लाथाडून तुमच्याकडे धावत आले ती तुमच्या प्रतिभेवर मोहित होऊन...भविष्यात तुम्ही प्रतिष्ठा मिळवाल, पैसा मिळवाल असे कोणतेच अंदाज न बांधता...तुमच्या कविता वाचत, तुमचे शब्द ऐकत माझ्या भोवतीचं सुखाचं धुकं क्षणाक्षणाला दाटच होत गेलं. कुठून तरी ओळी ऐकू येत होत्या...

राजकन्ये, तू आपला राजवाडा सोडून
माझ्या स्वप्नातल्या राजवाड्यात आलीस...
वाटेवरले काटे लाल गुलाबी पावलांना
बोचले ना, म्हणून विचारले, तेव्हा म्हणालीस...
स्वप्नस्पर्शाने त्यांचीच ना गंधवेडी फुले झाली होती ?

मी पाहिले, त्या नाजूक पावलांवर लाल ओली टिबे
होती
उष्ण...थरथरती. पुसणार होतो काही
तर तू विचारलेस, काही फुलांचा गंधच किती
बोचतो, नाही ? तुझे डोळे बोलत होते.
मला काहीतरी सांगत होते. ह्या माझ्या ओठांवर
उमटलेल्या लाल टिबांची कविता झाली. तीच म्हणाली,
राजकन्ये, माझ्या स्वप्नाला पडलेलं तू एक निळं
स्वप्न आहेस,

(रडू लागते) आपला आनंद किनई, स्वप्नातल्या राजवाड्यातच आहे...खऱ्या राजवाड्यात नाहीए.

नाटककार : (असहाय)त्या जुन्या आठवणी ! (पत्नी त्याच्या खांद्यावर मान ठेवते. नाटककार विरघळतो.) जुन्या आठवणी, जुना भावविवश कवी. तुला सांगू, माझ्यातला तो कवी हरवलाय ग या बाजारात. आता त्याला शोधू म्हटलं तरी शक्य नाही. या रावणांनी माझी प्रियतमा कला पळवून नेलीय सोन्याच्या लंकेत. (कोरडेपणाने) आजचा राम ती आणायला लंकेत गेला तर त्याला आधी मोह पडेल तो सोन्याचा. प्रियतमेला आणायला सुद्धा विसरून जायचा तो. हल्ली तुझ्याशी कधी मनमोकळे बोलणं होत नाही. भाषण करताना प्रेरणाच कशी ती मिळत नाही ग. (एकदम) तुझ्यासाठी देऊ का हे सगळं सोडून...हजारदा मनात येतं (घड्याळाचे टोले. नाटककार दचकतो.)

पत्नी : (डोळे उघडते) तुमच्या मिटिंगची वेळ झालीय ना ?
अयं वसंतसेना घातकः चारुदत्तो वधस्तंभ नीयते (रडू लागते.)

काळोख

... वाचनालय ...
... २००५४ ... ८१.५

IRBK-0120855

IRBK-0120855